नागपूरचे सब-जज्ज श्री. गर्दे व काकासाहेबांचे एक मित्र त्यावेळी तेथे हजर होते. त्यांनी काकासाहेबांचा चेहरा न्याहाळला; पण त्यांच्या चेहऱ्यावर आपल्या कष्टाने कमावलेल्या कमाईची अशी विल्हेवाट झालेली पाहून यत्किंचितही दुःखाची भावना दिसली नाही. धन्य त्यांचे वैराग्य आणि धन्य त्यांची आपल्या गुरूला शरणागती!

एकदा बाबांनी त्यांना सुरा घेऊन एका बोकडाची मान कापण्यास सांगितले तेव्हा काकासाहेब जन्माने ब्राह्मण असून लगेच तयार झाले:

**चित्त गुरूपदीं सावधान।**
**राहोत की जावोत प्राण।**
**आम्हां गुरूचीच आज्ञा प्रमाण।**
**परिणाम निर्वाण तो जाणे॥१७८॥**

—अध्याय २३

बाबांच्या हयातीत काकासाहेब कोणताही व्यवहार बाबांना विचारूनच करीत आणि तोच क्रम बाबांच्या निर्वाणानंतरही त्यांच्या चित्राच्या पायाशी चिठ्ठ्या टाकून आज्ञा घेऊन त्यांनी चालू ठेवला होता. त्यांचे म्हणणे होते:

**देहचि जेथे नाहीं आपुला।**
**एकदा बाबांचे पायीं वाहिला।**
**मग तयाच्या चलनवलनाला।**
**काय आपुला अधिकार॥९६॥**

—अध्याय ४५

उगाच नाही हेमाडपंतांनी काकासाहेबांना श्री साईसचरितातील अध्याय २३ मध्ये **'बावनकसीं सुवर्ण' 'गळ्यांतील ताईत'** अशी विशेषणे वापरली आणि खुद्द बाबांनी त्यांना आश्वासन दिले होते:

**फळा येईल तुझे इमान।**
**धाडीन मी तुजलागीं विमान।**
**नेईन त्यांत बैसवून।**
**निश्चिंत मन राखीं तूं॥१०॥**

—अध्याय ४५

आणि खरोखरीच काकासाहेबांना मरणही बोलता-चालता बाबांच्याच गोष्टी करीत आनंदात आले. जणूकाय विमान-प्रयाणच!

**साईबाबांचा भक्तीचा नामी प्रकार**

वर शास्त्रात वर्णिलेले भक्ती करण्याचे ९ विधी किंवा प्रकार सांगितले. परंतु साईबाबांनी अध्याय १९ मध्ये कानमंत्रासाठी हट्ट धरून बसलेल्या राधाबाई देशमुखीणीला भक्तीचा स्वत: अनुभवलेला एक अत्यंत सोपा व नामी प्रकार सांगितला:

**"तूं मजकडे अनन्य पाहीं।**
**पाहीन तुजकडे तैसाच मीही"॥७३॥**

खरे म्हणजे हा ध्यानाचा म्हणजे स्मरण भक्तीचाच प्रकार आहे:

**होऊनियां सर्वेषणाविनिर्मुक्त।**
**ध्याना आणावा सर्वभूतस्थ।**
**ध्यान होईल व्यवस्थित।**
**प्राप्तव्य प्राप्त होईल॥१०६॥**
**केवळ जें मूर्त ज्ञान।**
**चैतन्य अथवा आनंदघन।**
**तेंचि माझे स्वरूप जाण।**
**तें नित्य ध्यान करी गा॥१०७॥**
**जरी न आतुडें ऐसें ध्यान।**
**करी सगुणरूपानुसंधान।**
**मनीं नखशिखान्त मी सगुण।**
**रात्रंदिन आणावा॥१०८॥**
**ऐसें करितां माझे ध्यान।**
**वृत्ति होईल एकतान।**
**ध्याता-ध्यान-ध्येयाचे भान।**
**नष्ट होऊनि जाईल॥१०९॥**
**एवं ही त्रिपुटी विलया जातां।**
**ध्याता पावें चैतन्यघनता।**
**हीच की ध्यानाची इतिकर्तव्यता।**
**ब्रह्मसमरसतां पावाल॥११०॥**

—अध्याय १९

हे कसे शक्य आहे? तर:

**कासवी नदीचे ऐल कांठीं।**
**तिचीं पिल्लें पैल तटीं।**
**ना दूध ना ऊब केवळ दृष्टी।**
**देई पुष्टी बाळकां॥१११॥**
**पिलियां सदा आईचे ध्यान।**
**नलगे कांहींच करणें आन।**
**नलगे दुध ना चारा ना अन्न।**
**मातानिरीक्षण पोषण त्यां॥११२॥**

—अध्याय १९

**भयें अथवा प्रेमें जाण।**
**जया जयांचे नित्य ध्यान।**
**ध्याता होई ध्येयचि आपण।**
**कंस रावण कीटकी॥३८॥**

—अध्याय ४५

**भक्ती कशी करावी?**

भक्तीत उपास्य दैवतांबद्दलच्या भावाला, म्हणजे प्रेमालाच महत्त्व असते. भक्त देवाला काय देतो, किती देतो, किती तास भजन करतो याला महत्त्व नसते. ते सर्व खऱ्या प्रेमाने केलेले असावे लागते.

**प्रेम नुपजें भावावीण।**
**भाव तेथें देव जाण।**
**भावापोटीं प्रेम पूर्ण।**
**भावचि कारण भवतरणा॥३०॥**

—अध्याय ४८

**हरी निजभक्तांचा केला।**
**भाळ्या-भोळियांचा भुकेला।**
**प्रेमालागीं समूळ विकला।**
**सदा हटेला दांभिका॥९॥**

—अध्याय ३

**भावें अर्पिता फूल पान।**
**अति प्रेमें करील सेवन।**
**तेंच अर्पिता साभिमान।**
**फिरवील मान जागींच॥११॥**

—अध्याय १६

**नलगें मज पूजासंभार।**
**षोडश वा अष्टोपचार।**
**जेथें भाव अपरंपार।**
**मजला थार ते ठायीं॥१३॥**

—अध्याय १३

थोडक्यात म्हणजे **'लाभेवीण प्रीत'** असावी. देवाची भक्ती काही मिळविण्यासाठी करावयाची नसते. त्याला नवस करावयाचा म्हणजे तो व्यवहार झाला. देवाजवळ मागावयाचेच झाले तर काय मागावे याची श्री साईसचरितातील काही अनुकरणीय व उदात्त उदाहरणे पहा!

**नलगे आम्हा तुझा मान।**
**अथवा स्वर्गलोकीचे विमान।**
**जागो तुझियें पायीं इमान।**
**इतुकेनि दान देई मज॥१४२॥**

—अध्याय ३६

**कुंती पाच पांडवांची आई।**
**अज्ञात आणि वनवासापायीं।**
**कष्टली जरी अनंत अपायीं।**
**प्रार्थी अपायचि देवातें॥११०॥**
**म्हणे देवा परमेश्वरा।**
**सौख्य द्या जी मागत्या इतरा।**
**मज द्या निरंतर दुःखपरंपरा।**

पाडी न विसरा तव नामा ॥११९॥
तेंच की देवा माझे मागणें।
देणें तरी मज हेंच देणें।
होईल मग तव नाम तेणें।
अखंड लेणें मम कंठा ॥११२॥

—अध्याय २२

असो आता येऊ लोटांगणांसी।
हेच मागणे पायांपाशी।
तुजवीण अन्यत्र वांछेसी।
जाऊं न देसी एकसरीं ॥२४॥

—अध्याय ५२

साईबाबांनी आपल्या भक्तांसाठी दोन शब्दांचे सूत्र दिले आहे: **'निष्ठा आणि सबुरी'**. 'निष्ठा' म्हणजे आपल्या उपास्य दैवतांवर किंवा सद्गुरूवर पूर्ण श्रद्धा. तो जे जे घडवील ते ते आपल्या अंतिम कल्याणासाठीच असेल असा पूर्ण विश्वास. 'सबुरी' म्हणजे धीर धरणे आणि हिंमत खचू न देणे. प्रपंचात किंवा भक्तीत अनेक संकटे येतील. अनेक निराशेचे प्रसंग येतील तरी त्यांना धैर्याने तोंड देऊन आपल्या देवावरची किंवा सद्गुरूवरची श्रद्धा ढळू न देणे.

सबूरी सद्गुणांची खाणी।
सद्विचाररायाची राणी।
निष्ठा आणि ही सख्या बहिणी।
जीव प्राण दोघींसी ॥५६॥

—अध्याय १९

सारांश, भक्तीला उजाळा देण्यासाठी या दोन गुणांची अत्यंत आवश्यकता आहे.

याशिवाय भक्तीबद्दल साईबाबांची आणखी एक महत्त्वाची शिकवण होती: आपल्या कुळात परंपरागत चालत आलेल्या किंवा आपण पूर्वीपासून करीत आलेल्या देवाची किंवा सद्गुरूची भक्ती माणसाने सोडू नये. कधी संतोषी माता, कधी सिद्धी विनायक, तर कधी हाजी मलंग बाबा असे वारंवार उपास्य दैवत बदलणाऱ्या अलिकडील भक्तांनी हे लक्षात ठेवावे. भक्ती पतिव्रता स्त्रीप्रमाणे अनन्य असली पाहिजे:

पतिव्रतेचे निश्चल अंतर।
कदा न सांडी आपुले घर।
निजपतीचाच प्रेमा अपार।
आजन्म आधार तो एक ॥२७॥
पतिव्रता साध्वी सती।
अन्या भावोनिया निजपति।
तयाचें दर्शन घ्यावयाप्रती।
कधींही चित्तीं आणीना ॥२८॥

—अध्याय ४५

साईबाबांचे म्हणणे होते:

आपुली माय आपुली जतन।
करील ती अन्य कोण करी॥

—अध्याय ४५

अपना तकिया छोडना नही॥अ. २६, ओ. २९॥

म्हणूनच बाबांनी अ. ४ मध्ये भगवंतराव क्षीरसागरांना विठ्ठलाची, अ. २६ मध्ये पितळ्यांना व आंबडेकरांना अक्कलकोट स्वामींची पूर्वील भक्ती पुन्हा करावयास लावली. रा. ब. प्रधानांना त्यांच्या कुलगुरूने दिलेल्या 'श्रीराम जय राम जयजय राम' या मंत्राची आठवण करून दिली. साईबाबांना आपल्या भक्तांना पटवावयाचे होते की सर्व देव एकच आहेत आणि त्यासाठीच की काय त्यांनी आपल्या भक्तांना विठ्ठल, श्रीराम, दत्तात्रेय, मारुती अशा अनेक देवांच्या रूपाने दर्शन दिले होते आणि म्हणूनच की काय शिरडीला येण्याच्या घाईत वाटेत कोपरगाव येथील दत्ताचे दर्शन टाळणाऱ्या चांदोरकरांवर ते रागावले होते. असो.

भक्ती कशी करावी, याविषयीची सुरेख दृष्टान्तासह वचने श्री साईसचरितात ठिकठिकाणी पसरलेली आहेत. त्यातील काही पहा:

लंपट गुळाचिये गोडी।
सांडी न मुंगी तुटतां मुंडी।
तैसी द्या साईचरणीं दडी।
कृपापरवडी रक्षील तो ॥१७१॥

—अध्याय २७

गोरसेंसीं वत्स धालें।
तरी न मायेपासूनि हाले।
तैसें मन हें पाहिजे बांधिलें।
दावणीं दाविलें गुरूपायीं ॥७७॥

—अध्याय ३७

कृपण वावरो कवण्याही गांवा।
चित्तासमोर पुरलेला ठेवा।
जैसा तयासी अहर्निशीं दिसावा।
तैसाचि वसावा साई मनीं ॥१८५॥

—अध्याय ३

साईबाबांची आश्वासने

शेवटी, साईबाबांनी आपल्या भक्तांना दिलेली आश्वासने खाली देऊन हा लेख पुरा करतो:

माझा माणूस देशावर।
असो कां हजारों कोस दूर।
आणीन जैसे चिडीचें पोर।
बांधून दोर पायांस ॥१५॥

—अध्याय २८

आणिक तया भक्तां म्हणत।
'फिकीर न करी ना यत्किंचित।
देईन तुजला रुपये मी मस्त।
बैसे तूं निश्चिंत मजपाशीं' ॥९३॥

—अध्याय १४

'माझिया भक्तांचे धामीं।
अन्नवस्त्रांस नाहीं कमीं'।
ये अर्थी श्रीसाई दे हमी।
भक्तांसी नेहमीं अवगत ॥३३॥

—अध्याय ६

तुम्ही कोणी कुठेंही असा।
भावें मजपुढें पसरिता पसा।
मी तुमचिया भावासरिसा।
रात्रंदिसा उभाच ॥६७॥
कुठेंही जा दुनियेवर।
मी तों तुम्हांबरोबर।
तुम्हां हृदयींच माझें घर।
अंतर्यामी तुमचे मी ॥६९॥

—अध्याय १५

झालों जरी गतप्राण।
वाक्य माना माझें प्रमाण।
माझी हाडें तुर्वतीमधून।
देतील आश्वासन तुम्हांस ॥१०५॥
मी काय पण माझी तुर्वत।
राहील तुम्हांसवें बोलत।
जो तीस अनन्यशरणागत।
राहील डोलत तयासवें ॥१०६॥
डोळ्याआड होईन ही चिंता।
करूं नका तुम्ही मजकरितां।
माझी हाडे ऐकाल बोलतां।
हितगुज करितां तुम्हासवें ॥१०७॥
मात्र माझें करा स्मरण।
विश्वासयुक्त अंत:करण।
ठेवा करा निष्काम भजन।
कृतकल्याण पावाल ॥१०८॥


—अध्याय २५

# तुमचं नशीब तुमच्या हातात

(मागील अंकावरून)

– पंडित ग. रा. सावंत

## रेषांचे दर्शन !




करतळावरील मुख्यरेषा या बहुधा सर्व व्यक्तींच्या हातावर दिसून येतात. पण या रेषाव्यतिरिक्त अनेक रेषा करतळावर दिसून येतात. या रेषा प्रत्येक हातावर असतीलच असे नाही. या दुय्यम रेषांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न अनेक हस्तरेषातज्ज्ञांनी प्राचीन काळापासून केलेला आहे. जीवनातील अनेक गोष्टी माणसाला जाणून घ्यायची इच्छा असते आणि या सर्व गोष्टी परमेश्वराने माणसाच्या हातावर लिहून ठेवलेल्या असतात. तर ही परमेश्वरी भाषा थोडक्यात जाणून घेण्याचा आपण प्रयत्न करूया.

**गुरुवलय :** तर्जनीच्या बोटाखालील गुरुग्रहस्थानाला अर्धवर्तुळाकार घेर घालणाऱ्या रेषेला गुरुवलय असे म्हणतात. ही रेषा हातावर असेल तर व्यक्तीच्या कल्पनाशक्तीचा विकास होऊ शकतो. तिला स्वप्नातून शुभाशुभ संकेत मिळत असतात. अशा व्यक्ती परिश्रमी असून त्यांचे ध्येय सिद्धीस जाते. परंतु आळशी लोकांना गुरुवलय आपल्या शक्तीचा फार मोठा लाभ मिळू देत नाही.

या रेषेचे अस्तित्व असणारे स्त्री-पुरूष समाजात मिसळणारे व समाजप्रिय असतात. ते स्वभावाने न्यायप्रिय, उद्धट व निश्चयी स्वभावाचे असतात. यांची प्रकृती गंभीर व सुहृदयी असते. अशा व्यक्ती महत्त्वाकांक्षी असून, हात शुभलक्षणी असल्यास त्या व्यक्ती उच्च शिक्षणात नाव काढतात. मोठमोठ्या विश्वविद्यालयीन पदव्या यांना सहज मिळतात. मिळकतीपेक्षा जास्त खर्च करण्याची यांची वृत्ती असते. हे स्वत:बद्दल संशयी वातावरण निर्माण करतात. अशा लोकांचा उत्तरोत्तर आध्यात्माकडे, विरक्तीकडे कल असतो. यांना गूढविद्येची आवड असते. ज्योतिषी व हस्तरेषातज्ज्ञ यांच्या करतळावर ही रेषा दृष्टीगोचर होत असेल तर अशा व्यक्ती या क्षेत्रात मोठा नावलौकिक प्राप्त करू शकतात.

**मित्ररेषा :** आपली अनेक सुख:दुखे समाजाशी तसेच आपल्या मित्रमंडळींशी निगडित असू शकतात. आपल्याला चांगले मित्र-मैत्रिणी लाभल्या तर आपल्याआयुष्याला चांगले वळण लागते. तर व्यसनी मित्रामुळे जीवनात धूळधाण झाल्याची अनेक उदाहरणे आपणास पाहावयास मिळतात.

तुम्हाला चांगल्या मित्राची निवड करण्यास तुमचा हात तुम्हाला बरीच मदत करतो. उजव्या हातावरील बोटाच्या तिसऱ्या पेरावरील उभ्या रेषा मित्रत्वाच्या रेषा म्हणून मानल्या जातात. व्यक्तीच्या पेरावर जर अशा उभ्या रेषा दिसून येत नसतील तर त्या व्यक्तीला मित्र नसतात. या रेषा चांगल्या स्पष्ट व निर्दोष असतील तर व्यक्तीला चांगले मित्र लाभतात. उलट रेषा दुबळ्या व बारीक असतील तर त्या व्यक्तीचे मित्र धोकेबाज असण्याची शक्यता असते.

**शत्रूरेषा :** बोटावरील पेरावर उभ्याऐवजी जर आडव्या रेषा असतील तर या रेषांना शत्रूरेषा समजाव्या. या आडव्या रेषा स्पष्ट दिसत असतील तर अशा व्यक्तींचे शत्रू फार प्रभावी असू शकतात.

मंगळग्रहस्थानावरून निघून अंत:करणरेषा किंवा मस्तकरेषा यांना छेदणाऱ्या रेषा गुप्तशत्रू दर्शवितात. वर या रेषा धनरेषेला किंवा रविरेषेला छेदीत असतील. तर शत्रू यशाला व कीर्तीला अडथळा निर्माण करतात. कधीकधी शत्रूरेषा रवि व धनरेषांना छेदून शनिच्या ग्रहस्थानावर जात असेल, तर शत्रूकडून सर्वनाश करण्याचा प्रयत्न केला जातो. जर या रेषेला बेटे असतील तर ते शत्रू वाईट वर्तणुकीचे असतात.

**महत्त्वाकांक्षी रेषा :** जीवनरेषेतून एखादी शाखा निघून ती गुरुग्रहस्थानावर स्पष्ट अखंडित योग्य अशी जाईल. तर व्यक्ती महत्त्वाकांक्षी असते. व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतात. अशी व्यक्ती फार महत्त्वाकांक्षी

असते. ही रेषा सदोष असेल तर व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षा पुऱ्या होण्यास फार मोठे अडथळे निर्माण होतात.

**साहाय्यक बुधरेषा :** (गोरक्ष) चंद्रग्रहस्थानावरून अथवा चंद्रग्रहांच्या क्षेत्रातून उगम पावून आरोग्यरेषेला काहीशी समांतर गती घेऊन अर्धवर्तुळाकाराने मंगळग्रहाच्या खालच्या भागातून जाणाऱ्या रेषेस बुधरेषा असे म्हणतात. ही रेषा व्यक्तीच्या हातावर असेल तर ती व्यक्ती अतिशय कामुक असते. स्वभाव चंचल असतो. अतिशय वीर्यशक्तीचे पतन झाल्यामुळे या व्यक्तीची आयुष्यरेषा चांगली असताही ते अल्पायुषी ठरतात. हे गुप्तरोगाची शिकार होण्याची फार शक्यता असतेच असते. अति कामसेवनामुळे उत्तरायुष्यात अशा व्यक्ती पौरूषहीन होतात. ही रेषा शेवटी दुशाखी असली तर अशा व्यक्तीत नपुंसकतेचे गुण असतात. ही रेषा चंद्रग्रहस्थानावरून निघून सरळ बुधग्रहस्थानावर जात असेल तर अशा व्यक्ती निरोगी असतात.

**विशाल त्रिकोण :** जीवनरेषा, आरोग्यरेषा व मस्तकरेषा यांनी तयार होणाऱ्या त्रिकोणास विशाल त्रिकोण म्हणतात.

हा त्रिकोण मोठा असून निर्दोष असता व्यक्तीला दिर्घायुष्य, धैर्य व चांगले नशीब लाभते. हा भाग रक्तवर्णीय असता व्यक्तीला नैराश्य व लैंगिक आजार असतात. मंगळ ग्रहस्थान निर्दोष असून हा त्रिकोण मोठा असता, व्यक्ती उत्साही व कर्तबगार असते. हा त्रिकोण फार लहान असता व्यक्ती क्षुद्र वृत्तीची व भित्री असते. हा त्रिकोण असून हात खोलगट असता कंजूष व क्षुद्रवृत्ती असते. जीवनात फार झगडून थोडेसे यश मिळविता येते.

चंद्रग्रहस्थान फार मोठे असून हातावर एक मणिबंधरेषा असेल व हातावर हा त्रिकोण असून हात खोलगट असेल तर मेंदूवर व मज्जातंतूवर ताण पडतो.

या त्रिकोणात पुष्कळ रेषा असून गुरूग्रहस्थान पुष्ट असता गर्विष्टपणा असतो. मंगळ व बुधग्रहस्थाने मोठी असता उतावळेपणा असतो.

हा त्रिकोण अरूंद असून मस्तक व आरोग्यरेषा चांगल्या असता धंद्यात अपयश येते.

हातावर त्रिकोण असून चांगली हृदयरेषा असता व्यक्ती उदार असते. हृदयरेषा तुटलेली असेल किंवा हृदयरेषा शाखाहीन असेल तर व्यक्तीचा स्वभाव स्वार्थी असतो.

मस्तकरेषा व जीवनरेषा यापासून चांगला कोन होत असल्यास, व्यक्ती सुसंस्कृत व व्यवहारी असते.

मस्तकरेषा लहान असता, उद्धट स्वभाव व सामान्यबुद्धी असते. हा कोन मस्तकरेषेवरून फार दुरून निघत असेल तर स्वतंत्रपणा असतो. हा कोन फार मोठा असता इतरांबद्दल बेफिकीरी व कंजूषवृत्ती असते. जीवनरेषा व मस्तकरेषा या एकत्र मिळून कोन होत असल्यास भित्रेपणा असतो.

आरोग्यरेषा मस्तकरेषेशी सरळ कोन करीत असल्यास प्रकृती नाजुक असते.

आरोग्यरेषा व जीवनरेषा यांच्यापासून होणारा कोन हा तिसरा कोन निर्दोष असता आरोग्य चांगले असते. यांच्या जोडीला बुधस्थान निर्दोष असता, स्वभाव विनोदी असतो. चांगली आरोग्यरेषा ही उत्कृष्ट मानसिक गुण वाढविते. तिसरा कोन मोठा असता व शुक्रग्रहस्थान फार विस्तृत असून अंगठ्याचे पेर निर्बल असल्यास अविश्वासूपणा असतो.

या क्षेत्रात सफेद बिंदू असता मूर्च्छा किंवा रक्तक्षय सुचवितात. या क्षेत्रात स्वतंत्र गुणकचिन्ह असल्यास माणसाच्या भांडखोरपणामुळे त्रास होतो. दोन्ही हातावर हे चिन्ह असल्यास व्यक्तीचा खून होतो. पुष्कळ गुणकचिन्हे असल्यास अनेक संकटे येतात.

मस्तकरेषा व जीवनरेषा मिळतात त्या ठिकाणी असणारी गुणकचिन्हे अनेक खटले सुचवितात.

आरोग्यरेषेजवळ नक्षत्रचिन्ह असता आंधळेपणा येतो. येथे वेडेवाकडे नक्षत्रचिन्ह असल्यास प्रेमापासून त्रास होतो.

शुक्रग्रहस्थानावरून एक रेषा येऊन या त्रिकोणाच्या क्षेत्रात तिच्यावर नक्षत्रचिन्ह असता, व्यक्तीला फार मानसिक दुःख होते. येथे वर्तुळ असता प्रेमापासून त्रास होतो. याच्या जोडीला चंद्रग्रहस्थान मोठे असल्यास फसवे प्रेम असते.

जीवनरेषा व धनरेषा यांच्याजवळ त्रिकोण असता, लष्करी मान मिळतो. या क्षेत्रात स्वतंत्र चौकोन असता व्यक्तीला धोक्याची सूचना देतो. या ठिकाणी जाळीचिन्ह असता लज्जास्पद मृत्यू येतो.

मस्तकरेषा, आरोग्यरेषा व धनरेषा यापासून होणारा त्रिकोण ईश्वराची भक्ती व गूढशास्त्राची आवड निर्माण करतो. येथे पुष्कळ लहान लहान रेषा असता व मस्तकरेषा फार खाली चंद्रग्रहस्थानावर गेली असेल तर वेडेपणा येतो.

**मंगळमैदान :** अंत:करणरेषा, मस्तकरेषा, मंगळ व गुरू ग्रहस्थाने यामधील भागाला मंगळमैदान संबोधतात. यात ग्रहस्थानाचा समावेश नसतो. हे एक प्रकारचे चौरसाचे क्षेत्र असून तेथे रेषा नसून गुळगुळीतपणा असता व्यक्तीचा स्वभाव एकनिष्ठ, स्थिर व शांत असतो.

अंत:करणरेषा व मस्तकरेषा संपत असता त्यामध्ये अंतर जास्त असेल तर स्पष्टवक्तेपणा असतो.

अंत:करणरेषा व बुद्धीरेषा यांच्यामध्ये सुरूवातीपासून शेवटपर्यंत जास्त अंतर असता वृत्ती स्वतंत्र असते.

शनिग्रहस्थानाखाली असणाऱ्या अंतरापेक्षा रविग्रहस्थानाखाली अंतर जास्त असता लोकमताविषयी फार भावनाप्रधानता असते.

रविग्रहस्थानाखाली असणाऱ्या अंतरापेक्षा शनिग्रहस्थानाखाली जास्त अंतर असता लोकापवादाबद्दल किंमत नसते.

अंत:करणरेषा, मस्तकरेषेकडून गेल्यामुळे अंतर कमी असल्यास औदार्य नसते. कंजूषपणा, भावनांवर बुद्धीची मात असणे इ. गोष्टीचे द्योतक असते.

मस्तकरेषावरून निघाल्यामुळे मंगळक्षेत्र लहान झाल्यास बुद्धीपेक्षा भावनांचा पगडा जास्त असतो.

हे क्षेत्र कठोर असता पाशवी गुण असतात.

हे क्षेत्र खोलगट असल्यास आळशीपणा असतो व व्यक्ती दरिद्री व कंजूष असते.

ग्रहस्थानाबरोबर हे क्षेत्र असल्यास काटकसरीची सवय असते.

या क्षेत्रासभोवारची ग्रहस्थाने चांगली असल्यास पैशाचे प्रेम असते. या क्षेत्रात त्रिकोण असता गूढविद्येची आवड असते.

या क्षेत्रात चौकोन असल्यास व्यक्ती दयाळू अंत:करणाची व रागीट स्वभावाची असते.

या क्षेत्रात जाळी असता वेडेपणा येतो. हातावर अंत:करणरेषा नसल्यास व्यक्तीचा स्वभाव कठोर व भावनाशून्य असतो.

या क्षेत्रात वर्तुळ असता डोळ्यांना त्रास होतो.

या क्षेत्रात हृदयरेषेजवळ नक्षत्र असल्यास

किंवा जीवनरेषेजवळ व धनरेषा यामध्ये नक्षत्र असल्यास व्यक्ती प्रेमी माणसाच्या आहारी जाते.

या क्षेत्रात शनिग्रहस्थानाखाली नक्षत्र असता कर्तृत्व असते. रविखाली असता वाङ्मय व कला या क्षेत्रात कीर्ती व संपत्ती मिळते. बुधाखाली नक्षत्र असल्यास फार कीर्ती मिळते.

या क्षेत्रात शनिग्रहस्थानाखाली कोणत्याही रेषेला न मिळता स्पष्ट असे गुणकचिन्ह असल्यास व्यक्ती गूढविद्येची उपासक असते.

या क्षेत्रात शनिग्रहस्थानाखाली, अस्पष्ट गुणकचिन्ह वाईट शरीरस्वास्थ्य दाखविते. गुरूखाली उधळेपणा, रविखाली गर्विष्ठपणा, बुधाखाली चोरटेपणा, बौद्धिक मंगळाच्या जवळ असल्यास रागीट स्वभाव, शारीरिक, मंगळाखाली भित्रेपणा आणि शुक्रग्रहस्थानाखाली कामुकवृत्ती दर्शविते.

मंगळक्षेत्रात हृदयरेषेला गुणकचिन्ह स्पर्श करीत असल्यास तिच्यावर प्रेमाच्या व्यक्तीची सत्ता असते. पण हेच चिन्ह मस्तकरेषेला स्पर्श करीत असल्यास प्रेमावर बुद्धी मात करते.

या क्षेत्रात तांबडे बिंदू असता खून होतो. अथवा गंभीर स्वरूपाची जखम होते.

हे क्षेत्र अरूंद असून अंत:करणरेषा लहान असता व मंगळ ग्रहस्थान मोठे असता क्रूरता असते.

हे क्षेत्र अरूंद असून बुध व मंगळ ग्रहस्थाने मोठी असल्यास मनोवृत्ती क्षुद्र असते.

हे क्षेत्र विस्तीर्ण असून मस्तकरेषा निर्दोष असता व अंगठ्याचे दुसरे पेर मोठे असता मनाचा मोठेपणा असतो.

हे क्षेत्र अरूंद असून बोटे आत वाकलेली असल्यास व्यक्ती कंजूष असते.

हे क्षेत्र अरूंद असून करंगळीचे तिसरे पेर मोठे असता व्यक्ती फसवी असते.


हे क्षेत्र रविग्रहस्थानाखाली अरूंद झाल्यास बुद्धीमत्ता चांगली असते.

हे क्षेत्र गुरूखाली अरूंद झाल्यास धार्मिकपणा कमालीचा असतो.

दोन्ही हातावर हे क्षेत्र अरूंद असून बुधग्रहस्थानावर जाळीचिन्ह असल्यास खोटे बोलण्याची सवय असते.

मंगळाच्या क्षेत्रातून रविग्रहस्थानावर रेषा जात असल्यास थोरामोठ्यांच्या मदतीने यश मिळते.

## प्राचीन चिन्हांचे दर्शन !



निरनिराळ्या हातावर दिसून येणाऱ्या प्राचीन चिन्हांचा येथे आम्ही विचार केलेला आहे.

**स्वस्तिक :** दयाळू, सत्पुरूष, ज्ञानी, उदार, भाग्यशाली, विद्वान यांच्या हातावर हे चिन्ह आढळते.

**मत्स्य :** हे चिन्ह शुभ असून ज्यांना सुख व श्रीमंती लाभते. अशा व्यक्तींच्या हातावर हे चिन्ह सापडते. गुरूग्रहस्थानावर हे चिन्ह असल्यास व्यक्ती उदार व धार्मिक असते. समाजात त्यांना मान मिळतो. स्त्रीच्या हस्ततलावर हे चिन्ह आढळल्यास तिला उत्तम पती, चांगला पुत्र व संपत्ती या गोष्टी प्राप्त होतात.

**शंख :** कोट्याधीश व अतिसुप्रसिद्ध व्यक्तीच्या हातावर हे चिन्ह आढळते. हे फार दुर्मिळ चिन्ह आहे.

**ध्वज :** जीवनात यशस्वी होणाऱ्या व्यक्तीच्या हातावर हे चिन्ह पाहण्यात येते. ही व्यक्ती अतिशय सद्गुणी असून तिला जीवनातील सर्व सौख्ये प्राप्त होतात.

**अष्टकोन :** धनवान व श्रीमंती व्यक्तीच्या हातावर हे चिन्ह आढळते.

**तलवार :** लष्करात उच्च अधिकारावर असणाऱ्या व्यक्तींच्या हातावर हे चिन्ह आढळते.

**धनुष्य :** हे चिन्ह जहागीरदार, राजासारखे ऐश्वर्य असणाऱ्या व्यक्ती, कोट्याधीश माणसे यांच्या हातावर आढळते. हे चिन्ह अतिशय दुर्मिळ आहे.

**रविचंद्र :** ही चिन्हे श्रीमंती व्यक्तींच्या हातावर आढळतात. या व्यक्तींना समाजात मान असतो. चंद्र असता त्या माणसांचा स्वभाव उदार असतो.

**कमळ :** हे चिन्ह साधू महात्म्यांच्या हातावर आढळून येते.

**झाड :** हे चिन्ह सर्व यशस्वी माणसांच्या हातावर आढळते.

**मंदिर :** समाजात ज्यांचा नावलौकिक आहे अशा व फार मोठ्या व्यक्ती यांच्या हातावर हे चिन्ह आढळते.

**त्रिकोण :** हे चिन्ह हातावर असता व्यक्तीत अपूर्व कर्तृत्वशक्ती असते. तसेच राजकारणकौशल्य तिच्या अंगी असते. राजकारणी व्यक्तींच्या हातावर बहुतेक वेळा हे चिन्ह सापडते. व्यक्ती यशस्वी असते. हे चिन्ह हातावर असल्यास व्यक्तीला लोकसमुदाय हाताळण्याचे चांगले कौशल्य असते.

**कुंभ :** हे चिन्ह राजसत्ताधारी व्यक्तींच्या हातावर आढळते.

**पर्वत :** विद्वान, वैराग्यशाली व ब्रह्मचारी अशांच्या हातावर हे चिन्ह आढळून येते.

**तराजू :** व्यापारात चांगले यश मिळविणाऱ्या व्यक्तींच्या हातावर हे चिन्ह दृष्टिगोचर होते.

**त्रिशूळ :** हे चिन्ह दुर्मिळ असते. ज्ञानी, वैराग्यसंपन्न, तत्त्वज्ञानी, व्यक्तीच्या हातावर हे चिन्ह आढळते. हे चिन्ह हातावर असता व्यक्ती उदार व दयाळू अंत:करणाची असते.

**अंकुश :** हे चिन्ह हातावर असता व्यक्तीजवळ अपरंपार संपत्ती असते.

**छत्री :** हे चिन्ह अतिशय दुर्मिळ असून सर्वांना वंदनीय व पूजनीय असणाऱ्या व्यक्तींच्या हातावर आढळते.

**भाला :** हे चिन्ह लष्करातील अधिकारी वर्गाच्या हातावर दिसून येते.

**माला :** यशस्वी व्यक्तीच्या हातावर हे चिन्ह दिसून येते.

**वेदी :** धार्मिक व्यक्तीच्या हातावर हे चिन्ह आढळते.

**तोरण :** दयाळू व्यक्तीच्या हातावर हे चिन्ह आढळून येते. व्यक्ती सत्त्वशील व भाग्यशाली असते.

**पालखी :** हे चिन्ह हातावर असता व्यक्ती ज्ञानी व वैराग्यसंपन्न असते.

## स्वभावदर्शन !

एखाद्या व्यक्तीच्या हातावर सहज नजर गेली किंवा व्यक्तीचा हात पाहिल्यावर त्या व्यक्तीचा स्वभाव महत्त्वाकांक्षी आहे. रागीट अथवा बढाईखोर आहे हे चटकन लक्षात येते. या प्रकरणात आम्ही व्यक्तीचे स्वभावगुण थोडक्यात वर्णन करीत आहोत.

बुधाचे बोट प्रमाणापेक्षा फार लहान असेल तर व्यक्ती तापट असते. अशा व्यक्तीने अतिश्रम करू नये.

अंगठ्याचे दोन्ही पेर सारख्या लांबीचे असतील, तर व्यक्तीला योग्यायोग्यतेची चांगली पारख असते आणि दोन्ही पेर जर विषम असतील, मस्तकरेषा सदोष असेल तर व्यक्तीला स्वतंत्र विचार करण्याची कुवत नसते.

अंगठा जर ताठ असेल तर अशा व्यक्तीने चांगल्या मित्र-मैत्रिणीत वेळ घालविण्याचा प्रयत्न करावा. अंगठा बाजूस वळणारा असेल तर व्यक्ती उधळी असते.

अंगठा लांब असून पाठीमागे वळलेला असेल तर व्यक्तीच्या ठिकाणी आपल्याकडे आकर्षित करून घेण्याची शक्ती असते. ही व्यक्ती लाघवी स्वभावाने इतरांची मने जिंकते.

मस्तकरेषा आणि जीवनरेषा एकाच बिंदूवर एकाच ठिकाणी उगमम पावलेल्या असतील व शनिग्रहस्थान योग्य जागी स्थित व उठावदार असतील तर व्यक्ती धोरणी असते.

अंगठ्याचा संधीभाग सपाट असून, अंगठा बराचसा मागे झुकलेला असेल तर व्यक्तीत तडजोड न करण्याची वृत्ती असते.

मध्यमा निमुळती असून टोकदार असेल व हात मिश्रस्वरूपाचा असेल तर व्यक्ती अंधश्रद्धाळू असते.

विवाहरेषा बुधग्रहस्थानावर येऊन खाली हृदयरेषेकडे वळलेली असेल तर व्यक्तीला वैधव्य किंवा विधुरत्व प्राप्त होते.

चंद्रग्रहस्थानावर जाळीचिन्ह असेल तर व्यक्तीला प्रवासाची आवड असते.

बोटांच्या पायथ्याशी बोटाला वेढा घालणाऱ्या एक किंवा अनेक रेषा असतील तर व्यक्ती नि:स्वार्थी असते.

अंगठ्यावर गोलाकार रेषा असल्यास माणसाच्या ठिकाणी चांगली योजकता असते.

हात ताठ, कडक व अरूंद असून बोटे लहान असतील तर ती व्यक्ती जुलमी असते.

मस्तकरेषा व आयुष्यरेषा यांच्या उगमस्थानामध्ये बरेच अंतर असून, संधीभाग सपाट असेल तर मनुष्य सहनशील स्वभावाचा असतो. हाताची सर्व बोटे पायथ्याशी एका सरळ रेषेत असतील तर मनुष्य यशस्वी असतो.

शुक्रग्रहस्थान अधिक उठावदार असेल आणि हृदयरेषा शनिग्रहस्थानावर उगम पावलेली असेल तर व्यक्ती भोगवादी असते.

मस्तकरेषा जीवनरेषेच्या आतील

भागातून उगम पावत असेल तर व्यक्ती स्वत:चे नुकसान करून घेते.

विवाहरेषेवर यवचिन्ह असल्यास घरातल्या घरात बदनामी होऊन व्यक्तीला लज्जास्पद जीवन जगावे लागते.

तर्जनी अशक्त व दुबळी असून मध्यमेपेक्षा लहान असता व्यक्ती लाजाळू असते.

मस्तकरेषा व जीवनरेषा एकमेकात मिसळलेल्या असतील, बोटांची अग्रे निमुळती असतील व हातावर शुक्रवलय खंडित झालेले असेल तर व्यक्ती भावनाविवश होणारी असते.

अंगठा उत्तम व जोरदार असू , मस्तकरेषा निर्दोष असेल, जीवनरेषा व मस्तकरेषा जेथे उगम पावतात त्यांच्यामध्ये थोडे व योग्य अंतर असेल तर ती व्यक्ती आत्मविश्वासू असते.

मस्तकरेषा सरळ असून हाताच्या टोकापर्यंत गेलेली असून, बोटे घट्ट पायथ्याशी फुगीर व पसरट असतील तर व्यक्ती अतिशय स्वार्थी असते.

रविग्रहस्थानावर नक्षत्रचिन्ह असेल तर मनुष्य श्रीमंत असूनही दु:खी असतो.

हाताची तर्जनी लांब असता व्यक्ती जबाबदारी पार पाडणारी असते.

बुधग्रहस्थानाखालीच मंगळ ग्रहस्थानावर त्रिकोणचिन्ह असता व्यक्ती मार्मिक बोलणारी पण विनोदी असते.

जीवनरेषेस समांतर जाणारी मंगळरेषा उठावदार असून गुरूग्रहाच्या खाली मंगळग्रहस्थानावर जाळीचिन्ह असेल तर व्यक्ती भांडखोर असते.

बुधग्रहस्थानावर त्रिकोणचिन्ह असता व्यक्ती मुत्सद्दी व राजकारणी असते.

शुक्रवलय शनिग्रहस्थानावर उगम पावून विवाहरेषेस मिळत असेल, नखे फार लहान असतील व मस्तकरेषा शृंखलायुक्त असेल तर व्यक्ती नेहमी छोटया चुका करते.

हाताची अग्रे चौकोनी असून बोटे गाठाळ असतील तर व्यक्तीला यांत्रिक कामाची आवड असते.

मंगळग्रहस्थानावर त्रिकोणचिन्ह असता व्यक्ती प्रसंगावधानी असते.

अंगठ्याचे दुसरे पेर रूंद असतील पण पहिल्या पेराहून लहान असेल आणि अंगठा मजबूत व टोकाशी चौकोनी असेल तर व्यक्ती हेकेखोर स्वभावाचीअसते.

बोटे जाड असून पेर घट्ट असतील व मस्तकरेषा सरळ व आखूड असेल तर व्यक्ती व्यवहारी असते.

चंद्रग्रहस्थान उठावदार असेल, हात त्रिकोणी असेल व चंद्रावर नक्षत्रचिन्ह असून मस्तकरेषा लांब व ढळती असेल तर व्यक्ती कल्पक बुद्धीची असते.

बोटांची अग्रे गोलाकार असून, पेराच्या दुसऱ्या संधी गाठाळ असतील तर व्यक्ती अतिथ्यशील असते.

जीवनरेषा व मस्तकरेषा यांच्यामध्ये सुरूवातीपासून पुष्कळ अंतर असेल, म्हणजे च एकमेकापासून दुरावलेल्या असतील तर व्यक्ती जुगारी असते.

हृदयरेषा शृंखलायुक्त असून ती शनि व गुरू यांच्या ग्रहस्थानामधून उगम पावत असेल, तर अशी व्यक्ती सर्वांशी मित्रत्वाने वागणारी असते.

बोटे लांबट असून बुध व गुरू ग्रहस्थाने योग्य जागी स्थित व उठावदार असतील, तसेच रविबोटाचे अग्र त्रिकोणी असून चंद्रग्रहस्थान प्रमाणशीर व मस्तकरेषा दीर्घ असता व्यक्ती बोलण्यात पटाईत असते.

रविग्रहस्थानावर वर्तुळ असून मस्तकरेषेवर नक्षत्रचिन्ह असता व्यक्ती साहित्यिक असते.

हाताच्या बोटाची प्रथम पेर इतर पेरांपेक्षा लांबीने अधिक असून, बोटे गाठाळ व पसरट असतील, तर व्यक्ती शोधक वृत्तीची असते.

हातावर अंत:करणरेषा आणि मस्तकरेषा यांच्यामध्ये फारच कमी अंतर असेल व अंगठा दोन पेरांच्या संधीजवळ फार ताठ असता, अशा माणसात सहनशिलतेचा अभाव असतो.

मंगळग्रहस्थान पुष्ठ व उठावदार असून त्यावर शस्त्रासारखे एखादे चिन्ह असेल तर व्यक्ती धैर्यशील असते.

बोटे विरळ असून मूठ झाकली असताही जर त्यामध्ये अंतर राहील, तर व्यक्ती जिज्ञासूवृत्तीची असते.

बोटे व हात लवचिक असता व्यक्ती मिळतेजुळते घेणारी असते.

बुधग्रहस्थानावर गुणकचिन्ह असल्यास व्यक्ती अप्रामाणिक असते.

गुरूग्रहस्थानावर त्रिकोणचिन्ह असता व्यक्ती मुत्सद्दी असते.

बुधग्रहस्थानावर जाळीचिन्ह असून शुक्रवलय आच्छेदित असता व्यक्ती फार चंचल मनोवृत्तीची असते.

हृदयरेषा व मस्तकरेषा यांच्यामध्ये फार कमी अंतर असेल तर व्यक्ती अभिमानी व हट्टी असते.

बोटे गाठाळ असून मस्तकरेषा स्पष्ट व अच्छेदित असून किंचित ढळती असेल तर व्यक्ती मीमांसक असते.

मस्तकरेषा तुटक नसून स्पष्ट असेल व ती थोडी ढळती असून, बोटे गाठाळ व मंगळग्रहस्थान पुष्ट असेल तर व्यक्तीचा विचारी स्वभाव असतो.

मस्तकरेषा सरळ असून करंगळीचे अग्रही चौकोनी असून बोटे लांब व गाठाळ असतील तर व्यक्ती गणिती असते.

रविग्रहस्थान निर्दोष असून मस्तकरेषा ढळती असेल तर अशी व्यक्ती निसर्गावर प्रेम करते.

ज्याच्या हाताची मूठ सहजपणे उघडली जात नाही व हात कडक असेल आणि बोटे एकमेकांस लागलेली असतील तर व्यक्ती लोभी असते.

## व्यवसायदर्शन !

हातावरून व्यक्तीच्या उद्योगधंद्याचे चांगले निदान करता येते. व्यक्ती कोणता व्यवसाय करणार आहे. अथवा कोणत्या उद्योगात तिला चांगला धनलाभ होणार आहे. वा कोणकोणते भिन्न भिन्न असे विशिष्ट व्यवसाय ती व्यक्ती करील किंवा तिने व्यवसाय करावा की नोकरीचे क्षेत्र निवडावे, हे हातावर असलेल्या ग्रहरेषा व विशिष्ट चिन्हावरून चांगले ध्यानात येते.

हाताची बोटे लांब व एकमेकास चिकटलेली असतील. करंगळी दुसऱ्या पेरापासून बाह्यभागी वक्री होईल. अथवा तिचे पहिले पेर रविबोटाकडे कोणाकृती वळलेला असेल किंवा ती पहिल्या व दुसऱ्या पेरांच्या सांध्यावर आत ओढली गेलेली असेल अथवा एकूण करंगळीच वळीव आकाराची होऊन पंजाप्रमाणे आत वळलेली असेल व इतर बोटापेक्षा बारीक असून मस्तकरेषा सरळ व

दुशाखी असून हस्ततल चपटे असेल आणि अंगठा लांब असून सरळ असेल तर व्यक्ती चांगली वकील असते.

हातावरील इतर ग्रहस्थानापेक्षा गुरूग्रहस्थान आपल्या जागी स्थित असून, चांगले उठावदार असेल. मस्तकरेषा व रविरेषा उत्तम असून करंगळी लांब आणि करंगळीचे प्रथम पेरहीलांबट असता व इतर बोटेपण लांब आणि सुंदर असतील याबरोबरच अंगठ्याचे दुसरे पेर पहिल्या पेरापेक्षा लांब असता अशी व्यक्ती चांगली न्यायाधीश असू शकते.

रविरेषा निर्दोष असून धनरेषेची एक शाखा रविग्रहस्थानावर गेली असेल व करतळाचा आकार निमुळता असेल तर व्यक्ती चित्रकार असते.

बुधग्रहस्थान निर्दोष असून अनेक उभ्या रेषा त्या स्थानावर आढळून आल्यास तसेच मस्तकरेषा थोडी वळलेली असेल आणि करंगळीचे दुसरे पेर दीर्घ व एकंदर करंगळी अनामिकेच्या दुसऱ्या पेरापेक्षा लांब असल्यास आणि सर्वसाधारण बोटापेक्षा हात लांब असता व्यक्ती चांगली डॉक्टर किंवा वैद्य होऊ शकते.

तर्जनी प्रभावी असून चंद्रग्रहस्थान योग्य जागी स्थित असून पुष्ट असेल, करंगळी टोकदार असेल, मस्तकरेषा दीर्घ असून थोडीशी ढळलेली असेल तर व्यक्ती वेदांती किंवा धर्मगुरू असते.

मस्तकरेषा लांब व उत्तम असून शाखायुक्त असेल, तसेच करंगळी टोकदार असून लांब असेल व गुरुग्रहस्थान विशेष प्रभावी असेल तर व्यक्ती राजदूत असते.

तळहात कठीण असून, रविरेषा अत्यंत प्रभावी असल्यास तसेच बोटांची टोके मोठी असल्यास व्यक्ती उत्तम पशुवैद्य असते.

रविग्रहस्थान प्रभावी असून, बोटे चौरस व रविग्रहस्थान निर्दोष तसेच अनामिकाही लांबसरळ व निर्दोष असून तिचे प्रथम पेर लांबट असतील आणि चंद्रग्रहस्थान योग्य जागी स्थित असून उठावदार असेल व बोटे विरळ असतील तर व्यक्ती शिल्पकार असते.

शुक्र चंद्रग्रहस्थाने उत्तम असून, बुधग्रहस्थानावर उभ्या रेषा असून, हात गोल हस्ततळ स्पर्शास कठीण पण पातळ असल्यास व्यक्ती चांगली परिचारिका असते.

हाताचा तळवा रूंद व पसरट असून रविबोट आणि बुधबोट निर्दोष असेल तसेच बुध आणि रविग्रहस्थाने चांगली पुष्ट असतील तर व्यक्ती शिंप्याचा किंवा चर्मकाराचा व्यवसाय करते.

बुधग्रहस्थान उठावदार असून बोटे लहान आणि बोटाची अग्रे टोकदार असतील व रविबोटही उत्तम बलवान असेल तर व्यक्ती कंपोझिटर असते.

सर्व बोटांची अग्रे जाड व मोठी असून, बोटे गोल, पातळ व चपटी असतील, अंगठा लहान असून करतळ कठीण व रूंद असेल तर व्यक्ती इंजिनिअर होते.

हातावरील चंद्रग्रहस्थान बसलेले असून करंगळी पुष्ट, टोकदार असून मस्तकरेषा उत्तम असेल, बोटांची नखे लहान असून बुधग्रहस्थान उठावदार असेल तर व्यक्ती साहित्यिक टीकाकार असते किंवा होते.

सूर्यग्रहस्थान स्वत:च्या जागी स्थित असून उंच व उठावदार असेल तसेच बोटे विरळ असतील, तर व्यक्ती कारकुनी पेशाची असते.

हात फार कठीण व रूंद असून, मध्यम, लांब व तिचे दुसरे पेर लांब असता, तसेच तळवा व बोटे राकट असतील तर व्यक्ती शेतीचा व्यवसाय करणारी असते.

शनिटेकडी रविच्या बाजूस झुकलेली असेल व मध्यमा प्रभावी असेल. बुधग्रहस्थान उंच व उठावदार असून बोटांची नखे निर्दोष असतील तर व्यक्ती नट असते.

अनामिका लांब असून हाताची बोटे पातळ, गोल व चपटी असतील. करतळ कठीण असून हातावर बऱ्याच रेषा दिसतील व मस्तकरेषा लांब व सरळ असेल तर व्यक्ती पाथरवट असते.

मस्तकरेषा लांब असून काहीशी ढळती व निर्दोष असेल व हात लहान असून रूंद असतील तर व्यक्ती जव्हेरी होते.

बोटे लांब व चौकोनी असून गाठदार असतील तसेच बोटांचे पहिले व दुसरे पेर उत्तम असून मस्तकरेषा लांब व सरळ असेल, करतळ पातळ असून शनिबोट जोरदार असून जाड असेल व त्याचे दुसरे पेर लांब असतील तर व्यक्ती गणित विषयात प्रावीण्य मिळविते.

गुरु, शनि, रवि व बुध ही चारही ग्रहस्थाने निर्दोष असतील व रविरेषा उत्तम असेल, तसेच मध्यमेचे दुसरे पेर लांब असून हाताची सर्व बोटे लांब असतील तसेच सर्व बोटांचे अग्रभाग मोठे असतील तर मनुष्य शिक्षक असतो.

अंत:करणरेषेपासून एक रेषा शनिग्रहस्थानावर गेली असेल आणि शनिबोट लांब व पुष्ट असेल. शुक्रग्रहस्थानावर कोनचिन्ह असून, शनि, चंद्र व शुक्र ही ग्रहस्थाने निर्दोष असतील तर व्यक्ती गायक होते.

रविबोटाचे तिसरे पेर चौकोनी असून शुक्रग्रहस्थान निर्दोष असेल व करतळ चौकोनी असल्यास व्यक्ती बागकाम करणारी माळी असते.

करतळ कोमल असून बोटे, गोल, चपटी व पातळ असतील हात मृदु व मुलायमम असून, अंगठाही बाहेरच्या बाजूस झुकणारा असेल, तर व्यक्ती उत्कृष्ट वादनकार होते.

आरोग्यरेषा बुधग्रहस्थानावर गेलेली असेल. ती शाखानिवित झालेली असेल. तसेच ती निर्दोष असून हातावर शुक्रवलय असेल व शुक्रवलयाच्या शेवटच्या टोकाशी नक्षत्रचिन्ह असेल तर व्यक्ती व्यापारी होते.

बोटे एकमेकास चिकटलेली असून चंद्र व शुक्रही ग्रहस्थाने निर्दोष असतील, हात अतिशय लहान असून अंत:करणरेषा गुरू व शनि या ग्रहस्थानामध्ये गेलेली असेल आणि करंगळी प्रभावी असून अनामिका पुष्ट असेल तर व्यक्ती धर्मगुरू होते.

तळवा पातळ असून धनरेषा खोलगट असेल, रविबोट आणि करंगळी ही दोन बोटे टोकदार व निमुळती असून बुधग्रहस्थान उत्तम असेल तर व्यक्ती हिशोब तपासनीस असते.


अंगठ्याचे पहिले पेर दुसऱ्यापेक्षा लांब जोरदार असेल तसेच अंगठा लांब व पुष्ट असून, चंद्रग्रहस्थान निर्दोष उठावदार व प्रमाणशीर असतील तर व्यक्ती नाविक होते.

मंगळमैदान निर्दोष असून उठावदार असेल, तसेच गुरुबोट व करंगळी जोरदार व उत्तम असेल तर व्यक्ति अधिकारी होते.

मंगळरेषा स्पष्ट असून अंगठ्याचे प्रथम पेर अतिशय जोरदार असतील, अंत:करणरेषा गुरुग्रहस्थानाच्या मध्यावर उगम पावत असून, मंगळग्रहस्थान प्रमाणबद्ध, उठावदार असेल तर व्यक्ती

लष्करातील सैनिक होते.

## रोगदर्शन !



कोणत्याही व्यक्तीचा हात हातात घेऊन त्याचे अवलोकन केल्यावर हस्तरेषाशास्त्राच्या अभ्यासकाला.... व्यक्तीला कोणता आजार झालेला आहे अथवा होणार आहे त्याचे निदान हातावरील त्वचेचा रंग, नखे आणि हातावरील रेषा व इतर चिन्हे पाहून व्यक्तीला कोणत्या वयात कोणता रोग होणार आहे व तो होऊ नये म्हणून त्याच्यासाठी कोणती पथ्ये पाळावी याचे मार्गदर्शन करता येते.

आरोग्यरेषेवर जवळजवळ तीन नक्षत्रचिन्हे असून त्या नक्षत्रचिन्हांच्या सभोवार चौकोन असेल तर व्यक्तीस कॅन्सर होतो. हे चिन्ह, हातावर चंद्रग्रहस्थानाच्या थोडे वरच्या बाजूस तळव्याच्या मध्ये असते.

हातावर चंद्रग्रहस्थानाचा अभाव असून मस्तकरेषा चंद्रग्रहस्थानावर आली असून, तिच्या शेवटी गुणकचिन्ह असेल किंवा एखादे अशुभचिन्ह असेल, तर व्यक्तीला वेड लागण्याची शक्यता असते.

मस्तकरेषा यवमालाकार असेल, तर व्यक्तीला डोकेदुखीचा त्रास होतो.

करतळावर लहान लहान असंख्यरेषा असतील तर व्यक्ती मानसिक रोगाने किंवा नेहमी होणाऱ्या लहानसहान आजाराने त्रस्त असते.

हातावर शनिग्रहस्थान बिघडले असेल तर व्यक्तीला वातविकार, पित्तविकार, बधिरता येणे अशा प्रकारचे आजार होतात.

अंत:करणरेषेवर तांबडे, पांढरे ठिपके असता व्यक्ती महारोगी असते.

स्त्रीच्या करतळावर आरोग्यरेषेवर अंत:करण रेषेच्याजवळ नक्षत्रचिन्ह असता स्त्रीला प्रसूतीच्या वेळी फार पीडा सहन करावी लागते.

जीवनरेषेवर काळे बिंदू असल्यास विषबाधा होण्याची शक्यता असते. जीवनरेषा पिवळसर खंडीत व काळसर असून ती सदोष असेल, तर व्यक्तीला प्रकृती अस्वास्थ्याची कायम तक्रार असते.

अंत:करणरेषा यवचिन्हांनी युक्त असेल व करतळावर गुरूग्रहस्थानाचा अभाव असेल तर व्यक्तीला हृदयविकार होतो.

स्त्रीच्या करतळावर किंवा चंद्रग्रहस्थानावर जाळीचिन्ह असेल तर ती हिस्टेरियाने पीडित असते. अथवा चंद्रग्रहस्थान प्रमाणापेक्षा फुगीर असेल व त्यावर एखादे गुणकचिन्ह असेल आणि मस्तकरेषा चंद्रग्रहस्थानावर गेलेली असून, हातावर शनिग्रहस्थानाचा अभाव असेल, तर तिला हिस्टेरिया होण्याची शक्यता असते.

हाताचा रंग पिवळसर पांढरा असून, नखे नळीच्या आकारासारखी पुढे वाकलेली व ती निस्तेज असतील, तसेच आरोग्यरेषा यवमाळाकार असेल तर व्यक्तीला क्षयरोग होतो.

अंत:करणरेषेवर बुधग्रहस्थानाखाली यवचिन्ह असता, व्यक्तीची हृदयक्रिया बंद पडून मरण्याची शक्यता असते. आरोग्यरेषेवर यवचिन्ह असेल तर हृदयविकार आनुवांशिक असतो.

आरोग्यरेषेवर नक्षत्रचिन्ह किंवा यवचिन्ह असेल तर व्यकतीला पंडुरोग होतो.

शुक्रग्रहस्थानावरून एक किंवा दोन बारीक रेषा निघून त्या मस्तकरेषेस मिळत असतील आणि या बारीक रेषेवर शुक्रग्रहस्थानावर यवचिन्ह असेल तर व्यक्तीला शुक्राचे आजार होतात.

आरोग्यरेषा अंत:करणरेषेस स्पर्श करून थांबत असेल तर व्यक्तीस हृदयविकार असतो.

हाताची त्वचा फार मृदु असून जीवनरेषेच्या शेवटातून एखादी रेषा निघून ती चंद्रग्रहस्थानावर जात असेल व आरोग्यरेषाही अस्पष्ट असेल तर व्यक्तीला संधीवात होतो.

अंत:करणरेषेवर सूर्यग्रहस्थानाखाली वर्तुळचिन्ह असता, व्यक्तीला डोळ्याचे आजार होतात किंवा अंधत्व संभवते. तसेच अंत:करणरेषा आणि रविग्रहस्थान यामध्ये नक्षत्रचिन्ह असता आकस्मिकपणे अंधत्व येते. शुक्रग्रहस्थानावर जाळीचिन्ह असता अंधत्व येण्याची शक्यता असते.

बुधग्रहस्थान आणि अंत:करणरेषा यामधील भागात यवचिन्ह असेल तरीही अंधत्व येते.

मस्तकरेषेवर काळे व निळे डाग असता व्यक्तीला विषमज्वर होतो.

मस्तकरेषा व हृदयरेषा एकमेकास मिळत असता व तेथे नक्षत्रचिन्ह असता, व्यक्तीला अर्धांग होणार असल्याचे सूचित करतो.

आरोग्यरेषा व मस्तकरेषा जेथे मिळतात तेथे लाल रंगाचे तीळचिन्ह असता व्यक्तीस पक्षघात होतो. याच्या जोडीला शनिग्रहस्थानावर नक्षत्रचिन्ह व आरोग्यरेषा जेथे संपते तेथे नक्षत्रचिन्ह असता व्यक्तीला पक्षघाताने मृत्यू येतो.

चंद्रग्रहस्थान फार उंच असता, व्यक्तीला आम्लपित्ताचा त्रास होतो.

(क्रमश:)

॥ जाणा येथें आहे सहाय्य सर्वांस ॥
मागे जें जें त्यास तें तें लाभे ॥

# साईकृपा

॥ माझा जो जाहला काया-वाचा-मनीं ॥
तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥

वर्ष ७२ | अंक २-३ | • श्री साईंच्या कृपाप्रसादाचे वार्तापत्र • | मे-जून, १९९३


## ....नाही तर माझ्या जावयाचा उजवा पाय कापावा लागला असता!

(श्री. सुशील मसने, अकोला यांच्याकडून):

**ज्या**वर माझी नितांत श्रद्धा आहे, दृढविश्वास आहे, अश्या परमेश्वररूपी साईबाबांचा संकटकाळी आलेला अनुभव मी इथे कथन करीत आहे.

मी अकोला येथे अणुजीव सहाय्यक या पदावर कार्यरत आहे. डिसेंबर, १९८९ मध्ये माझी अचानक काहीएक कारण नसताना यवतमाळ येथे बदली करण्यात आली होती व माझ्या जागी दुसऱ्या ठिकाणाहून माणूस देण्यात आला होता. समोरच्या व्यक्तीला यवतमाळ, अमरावती व अकोला ह्या तीन ठिकाणांवर कोठेही बदली पाहिजे होती; परंतु त्याचा मला तडाखा बसला. ती व्यक्ती अकोल्याला आली व मला यवतमाळला जावे लागले. माझे घर, आई-वडील, भाऊ हे सर्व अकोला येथेच आहेत, त्यामुळे आम्ही सर्वजण अडचणीत सापडलो होतो. माझ्यासमोर एकच पर्याय होता.... "श्री साईबाबा".... मी रोज श्री साईबाबांचा जप करीत होतो, त्यांना प्रार्थना




करीत होतो, माझी बदली रद्द होऊ दे म्हणून. माझा कशाशीही काहीही संबंध नसताना या प्रकरणात मी गोवला गेलो होतो; पण माझ्यावर खरोखरच श्री साईबाबांची कृपा झाली, श्री साईबाबा मला प्रसन्न झाले. माझी बदली रद्द झाली आणि दीड महिन्यातच जानेवारी, १९९० मध्ये मी अकोल्याला पुन्हा रूजू झालो. मला बहुतेकजण म्हणाले, तुमची राजदरबारी ओळख असणार! तुमची मोठी पोच असणार! पण मी एक मध्यमवर्गीय कुटुंबातील माणूस. माझी जी काही पोच आहे, जी काही राजदरबारी ओळख आहे ती साईबाबांकडेच. त्यांच्या कृपेमुळेच मी अकोला येथे पुन्हा बदलून आलो.

माझा दुसरा अनुभव.... माझे जावई यांना अकोला-अमरावती हायवेवर, माझ्या बदली-काळात, म्हणजे जानेवारी, १९९० मध्ये अपघात झाला होता. त्यांच्या उजव्या पायाची पोटरी पूर्ण छिन्नविच्छिन्न झाली होती. मांडीचे हाड व डावा पाय फ्रॅक्चर झाला होता. त्यांना दवाखान्यात आणल्यानंतर त्यांचा उजवा पाय कापावा लागतो की काय,

अशी परिस्थिती होती; पण श्री साईबाबांच्या कृपेमुळे ते सर्व टळले. माझ्या पुतण्याने श्री साईबाबांची आर्त स्वरात आळवणी केली होती की आमचे जावई जर पुन्हा दोन्ही पायांनी चांगले झाले, तर आम्ही शिरडीला दर्शनाला येऊ! त्यांच्या वजनाइतके पेढे वाटू! आज साईबाबांच्याच कृपेमुळे माझे जावई दोन्ही पायांनी चालतात.... नाहीतर माझ्या जावयाचा उजवा पाय कापावा लागला असता! •

# गाडीला फार मोठा अपघात होऊनही आम्ही वाचलो!

(सौ. सरोज शिंपाळे, नायगाव यांच्याकडून):

आदल्या दिवसापासून शिरडीला जाण्याची आमची जय्यत तयारी सुरू झाली. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून सर्व काम, तसेच देवपूजा आटोपून आम्ही जीपमध्ये बसलो. जीपमध्ये बरीच मंडळी होती. गाडी अगदी गच्च भरली होती. आम्ही सगळे साईबाबांच्या दर्शनासाठी आतुरलो होतो. या पवित्र भावनेने मन कसं अगदी भारावून गेलं होतं! महादेवाचं दर्शन घेतलं आणि घरच्या मंडळींचा निरोप घेतला. गाडी निघाली. जीपमध्ये अगदी शांत वाटत होतं. गावाला चाललो आहोत, या समजुतीने माझी मुलगी आनंदाने खूप नाचली. आम्ही सर्वजण खुष होऊन खूप हसलो, जणू आता कधी पुन्हा हसणार नाही या भावनेनं! तो प्रसंग संपला. गाडीत निरव शांतता पसरली. बाबांची कॅसेट सुरू होती. प्रत्येकाच्या मुखी साईजप चालू होता. सकाळची वेळ होती. गाडी अर्धा रस्ता पार केल्यानंतर पुढे एक मांजर गाडीला आडवं जाताना दिसलं. मांजराला पाहताचक्षणी माझ्या काळजात धस्स् झालं. मी माझ्या पतीला गाडी थांबवा म्हणाले; पण माझे पती डॉक्टर असल्यामुळे ह्या असल्या गोष्टींवर त्यांचा विश्वास नव्हता. ते म्हणाले, चला, काही होत नाही.

पुढे काही अंतरावर दुसरे एक मांजर रस्त्याच्या आडवे गेले. माझ्या मनात शंका-कुशंकांचं काहूर माजलं. तर्क-कुतर्कांच्या विचारात बाराशिवच्या मारुतीचे मंदिर कधी आले ते कळलेच नाही. मी यांना म्हणाले, आज शनिवार आहे. तुम्ही दर्शन घेऊन या! आम्ही गाडीतूनच दर्शन घेतो. तुम्ही जाऊन या! ते म्हणाले, मीही गाडीतूनच दर्शन घेतो. हे ऐकून मी काहीशी नाराज झाले. आम्ही सर्वांनी त्या महाहनुमानाला जीपमधूनच हात जोडले. त्याच्या शेंदुराचा रंग त्या अंधुक प्रकाशातही डोळ्यात मावत नव्हता.

सकाळ होत होती. तांबडं फुटलं होतं. सूर्योदयाच्या आगमनाला मात्र अजून वेळ होती. पाखरांची गोड किलबिल कानावर येऊ लागली होती. मी माझ्या पतीच्या शेजारी होते. माझ्या मांडीवर माझी एक वर्षाची निरागस गोड मुलगी निश्चिंत झोपली होती.

तिला जणू असंच वाटत असावं, माझ्या आईच्या मांडीवरून मला कोण काढून घेणार!

आमच्या सर्वांच्या लक्षात यायच्या आतच आमच्या गाडीसमोर एक मोठं वळण आलं. काय होतंय, हे कळण्याच्या आधीच आमची गाडी कलंडली. काय होतंय नि काय नाही, काहीच कळत नव्हतं. माझ्या लक्षात आलं तेव्हा माझी मुलगी माझ्या मांडीवर नव्हती. माझे पती माझ्या शेजारी नव्हते. जेव्हा हे मला कळलं तेव्हा माझ्या काळजाचं पाणी झालं. माझ्या डोळ्यांपुढे गर्द काळोख पसरला. सर्व आठवल्यावर विजेचा शॉक बसावा एवढ्या संवेदनेनं मला आठवलं की ड्रायव्हिंग करणाऱ्याला जास्त मार लागतो म्हणे! (नेहमीच्या अपघाताच्या बातम्या वाचल्यावरून हे मला जाणवलं.) मी हबकूनच गेले; पण थोड्याच वेळात साईबाबांच्या कृपेने माझे पती मला दिसले. आम्ही गाडीतले सर्वजण एकदम सुखरूप होतो. कोणालाही काही झाले नव्हते. हे पाहून आमच्या डोळ्यांतू। आनंदाश्रू वाहू लागले. त्या कठिण प्रसंगी आम्हाला माणुसकीचे दर्शन घडले. माधवदादांनी सर्वांचे सांत्वन केले. आम्ही एकमेकांना धीर देण्याचे काम केले. जो तो येऊन आमची विचारणा करीत होता, सांत्वन करीत होता आणि कोणाला काही झालं नाही, हे पाहून, ऐकून स्तंभित होत होता; कारण गाडीची मोड-तोड झालेली अवस्था व आम्ही सर्व सहिसलामत पाहून असं वाटणं साहजिकच होतं. ट्रकवाले आपले ट्रक थांबवून आमच्या मदतीला धावले. त्या जमलेल्या सर्वांच्या तोंडून देवाची कृपा, ईश्वराची कृपा हेच शब्द ऐकायला येत होते. त्यातला एक म्हणाला,

"तुमचे सर्वांचे भाग्य थोर म्हणूनच तुम्ही सर्वजण जिवंत आहात!"

कणालाही काहीही दुखापत झालेली नव्हती.

आम्ही मात्र मनोमन साईबाबांचे मुख न्याहाळत होतो. डोळे मिटून श्री साईंची अगाध लीला बघत होतो. त्यांचे दर्शन तिथेच होत होते. •

# चित्त भयग्रस्त झाले.... बाबांनी निवारिले!

(कु. संगीता प्रतापवार, भोकर, नांदेड यांच्याकडून):

आमचे कुटुंब मध्यमवर्गीय आहे. श्री साईबाबांवर आमची श्रद्धा आहे. आजपर्यंत साईबाबांचे अनेक अनुभव मी ह्या कानांनी ऐकले व या मुखाने वाचले; परंतु प्रत्यक्ष अनुभव मिळण्याचा योग जून १९९२ ला आला. एके दिवशी सायंकाळच्या वेळेला माझ्या कानातील (रिंगेतील) नारळ हरवले. घरात इकडे-तिकडे शोध घेत असताना पाहुणे आले व आमचा शोध तसाच राहिला. त्यावेळी सूर्य मावळतीकडे झुकला होता. थोड्या वेळाने अंधार पडला. पावसाळा सुरू झाला असल्याने विजेचा लपंडाव चालू होता. आकाशात विजा कडाडत होत्या. वारा कानात वारं शिरल्यावर वासरू जसं मोकाट उंडारतं तसा घोंघावत होता. ढगांनी एकच गर्दी केली होती. आम्हाला वाटत होतं की आता मूसळधार पाऊस होणार! साफसफाई केली असल्यामुळे नाल्यात नारळ गेले असावे, असे वाटत होते आणि जर का ते नाल्यात गेले असेल तर पाऊस आल्यावर नाल्यातील नारळ वाहून जाईल, या विचाराने आम्ही चिंतित झालो. एखाद्या लहान मुलाला भीती वाटली की ते जसे आपल्या आईकडे धाव घेते त्याप्रमाणे बाबांच्या फोटोजवळ जाऊन एकाग्र चित्ताने त्यांना विनवणी केली,

"बाबा, आमचे नारळ सापडू द्या! आम्ही सकाळी तुमच्या नावाने प्रसाद वाटू!"

....आणि बाबांनी आमचे गाऱ्हाणे ऐकले. दुसऱ्याचदिवशी १० वाजता माझे सहजच टाकीखाली लक्ष गेले. माझ्या दृष्टीस तेच सोन्याचे नारळ दिसले. मी खूपच आनंदित झाले. श्री साईबाबांनी आमची विनवणी ऐकली होती. आमच्या साईमाऊलीने आमच्यावर कृपा केली होती. श्री साईबाबांचा कृपाशीर्वाद असाच सदैव सर्वांच्या पाठीवर राहो व देहात प्राण असेपर्यंत त्यांचे नाम निरंतर मुखी राहो, अशी त्यांच्याच चरणी प्रार्थना. •


## डायरी मिळाली नाही काय?

श्री साईबाबा संस्थान, शिरडीतर्फे आश्रयदाता व आजीव सभासदांना सन १९९३ च्या दैनंदिनी पाठविण्यात आलेल्या आहेत. त्यातील काही दैनंदिनी पत्ता बदललेला/अपूर्ण पत्ता असा शेरा मारून पोष्टाद्वारे संस्थानकडे परत आलेल्या आहेत.

ज्या सभासदांना दैनंदिनी मिळालेल्या नाहीत त्यांनी आपला पूर्ण पत्ता (बदललेला असल्यास तसे लिहून), सभासद नंबर वगैरेच्या संपूर्ण माहितीसह संस्थानच्या शिरडी किंवा मुंबई कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा पत्राद्वारे कळवावे, ही विनंती.

—कार्यकारी अधिकारी

# आभार !



'श्री साईलीला'तील आवाहनाला खालील साईभक्तांनी प्रतिसाद दिला आहे. आम्ही त्यांचे आभारी आहोत. ह्या साईभक्तांना बाबांचा आशीर्वाद म्हणून बाबांच्या शिरडी येथील धुनीतील पवित्र उदी पाठविण्यात आली आहे.

(१) श्री. जगदिश पांडुरंग सुंके, पनवेल, रायगड. (२) श्री. वाय. नरसिंहमूर्ती, अक्कलकोट रोड, सोलापूर. (३) श्री. अरूण प्रभाकर देसाई, मारगोवा, गोवा. (४) श्री. किशोर रामसिंह गवालपंची, चंद्रपूर. (५) श्री. गणेश महादेव गायकवाड, महर्षि नगर, पुणे. (६) श्री. श्रीकांत शंकरराव निशाणदार, भवानी पेठ, सोलापूर. (७) श्री. सुधीर वामन पाठक, हैद्राबाद, आ.प्र. (८) श्रीमती विमल के. रहाणे, उल्हासनगर, ठाणे. (९) श्री. विष्णू नामदेव संखे, कल्याण, ठाणे. (१०) डॉ. एन्. पी. गवई, नागपूर. (११) रोशन मोहन भुगांवकर, नागपूर. (१२) श्री. अर्जुन किसनराव पडवळ, राजकोट, गुजराथ. (१३) श्री. दिलीप वासुदेव सावंत, कणकवली, सिंधुदुर्ग. (१४) कॅप्टन विष्णू शिंदे. (१५) सु. अ. काळण, कळवा, ठाणे. (१६) सौ. तारा अनंत सहस्त्रबुद्धे, नांदेड. (१७) श्री. सीताराम एम्. निंबाळकर, भुसावळ, जळगांव. (१८) सौ. मधुपां. गायकवाड, नवीन पनवेल, रायगड. (१९) श्री. चंद्रकांत रामचंद्र देशमुख, वाळवा, सांगली. (२०) श्री. विजय लक्ष्मण राणे, कल्याण, ठाणे. (२१) सौ. गुलाब सदानंद बोंद्रे, असनोडा, गोवा. (२२) श्री. कृष्णकुमार दत्तात्रय आजगांवकर, बोरिवली (पू.), मुंबई. (२३) श्री. अरूण ठाकूर, पनवेल, रायगड. (२४) श्री. पांडुरंग गोपाळ मिठबांवकर, बांद्रा (पू.), मुंबई. (२५) कु. सविता उदयभानू रावराणे, वरळी, मुंबई. (२६) साधना गंगाधर सामंत, डोंबिवली (प.), ठाणे. (२७) कु. मनीषा र. रावराणे, डोंबिवली (पू.), ठाणे. (२८) श्री. किसनराव सुभाना वंजीर, मिरज, सांगली. (२९) श्री. दिलीपभाई एम्. प्रधान, अहमदाबाद, गुजराथ. (३०) श्री. आर. सेठी, औरंगाबाद. (३१) श्री. सतीश आवळे, सांताक्रूझ (पू.), मुंबई. (३२) श्री. सतीश एस्. गुजर, सोलापूर. (३३) श्री. दिगंबर गंगाराम केरकर, दादर (पू.), मुंबई. (३४) श्री. बाळकृष्ण बापूराव आकडकर, पुणे. (३५) कु. चंद्रभागा वसंत नलावडे, करवीर, कोल्हापूर. (३६) श्री. अशोक श्रीधर कर्णिक, नवी पेठ, पुणे. (३७) श्री. बबन बापूसाहेब बहिरट, बोपोडी, पुणे. (३८) मोहिनी एम्. नाईक, फोंडा, गोवा. (३९) श्री. भालचंद्र बी. मेस्त्री, मीरा रोड (पू.), ठाणे. (४०) सौ. वनिता संजय वढारकर, विश्राम बाग, सांगली. (४१) श्री. रामचंद्र भटू बडगुजर, नाशिक. (४२) श्री. रविंद्र विष्णू गांवकर, गोवा. (४३) श्री. अनंत गोविंद रहाटवळ, भांडुप, मुंबई. (४४) श्री. कृष्णाजी एस्. लोटणकर, संगमेश्वर, रत्नागिरी. (४५) श्री. अमृत शंकरराव गडकरी, नांदेड. (४६) श्री. सुभाष तुकाराम मुणगेकर, इचलकरंजी. (४७) श्री. व्ही. एस्. बी. पाटील, लातूर. (४८) श्री. केशव हरिहर पटवर्धन, सांगली.

## संसारात माझ्या मला कशाचीही कमतरता नाही !

(श्रीमती एस्. आर. गावणकर, सांताक्रूझ, मुंबई यांच्याकडून):

**श्री** साईनाथांच्या

"जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस।
मागे जे जे त्यास ते ते लाभे"

या वचनाची प्रचिती मला अत्यंत रोमांचकारी प्रसंगातून आलेली आहे.

साईंची ज्याच्यावर कृपा झाली तो भक्त फारच नशिबवान म्हटला पाहिजे; कारण एकदा का साईंची आपल्यावर कृपा झाली की त्या माणसाचे जीवन सुरळीत चालणारच, ही बाबांवरची आम्हा उभयतांची श्रद्धा आहे.

मी व माझे पती आम्ही दोघे साईभक्त आहोत. कुठलाही प्रसंग असो, साईंचे नाव आमच्या तोंडी सारखे असते. माझे पती आज बाबांच्या कृपेने सरकारी नोकरीत मोठ्या हुद्द्यावर आहेत. ही मोठी मानाची नोकरी बाबांनीच मिळवून दिली; कारण परीक्षा पास होऊन काही असे दिसले. मला पुढून आणि पाठून कोणीतरी खेचत होते. मी खूप रडत होते. साई.... साई.... साई.... अशी जोरजोरात ओरडत होते. माझ्यावरील संकट काही दूर जात नव्हते. बाबा.... बाबा.... मला यातून सोडवा, असा माझा सारखा धावा चालला होता. बऱ्याच वेळाने मी शांत झाले. माझ्यावरील संकट दूर झाले होते.

दुसऱ्या दिवशी पहाटे माझे पती देवाची पूजा करीत असताना मी त्यांना हा घडला प्रकार सांगितला व नोकरीवर जात आहात, जपून काम करा, असं सांगितलं. ते "बरं" म्हणाले व नोकरीवर गेले; परंतु त्याचदिवशी नोकरीवर त्यांच्यावर नको ते संकट ओढवले गेले. त्यात त्यांची काहीही चूक नसताना त्यांच्यावर फुकट आळ घालण्यात आला. घरी आले. म्हणाले, "मी मेलो ! माझी काहीही चूक नसताना मला यात गोवले गेले. मी काय करू ?" आम्ही

# बाबांच्या कृपेने माझा भाचा मृत्यूच्या दारातून परतला!

(सौ. माधवी ढगे, सोपारा, ठाणे यांच्याकडून):

**मी** फार पूर्वीपासून आजपर्यंत साईकृपेचे अनुभव 'श्री साईलीला' या माझ्या आवडत्या मासिकातून व इतरांच्या तोंडून ऐकत आले आहे. या कलियुगातसुद्धा माझ्या बाबांचे चमत्कार घडत असतात, यावर विश्वास ठेवावाच लागतो. ज्यांची त्यांच्यावर श्रद्धा आहे, भक्त आहे, त्यांना याचा प्रत्यक्ष अनुभव येत असतो.

माझा भाचा कुमार आशिश नरेंद्र सासवडकर, वय वर्ष १६, याला अगदी लहानपणापासून हृदयाचा त्रास आहे. जराशी जरी त्याने धावपळ केली तरी त्याची नखे–ओठ अगदी काळे-निळे पडत. त्याला श्वासोश्वास घेणे अवघड होई. पुष्कळ इलाज केले; परंतु काहीच फरक पडत नव्हता. शेवटचा उपाय म्हणजे हृदयाचे ऑपरेशन करणे. आशिशचे घराणे साईभक्तीचे. स्वतः आशिश साईभक्त आहे. दरवर्षी त्याची शिरडीची वारी ठरलेली असते. त्याच्या घरी साईंची पूजा-अर्चना, आरती नित्य होत असते. एक दिवस श्री साईबाबांच्या तसबिरीमध्ये बाबांच्या कपाळापासून गळ्यापर्यंत लाल-लाल पिंजरीसारखे डाग दिसू लागले. हे पाहून आम्ही सर्वजण आश्चर्यचकित झालो. काही दिवसांनी एक दिवस आशिश मित्रांबरोबर सहलीला गेला असता त्याची तब्येत अचानक बिघडली व ते सर्वजण सहल अर्धवट सोडून घरी परतले.

आशिशने आपल्या आईवडिलांना ठाम सांगितले की माझे काय व्हायचे ते होऊ द्या! डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे माझ्या हृदयाचे ऑपरेशन करून घ्या! माझी बाबांवर पूर्ण श्रद्धा आहे. त्यांच्या कृपेने माझे ऑपरेशन यशस्वी होऊन मी पूर्ण बरा होईन.

आम्ही सर्वांनी बाबांवर श्रद्धा ठेवून आशिशला जसलोक हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे त्याच्या रक्तातील हिमोग्लोबीन वाढल्यामुळे ऑपरेशन लांबणीवर पडले. त्यातच त्याच्या हृदयाची फिल्म घेऊन हृदयावर कुठेकुठे शस्त्रक्रिया करणे जरूरीचे आहे ते पहाण्यात आले. त्यावरून आम्हास कळले की शस्त्रक्रिया फारच अवघड आहे.

आशिश बाबांना आळवित होता. आम्हीसुद्धा त्या दयाघनाला विनवित होतो, सर्वकाही सुखरूपपणे पार पडू दे! एकदाची आम्हाला ऑपरेशनची तारीख मिळाली. आम्ही सर्वांनी बाबांचा धावा सुरू केला.

वाचकहो, श्री साईबाबांचा महिमा काय वर्णावा! आशिशच्या बाबांवर असणाऱ्या नितांत श्रद्धेमुळे दुपारी २ वाजल्यापासून चालू झालेले ऑपरेशन संध्याकाळी ६ वाजता सुखरूप पार पडले व डॉक्टरांनी सांगितले की जर १२ तासाच्या आत आशिश शुद्धीवर आला तर त्याच्या जीविताचा धोका टळेल. खरोखर, बाबांची लीला अपार आहे. त्यांच्या आशीर्वादामुळे आशिश १० तासांच्या आत शुद्धीवर आला. त्याने डोळे उघडल्याचे जेव्हा नर्सने आम्हाला सांगितले तेव्हा आम्हा सर्वांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू घळघळ वाहू लागले. आम्ही बाबांचे आभार मानले, धन्य तू साईनाथा! तुझ्या कृपेमुळे मरणाच्या दारात उभा असलेला आशिश परत आमच्यात आला. तू त्यास पुनर्जन्म दिलास.

आणि हो, सांगायचे राहूनच गेले, सर्व यथासांग पार पडल्यावर बाबांच्या तसबिरीतील ते लाल डाग नाहीसे होऊन ती तसबीर परत पूर्ववत दिसू लागली!

आज या घटनेला दोन महिने झाले. आशिशची तब्येत हळूहळू सुधारत आहे. त्याची नखे व ओठ लाल-लाल दिसू लागले आहेत. त्याचे नाचणे-बागडणे चालू झाले आहे.

वाचकहो, बाबांची नित्य मनोभावे भक्ती केली तर या कलियुगातसुद्धा बाबा आपली इच्छा पूर्ण करतात, हेच हा अनुभव सांगत नाही का! ●

## 'श्री साईलीला' बाबतच्या तक्रारींसाठी

'श्री साईलीला' संबंधातील
पत्ता चुकीचा असणे,
अंक न मिळणे,
एकापेक्षा अधिक अंक मिळणे
व मजकुराबद्दलच्या सर्व
तक्रारींची दखल
**'श्री साईलीला' कार्यालय, मुंबई**
येथून घेतली जाते.
तरी, आपल्या कोणत्याही
'श्री साईलीला' बाबतच्या तक्रारींसाठी
कार्यकारी संपादक,
**'श्री साईलीला'**
८०४ बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड,
दादर, मुंबई–४०० ०१४.
या पत्त्यावर लिहावे.

**–कार्यकारी संपादक**

वर्षे झाली तरी ते कारकूनच होते. त्यांना वर उल्लेख केलेला हुद्दा मिळत नव्हता.... आणि एक दिवस उजाडला. तो दिवस गुरूवारचा होता. धनत्रयोदशी होती. दुपारचे चार वाजले होते. माझ्या घरामध्ये उंबरठ्याच्या वर बाबांचा मोठा फोटो लावलेला आहे. माझे लक्ष सहज बाबांच्या फोटोकडे गेले. त्या फोटोमध्ये बाबा खूप हसताना मला दिसले. मी माझ्या मुलाला म्हटले, "बाबा बघ हसताहेत!" एवढं मुलाशी बोलून मी बाबांशी बोलू लागले, "बाबा, तुम्ही एवढे हसरे का बरं दिसताय? यांना आज ऑफिसरचे लेटर वगैरे मिळणार आहे की काय? आज ते ऑफिसर होतायत की काय?" एवढे बोलून मी माझ्या कामाला लागले. संध्याकाळी सातच्या सुमारास माझ्या पतीने पेढ्यांचा बॉक्स हातात घेऊनच आनंदात घरात प्रवेश केला. घरात पाऊल ठेवत-ठेवतच ते म्हणाले, "आज दुपारी चार वाजता मला लेटर मिळाले. मी ऑफिसर झालोय!" हे त्यांच्या तोंडचे शब्द ऐकून मी अगदी आनंदाने भारावून गेले. मनातल्या मनात बाबांचे आभार मानून झाला प्रकार पतीला सांगितला.

मला एक मुलगा व मुलगी आहे. बाबांच्या कृपेने आमचा संसार सुरळीत चालला आहे. कुठल्याही संकटप्रसंगी बाबांचे नाव घेतले की त्या संकटाचे निवारण होते.

दुर्धरसमयी बाबांचा धावा करताच बाबा त्वरित धावून येतात. माझी मुले व आम्ही घराबाहेर पडण्याआधी बाबांची उदी लावतो.

एक दिवस मला माझ्या स्वप्नात माझ्यावर फार मोठे संकट गुदरले आहे, दोघांनी बाबांचा धावा सुरू केला. मी बाबांना म्हटले, बाबा, माझ्या पतीची नोकरी, हा हुद्दा तुम्हीच दिलात. आता नोकरी जायची पाळी आली. तुम्हीच काय ते बघा! तुमचा भक्त आज संकटात आहे. तुम्ही यातून आम्हाला सोडवा! शिरडीच्या बाबांचे पाय आठवून त्यावर डोके आपटून मनातल्या मनात रडू लागले. बाबा, माझ्या घराची अब्रू तुमच्या हातात आहे. तुम्ही माझ्या घराची लाज राखा! असे व्हायचे होते तर तुम्ही एवढा मोठा हुद्दा दिलात तरी कशाला? असे म्हणून मी जोरजोरात रडू लागले. तेवढ्यात बाबांचा दिलासेचा आवाज माझ्या अंतर्मनाला ऐकू आला, "मुली, श्रद्धा ठेव! तुझ्या नवऱ्याला काहीही होणार नाही." त्याचप्रमाणे, बाबांनी स्वप्नात दृष्टांत दिल्याप्रमाणे, अगदी माझ्या पतीवरील संकट दूर झाले. नोकरीवर त्यांच्यावर आलेले गंडांतर नाहीसे झाले. अशी अनेक संकटे बाबांनी निवारण केली आहेत. बाबांच्या कृपेमुळेच माझ्या संसारात मला कशाचीही कमतरता नाही. आज जे काही आमच्याकडे आहे ते बाबांच्या आशीर्वादामुळेच.

दर सहा महिन्यांनी माझे पती शिरडीला जाऊन बाबांचे दर्शन घेतात. मी व माझी मुले शिरडी संस्थानचे आजीवन सदस्य आहोत. आम्हाला घरपोच बाबांची उदी व प्रसाद शिरडीहून येतो. केवढे हे आमचा भाग्य! 'श्री साईलीला' आमच्या घरी आम्ही नियमित मागवीत असतो.

बाबांच्या कृपेमुळेच माझ्या इच्छेनुसार आम्हाला मोठे निवासस्थान मिळाले आहे. बाबांची कृपादृष्टी अशीच सर्व साईभक्तांवर राहो, हीच श्री साईचरणी प्रार्थना! ●

# ॥ ऋग्वेद ॥





— साईली

अतिप्राचीन अशा वेद व पुराणांना भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते वर्णनातीत व शब्दातीत आहेत. त्यांचा विस्तार अत्यंत प्रचंड असून महाकाय असा आहे. म्हणूनच महाकवी कालिदासाने रघुवंशाच्या प्रारंभी हाच विचार प्रगट केला आहे. तो म्हणतो,

''कुठे तो सूर्यापासून निर्माण झालेल्या रघूचा वंश वेद आणि कुठे माझी त्या विषयातील अत्यल्प बुद्धी. अत्यंत दुस्तर आणि विस्तीर्ण सागर लहानश्या होड्याने पार करण्याप्रमाणे हे साहस आहे.''

याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे वेद. हा एक महान ज्ञाननिधीच आहे. ''आपले वेद, आपली पुराणे'', असे आपण म्हणतो. याचा अर्थ असा की त्यांचे समग्रपण आपणास ज्ञात असले पाहिजे. परंतु वेद म्हणताना हे समग्रपण आपल्याला तितकेसे जाणवत नाही. इतकेच नव्हे तर त्याच्या बाह्यस्वरूपाची ओळख करून घेणेही आपल्याला अवघड वाटते.

''ह्या वेदांत व पुराणांत आहे तरी काय?'' अशी



उत्सुकता प्रत्येकालाच असते. ते कुतुहल पुरे करण्यासाठी आतापर्यंत काही प्रयत्न झालेले आहेत एकूण १८ महापुराणांपैकी पद्म, मत्स्य, लिंग, विष्णु, शिव, स्कंद अशा काही पुराणांची पूर्वी भाषांतरे झालेली आढळतात. वेदांचेही अनुभूतीपूर्ण अध्ययन करणे अवघड आहे. पण एवढे निश्चित की या ज्ञानसागरात किंचित जरी डोकावून बघितले तरी त्याच्या केवळ दूरदर्शनाने सुखावता येईल.

वेद म्हणजे काय? वेद याचा अर्थ ज्ञान. परंतु वेद हे केवळ ज्ञान सांगणारे ग्रंथ वाङ्मय नाही तर त्या ज्ञानातील प्रत्ये‍क किरणाचा या जगताशी, या विश्वाशी कोणता संबंध आहे व त्या ज्ञानाचा विनियोग काय, याची उद्बोधक चर्चा करणारा तो ज्ञानसागर आहे. जोपर्यंत त्या ज्ञानाचा विनियोग करता येत नाही तोपर्यंत ते ज्ञान अकिंचन होय! कारण विनियोगाशिवाय ज्ञानाला किंमत नाही. ज्ञानाच्या विनियोगामुळेच त्याचे वैभव वाढते.

या अथांग अशा अक्षरविश्वातील 'पहिले अक्षर', नादब्रह्मातील 'पहिला नाद', विश्ववाङ्मयातील 'पहिले चिरंजिवी वाङ्मय' आणि भल्यांचा, सज्जनांचा 'माननीय आदर्श' म्हणून त्या दिव्यनिधीचा उल्लेख करावा लागेल त्या निधीचे नाव म्हणजेच 'वेद' होय!

वेद हे अपौरूषेय आहेत. ते भगवंताचे 'उच्छ्वसित' महर्षी, ऋषी, मुनींकडून प्रसवले आहे. भगवंत निद्रीस्त असता त्यांच्या उच्छ्वासाचा जो नाद प्रगट झाला त्यामधून हे वेद नादरूपाने जन्म पावले. या विश्वामध्ये तो नाद कितीतरी काळपर्यंत तसाच घुमत राहिला होता. त्यामुळेच वेदांचा काळ कोणता? असा प्रश्न पडल्यास तो विश्वोत्पत्तीपूर्वीच अस्तित्वात आला होता, असे उघड होते. ह्या नादांचे फलित म्हणजेच या विश्वाची उत्पत्ती होय! कारण ब्रह्मदेवाने ही सृष्टीची उत्पत्ती केली ती ह्या वेदांनी आणि त्यांच्या नादांनी सांगितल्याप्रमाणेच. ज्ञानेश्वर महाराज हे स्वतः भगवंत होते. 'ज्ञानेश्वरी' या नावाने सर्वश्रूत असलेल्या, ज्ञानेश्वरांनी दिलेल्या व्याख्यानांच्या ओघात त्यांनी वेदोत्पत्ती आणि विश्वोत्पत्ती यांचा उत्कृष्ट संबंध दाखवला आहे.

हे वेद समजण्यासाठी ब्रह्मदेवाला १२ वर्षे प्रणवाच्या नामजपाने तप करावे लागले. व्यावहारिक भाषेत हा काळ ३७३२४८० कोटी वर्षांचा आहे. म्हणजे ब्रह्मदेव यापूर्वीच जन्मला होता आणि ब्रह्मदेवाच्या कित्येक वर्षांपूर्वी वेदांचा जन्म झाला होता. त्यापूर्वी हे वेद अक्षर वाङ्मय म्हणून निर्माण झालेले नव्हते. एकूण काय तर वेद हे अतिप्राचीन आहेत आणि ते भगवंताच्या उच्छ्वासाच्या नादामधून, म्हणजेच नादब्रह्म म्हणून या विश्वात प्रतीत झाले. ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केल्यावर या सृष्टीत अखेरची अविकृत आकृती म्हणून मानवाला जन्म दिला. त्या मानवामधून ऋषींचा जो समुदाय निर्माण झाला त्या प्रज्ञावंतांनी ह्या वेदांना अक्षरांमध्ये गुंफून व्यक्तरूप दिले. त्यांचा हेतू संपूर्णपणे लोककल्याणाचा होता. सामान्य माणसाची बुद्धी इतक्या उच्चस्तरावर पोहोचू शकत नाही. त्यामुळे हे सामान्यजन त्या अत्युच्च आनंदापासून दूर रहातील, या एका हेतूनेच त्यांनी या नादांना छंदबद्ध, अर्थबद्ध, अक्षरबद्ध आणि मंत्रबद्ध केले. या नादांमध्ये कोणत्याही काळी, कसलाही बदल होणार नाही व ते तसेच ताजे व टवटवीत राहतील याची काळजी घेतली. त्यामुळेच तर त्याचे ताजेपण त्यावेळेइतकेच अजूनही टिकून आहे.

हे वेदांचे ज्ञानविश्व 'लिखित ग्रंथ' या रूपाने कधी अस्तित्वात आले. त्याचा काळ शोधणे महाकठीण आहे. एवढे निश्चित की त्याचा काळ अतिप्राचीन आहे. वेदाक्षरांचा उच्चार निश्चित, स्पष्ट व रेखीव कसा केला पाहिजे, याचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचे पठणही तितकेच महत्त्वाचे आहे. तसे झाल्यासच ऐकणारा व म्हणणारा त्याचा आस्वाद घेऊ शकतो. याकरिता वेदांच्या नादाला, अर्थाला, निष्ठेला महत्त्व देणे जरूरीचे आहे. हे शब्द 'श्रवण' केल्याशिवाय उच्चारताच येत नाहीत. म्हणून वेदांना 'श्रुती' असे नाव आहे. हे शब्द अधिक नादमय, अर्थमय व्हावेत म्हणून त्यांना छंदोबद्ध केले आहे. त्यामुळे ते शब्द अधिक मधुर होऊन आपल्याला आनंदाची अनुभूती मिळवून देतात. यामध्ये गायत्री, उष्णीक, अनुष्टुप, बृहति, पंक्ति, त्रिष्टुप, जगती हे प्रमुख छंद आहेत. यामधील 'गायत्री' हा २४ अक्षरांचा असून सर्वात लहान आहे व 'जगती' हा ५३ अक्षरांचा असून सर्वात मोठा छंद आहे. ह्या छंदांमध्ये आणखी भेद किंवा परिभेद आहेत. हा सर्व अभ्यास अत्यंत विस्तृत आहे. वेद ताजे ठेवण्याचे काम केवळ पठणामुळे झाले. परंपरेने पाठ केल्याने त्यात कोणताही बदल घडला नाही. वेद हे जगातले एकमेव असे ग्रंथ आहेत की ज्यामध्ये पाठभेदाला वाव नाही. याचे कारण त्यांच्या वेदमंत्र म्हणण्याच्या पद्धती, उदाहरणार्थ: जटा, पद, क्रम, धन इत्यादी या पद्धतीत शब्द उच्चारताना त्याच्या मागे-पुढे कोणता शब्द आला आहे, याचा पूर्ण, सखोल अभ्यास केला गेला.

ह्या वेदांमध्ये विविध प्रकारची सूक्ते आहेत व त्या सूक्तांत विविध प्रकारच्या प्रार्थना आहेत. एकाच प्रकारच्या व एकसारख्या अर्थाच्या पुष्कळ प्रार्थना आढळतात. त्यात द्विरूक्तीचा वापरही वरचेवर आढळून येतो. परंतु हे त्यांचे वरवरचे, ढोबळ स्वरूप आहे. सूक्ष्म दृष्टिकोनातून पाहू गेल्यास मात्र त्या प्रार्थनांच्या मागे सुत्रार्थ आणि अनुभवांची तेजस्विता दृष्टीस पडते आणि अवर्णनीय असा आनंद मिळतो. या नादाप्रत पोहचण्यास अनेक पायऱ्या ओलांडाव्या लागतात. प्रत्येक पायरीसाठी १२ वर्षांची गुरूंच्या सान्निध्यातील तपश्चर्या अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मानवाची आयुमर्यादा १०० वर्षांची धरली तरी वेदांचा संपूर्ण अभ्यास किंवा अध्ययन अतिशय अवघड आहे. त्यासाठी अनेक महर्षींनी, प्रज्ञावंतांनी आपल्या आयुष्याचे दान दिले आहे. परंतु याची गूढता अजून तितकीच कायम आहे. म्हणून त्यात डोकावून बघण्याचा मोह प्रत्येकालाच होतो, आणि डोकावून बघताच जो अफाट ज्ञानसागर त्याच्या दृष्टशेत्पत्तीस पडतो त्यामुळे अंत:करणात तीव्र इच्छा असूनही तो स्वस्थ बसतो.

### ऋग्वेद

संपूर्ण ज्ञानसागर म्हणून ज्या वेदांकडे आपण बघतो तो पूर्वी 'एकच' होता. अध्ययनाच्या सुलभतेकरिता महर्षी व्यासांनी त्याचे चार भाग पाडले. केवळ तेजोवान गुरूपरंपरा, त्याशिवाय ब्रह्मदेवाकडून मिळालेल्या अथांग प्रतिभेचा वारसा व

ऋतंभरा प्रज्ञेचा प्रकाश त्यांच्या पाठीशी होता म्हणूनच त्यांच्या हातून हे घडून आले. भूत-भविष्याचे ज्ञानही त्यांना होते. ह्या सर्वांमुळे या प्रज्ञेवर व्यासांनी त्याच्या सोयीकरिता चार भाग करून आपल्या शिष्यांना एकेक भाग प्रदान केला. त्याचे मनन, अध्ययन आणि आचारण करण्याची त्यांना अनुमती दिली. या गुरूशिष्य सांप्रदायाला ब्रह्मसंप्रदाय असे म्हटले जाते. कारण ही गुरूमालिका– ब्रह्मदेव, वसिष्ठ, शुक, पराशर आणि व्यास अशी आहे.

| **वेदाचे नाव** | **व्यासशिष्य** |
|---|---|
| ऋग्वेद | पैल |
| यजुर्वेद | वैशंपायन |
| सामवेद | जैमिनी |
| अथर्ववेद | सुमन्तु |

याशिवाय आदित्यसंप्रदाय म्हणूनही एक संप्रदाय आहे. या संप्रदायाची सुरूवात आदित्यापासून होते. आदित्याने सर्व वेद याज्ञ्यवल्क्यांना शिकवले. तेथून पुढे या चार वेदांचे प्रवर्तक मानले जातात.

| | |
|---|---|
| ऋग्वेद | सांख्यायन |
| यजुर्वेद | कण्व, माध्यंदिन |
| सामवेद | सामश्रवा, कौथुम |
| अथर्ववेद | शौनक |

ह्या सर्वांनी व त्यानंतर त्यांच्या शिष्यपरंपरेने वेदांच्या शाखा, उपशाखांचा काटेकोरपणे अभ्यास करून जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला.

वरवर पाहता या वेदांत विविध देवतांच्या प्रार्थना आहेत. पण त्यांच्या अंतरंगात शिरून पाहता त्यात महान दिव्य ज्ञान आहे, विविध आचार, विविध बंधने याचे मूळ आहे, सामाजिक रूढींच्या न्याय-मार्गाचे दर्शन आहे आणि सामान्यांचा आवडता शृंगारही आहे. 'ऋग्वेद' हा त्यातल्या त्यात मोठा वेद मानला जातो. या वेदात एकूण १० मंडले आहेत. प्रत्येक मंडल हे सूक्ते आणि ऋचा यांनी बनलेले आहे. ह्या सर्व ऋचांमध्ये एकूण १,५३,८२६ पदे असून त्यामध्ये ४,३२,००० अक्षरांचा समावेश आहे.

मंडल १ व मंडल १० यामध्ये १९१ सूक्ते आहेत. प्रथम मंडळात २,००६ ऋचा आहेत, तर १० व्या मंडलात १७५४ ऋचा आहेत. २ ते ९ मंडलांत त्यामानाने कमी सूक्ते असून ऋचांची संख्याही त्यामानाने कमी आहे. त्याचा तक्ता पुढीलप्रमाणे

| **मंडल क्र.** | **सूक्ते** | **ऋचा** |
|---|---|---|
| १ | १९१ | २,००६ |
| २ | ४३ | ४२९ |
| ३ | ६२ | ६१७ |
| ४ | ५८ | ५८९ |
| ५ | ८७ | ७२७ |
| ६ | ७५ | ७६५ |
| ७ | १०४ | ८४१ |
| ८ | १०३ | १७१६ |
| ९ | ११४ | ११०८ |
| १० | १९१ | १७५४ |
| ------ | ------ | ------ |
| १० | १०२८ | १०,५५२ |

**प्रथम मंडल**

ऋग्वेदाच्या सर्व मंडळांत हे सर्वात मोठे मंडल आहे. यात १९१ सूक्ते आणि १९७६ ऋचा आहेत. या मंडलाचा प्रारंभ अग्निदेवतेच्या स्तुतीने होतो. भगवंतांनी भगवद्गीतेत **''अक्षराणां अकरोऽस्मि।''** म्हणून अक्षरांमध्ये 'अ' मी आहे, अशी ग्वाही दिली आहे. त्याचप्रमाणे वेदाच्या पहिल्या ऋचेचा प्रारंभही 'अ' या अक्षरानेच झालेला आहे.

अग्निसूक्त : **॥ॐ॥ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम। होतारं रत्नधातमम्।**

यज्ञाच्या प्रारंभी ऋत्विज म्हणून ज्याची प्रार्थना केली जाते अशा देवांना बोलावून आणणाऱ्या, सदैव प्रज्वलित असणाऱ्या आणि ऐश्वर्यसंपन्न अशा अग्नीचे मी स्तवन करतो.

ही ऋचा अग्निसूक्त आहे. प्रथम मंडळात एकूण ३५ सूक्ते ही अग्निसूक्ते आहेत. ह्या सूक्तांमध्ये अग्निदेवतेची भरपूर स्तुती करून तिच्या पराक्रमाचे वर्णन केलेले आहे. अग्नीच्या अंगी असलेल्या अलौकिक सामर्थ्याचे वर्णन केले आहे. तिच्या अंगी असलेल्या विविध दृष्य व अदृष्य अशा पैलूंचे दर्शन घडवले आहे. ही स्तुती करीत असतानाच कल्याणप्रद अशा आशीर्वादांची मागणी प्रार्थनेच्या रूपाने त्यात केलेली आढळते. सर्व अग्निसूक्तांची रचना याचप्रकारची असल्याचे जाणवते. अग्नीची स्तुती करताना उत्तमप्रकारे 'समर्पक' विशेषणे लावून अग्नीची महती वाढवली गेली आहे. त्या प्रत्येक विशेषणामागे एक सुप्तार्थाचे वलय असल्याचे आढळून येते. त्या त्या प्रकारच्या सूक्तात त्या त्या देवतेची मुक्तकंठाने प्रशंसा करून जगाच्या कल्याणाकरिता केलेल्या प्रार्थना आहेत, उदाहरणार्थ: इंद्रसूक्तात इंद्राची स्तुती व प्रार्थना, मरूतसूक्तात मरूतस्तुती व प्रार्थना इत्यादी.

**अग्निसूक्तांत** अग्नीचे वर्णन करताना म्हटले आहे की अग्नि प्राचीन व अर्वाचीन ऋषींनाही प्रिय आहे. त्याच्यामुळेच यशवर्धी, वीर्यवर्धी असे समृद्ध धन प्राप्त होते. तो निष्कपटी, बुद्धीमान, कर्तृत्ववान, सत्यनिष्ठ व किर्तिमान आहे. हे अग्ने! तुला जो प्रज्वलित करतो त्याचे तू सदैव कल्याणच करतोस. ज्याप्रमाणे पिता आपल्या पुत्राचे सर्व लाड पुरवतो त्याप्रमाणे तू आम्हाला इष्ट गोष्टी देऊन आमचे वैभव वाढवतोस. आपल्या ह्या पुत्रांना पृथ्वीवर जगण्यासाठी तू सामर्थ्य आणि बुद्धी दे! अग्नीला आळवण्याकरिता त्याला ऋग्वेदात अनेक विशेषणांनी संबोधले गेले आहे. विद्वान, गृहपती, तरूण, हव्यवाहन, ज्वालामुख, यजनीय, बलाधिपती, चिरयुवा, पुरातन, विश्वाधिपती, आनंदी, अमर, शक्तिपुत्र, स्तुतीप्रिय, पराक्रमी, बुद्धीमान, सर्वज्ञ, सर्वसाक्षी, शत्रुनाशक इत्यादी अनेक तऱ्हेने अग्नीची स्तुती करून ''आम्हाला पुत्र, अन्न, ऐश्वर्य प्रदान कर! आमच्या प्रपौत्रांचे रक्षण कर! पापापासून दूर ठेवून आम्हाला दीर्घायुष्य दे! द्वेषापासून संरक्षण करून आम्हाला संकटमुक्त कर! अशी प्रार्थना केली आहे.

अग्निसूक्त (५८) मध्ये नौधस या गौतमपुत्राने केलेली काही सूक्तांची रचना मांडलेली आहे. यात अग्नीचे स्वरूप, पराक्रम आणि स्तुती आहे. अग्नीला 'वैश्वानर' असेही नाव आहे. इतर ज्या अग्नीच्या शाखा आहेत त्या वैश्वानर अग्नीच्या शाखा आहेत. वैश्वानर अग्नी हा प्राण्यांचे पोषण करणारा

आहे. पृथ्वीच्या अंतरात नाभीस्थानी याच अग्नीचे स्थान आहे. तेव्हा हे ऋत्विज यज्ञस्थानी अग्नीला पाचारण करून आपल्या स्तोत्रांचा स्वीकार कर, अशी विनंती करीत आहेत.

प्रथम मंडलातील (६५) ते (७३) ही सर्व **'पराशर शाक्त्य सूक्ते'** ही अग्निसूक्ते आहेत. ही नऊही सूक्ते म्हणजे अग्नीच्या उपासनेचा मार्गदीप आहे. अग्नी समुद्राच्या उदरात त्याचा मार्गदीप, मित्र बनून रहातो. अग्नीला मर्यादीत करण्याचे सामर्थ्य कोणातही नाही. अग्नी वनस्पतींच्या हृदयात रहातो, वाढतो. त्याच्या अस्तित्वामुळे वनस्पती वाढतात. अग्नी उदकामध्येही वास करून रहातो. ईश्वराप्रमाणे तो विश्वव्यापक आहे. त्यामुळे तो पृथ्वीचे व प्राणीमात्रांचे रक्षण करतो. तेव्हा हे अग्ने! तुझ्या उपासनेमुळे मानवाला देवत्वाचा लाभ झाला. तुझे भक्त यज्ञामध्ये तुझी प्रेमाने स्थापना करतात. तुला हविर्द्रव्ये अर्पण करतात. त्या भक्तांच्या सर्व इच्छा तू पूर्ण करतोस. मनूच्या वंशात जन्म पावलेल्या मनुष्यांच्या सर्व गुप्त संपत्तीचा स्वामी तूच आहेस. तुझ्या कृपेमुळे स्त्री-पुरुषांमध्ये प्रस्थापित झालेल्या तेजाचा संयोग होऊन त्यांना पुत्रलाभ होतो.

अग्नी हा उषेचा प्रियकर आहे. द्युलोक व पृथ्वी यांना तो आपल्या तेजाने समृद्ध करतो. अग्नी जन्मत:च तेज:पुंज आहे. खरे म्हणजे तो देवांचा पुत्र आहे. परंतु त्याचा पराक्रम व वैभव पाहून देव त्याला पित्याप्रमाणे मान देतात. अग्नी अन्नपदार्थांना स्वाद प्राप्त करतो. तो सदैव आनंदी असतो. हवि देण्यासाठी त्याच्या भक्तांनी त्याला आवाहन करताच तो तृप्त मनाने येऊन देवप्रतिनिधी म्हणून हवि भक्षण करतो. म्हणजेच "हे अग्ने! भक्तांच्या हाकेला तू ओ देतोस आणि त्यांची दु:खे दूर करून त्यांना सुखाची प्राप्ती करून देतोस. तेव्हा नदी पार करणाऱ्या कुशल नाविकाप्रमाणे द्वेषापासून तू आम्हाला दूर ने आणि संकटमुक्त कर!"

उदकामध्ये असलेला अग्नी पाणी प्रकाशमान करतो. वृक्षामध्ये असणारा अग्नी लाकडाच्या घर्षणाने गोचर होतो. स्थावर व जंगमाच्या उदरात असलेला अग्नी अन्नरस पचविण्याची क्रिया करतो, तर पर्वतामध्ये वास करणारा अग्नी प्रजाहीत करणारा आहे. चिरंजीव आहे. देवांचा जन्म व मर्त्यांचे जीवन याचे अग्नीला पूर्णपणे ज्ञान आहे. अग्नी हा अन्नाचा स्वामी आहे. त्यातूनच तेजोत्पत्तीची इच्छा असणाऱ्या अग्नीने घर्षणाच्या सहाय्याने प्राणीमात्राच्या ठिकाणी अत्यंत शुद्ध आणि तेजस्वी वीर्याची उत्पत्ती केली. अग्नीचे अंतरिक्षातील अस्तित्व म्हणजे 'वीज' असे काव्यमय वर्णनही त्यात आढळते. अग्नी एका दिवसात पृथ्वीप्रदक्षिणा घालतो. जोपर्यंत प्रत्येक वस्तूमध्ये अग्नी आहे तोपर्यंत ती अविनाशी आहे. म्हणून अग्नीच्या सान्निध्यासाठी प्रार्थना केली आहे. तसेच त्याने आता यज्ञात प्रज्वलित व्हावे व आमच्यासाठी त्याने इंद्राला येथे घेऊन यावे व स्वर्गातील देवांप्रत नेणारा आमचा यज्ञ शेवटास नेवो, अशी अग्निदेवतेकडे प्रार्थना करून तुझी उपासना करणारा भक्त स्वर्गलोकातसुद्धा श्रेष्ठ ठरो! असे वरदान मागितले आहे.

ह्या सर्व अग्निसूक्तांवरून अग्नी अतिप्राचीन काळीही लोकांना किती प्रिय होता, हे लक्षात येते. तसेच आजच्या या विज्ञानयुगातसुद्धा अग्नीचे हे अबाधित्व कायम असल्याचा पडताळा येतो.

**इंद्रसूक्त :**

इंद्रसूक्तात अग्निसूक्ताप्रमाणेच इंद्रदेवाची उत्तमप्रकारे स्तुती करून विश्वातील प्राणीमात्रांच्या कोटकल्याणाकरिता प्रार्थना केल्या आहेत.

ऋत्विज सर्वांना इंद्राची स्तुती करण्यास सांगतात व त्यांनी तयार केलेला सोमरस जो दधिमिश्रित आहे तो प्राशन करून त्यांच्या बुद्धीला प्रदीप्त करण्याची व शत्रुसंहारक अशी महान शक्ति देण्याची इंद्रास विनंती करीत आहेत.

इंद्रच वायुरूपाने या पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालतो, आदित्य होऊन आकाशात प्रकाशतो. तो पर्वतांचा भेद करतो आणि अत्यंत गूढस्थानी मार्गदर्शक ठरतो. पृथ्वीवरील स्थावर आणि जंगम संपत्तीचा स्वामी तोच आहे. त्याचे अंत:करण अंतरिक्षाप्रमाणे विशाल आहे. सागराप्रमाणे विशाल उदारत्व असणाऱ्या इंद्राची गोधनासहीत सर्व संपत्ती आसमंतात भरून राहिली आहे. सागराप्रमाणे अगाध, बलवान, अन्नस्वामी, सज्जनांचा रक्षणकर्ता, बलाधिपती, पराक्रमी, अजिंक्य, सर्वजीत्, तेजस्वी, वज्रधारी, विश्वाधार, गानप्रिय, सत्यस्वरूप, ज्ञानवान, शत्रुंजय, दानशूर, जयवंत, महान वीर्यशाली इत्यादी अनेक विशेषणांनी इंद्रदेवास आळवले आहे आणि त्याची वारंवार स्तुती करून ते ऋषी त्यास आपल्याकडे बोलवीत आहेत. हे इंद्रा! तुझे ऐश्वर्य हे भक्तांच्या कल्याणासाठीच आहे. ते देऊन आम्हास समृद्ध कर! आकाशात जलाने भरलेले मेघरूपी घट या पृथ्वीतलावर रिते कर! म्हणजे त्यामुळे आम्हास नवे आयुष्य प्राप्त होईल. तू आपल्या पराक्रमाने आम्हाला धनसमृद्ध कर!

सामर्थ्य आणि आनंद यांच्या प्राप्तीसाठी वृत्राचा वध करणाऱ्या, पोलादी वज्र धारण करणाऱ्या, पृथ्वी आणि अंतरिक्ष यांना व्यापून टाकणाऱ्या, प्रसन्न होऊन भक्तांना संपत्ती प्रदान करणाऱ्या इंद्रा! आमच्या शत्रूंचा पराभव करण्यासाठी आम्ही तुला आवाहन करीत आहोत. आमचे सामर्थ्य तू वृद्धिंगत कर!

भक्तांच्याकडे आणि यज्ञोपासकांकडे इंद्र रथ घेऊन जातो आणि त्यांच्या कामना पूर्ण करतो. युद्धाच्या वेळी इंद्राला आवाहन करताच सामर्थ्य प्राप्त होते आणि बुद्धीवंतांना प्रेरणा मिळते. इंद्राच्या सहाय्याने शत्रूची संपत्ती प्राप्त होते. इंद्रापुढे आकाश व पृथ्वी नतमस्तक झाली. सर्व देवतांनी इंद्राला आपला नेता बनवले. तेव्हा हे इंद्रा! आमच्या यज्ञाचे रक्षण कर! वाईट बुद्धीच्या लोकांना, पापी राक्षसांचा नाश करून तू आमच्यासाठी धन घेऊन ये! सूर्याच्या घोड्याप्रमाणे तुझे बलवान अश्व तुला इकडे आणोत, म्हणजे दगडाच्या सहाय्याने काढलेला सोमरस तू प्राशन करशील, असे म्हणून आळवीत आहेत.

(१३२) इंद्रसूक्तात युद्धात मरण आल्यास त्यास स्वर्गप्राप्ती होते, या गोष्टीचा प्रमुख उल्लेख आहे. त्याचप्रमाणे जे विविध यज्ञ केले जातात त्यामुळे पृथ्वी व आकाश पवित्र होते, म्हणजेच दुषितता नष्ट होते, असे यात सांगितले आहे.

(१३३) इंद्रसूक्तात या सूक्ताच्या पठणाने राक्षसी कृत्य करणाऱ्यांपासून निर्भयता प्राप्त

होते तसेच पिशाच्चांना दूर करण्यासाठी भस्म तयार करून आजूबाजूला टाकण्याचा मंत्रही याच सूक्तात आहे. प्रथम मंडळातील इंद्रसूक्तांची संख्या एकूण ३७ आहे.

**मरूतसूक्त :** या सूक्तांमध्ये मरूत म्हणजे वायु (वारा) याची स्तुती गाऊन त्याच्याकडे दीर्घायुष्याचे वरदान मागितले आहे. ऋत्विज म्हणतात, ''हे शत्रुसंहारक, बलशाली, झंझावाताने गमन करणाऱ्या मरूतांनो! आम्ही तुम्हाला हवीर्द्रव्ये अर्पण करतो. आमच्या यज्ञकर्मांनी तुम्ही प्रसन्न व्हा! कित्येक वस्तूंना बरोबर घेऊन जाणाऱ्या पूज्य मरूतांनो! तेजसंपत्तीचे तुम्ही स्वामी आहात, विद्वानांचा नाश करणाऱ्यांचा तुम्ही नाश करा! आमच्या कल्याणार्थ तुम्ही आमच्याकडे वेगाने धाऊन या! (६४) मरूतसूक्त– यात मरूतांच्या वैभवाचे वर्णन केलेले आहे.

पर्जन्यध्वज, संरक्षक, सुखदायी, स्वयंस्फूर्त, अन्नसमृद्ध, यज्ञस्तुत, दयाघन, पृथ्वीला कंपायमान करीत जाणारे अशातऱ्हेने मरूतांचे वर्णन केलेले आढळते.

मरूत म्हणजे वारा व त्यांच्यासोबत असणारी युवती म्हणजे पर्जन्यवृष्टी, असे शृंगारात्मक वर्णनही यात आढळते. पृथ्वीनेच या मरूतांना जन्म दिला आहे.

आमच्यावर प्रसन्न व्हा आणि आमचा उत्कर्ष करा! आम्हाला यश प्रदान करून आमचे जीवन सफल करा! अशातऱ्हेच्या प्रार्थना मरूतांना उद्देश्यून केलेल्या आहेत.

प्रथम मंडलात एकूण ११ मरूतसूक्ते आहेत.

**वायु-इंद्र-मित्रावरूण सूक्त–** वायु हा अग्नीचा मित्र आहे. इंद्राप्रमाणे पराक्रमी आहे. मित्रावरूण बलवान असून बुद्धीला बलिष्ठ करतात. ऋषी या सूक्तांत त्यांना सोमरस पिण्यास बोलावीत आहेत. अजातशत्रू मित्रावरूण भक्तांचे रक्षण करतात व त्यांच्या कृपेने दीर्घायुष्य व संपत्ती, तसेच कीर्ति प्राप्त होते. ऋषी त्यांना आपल्या हविर्द्रव्यांनी संतुष्ट होऊन पर्जन्यवृष्टी करण्याची प्रार्थना करीत आहेत. कारण ती पर्जन्यवृष्टी या जगतातील प्रत्येक जीवमात्राला कल्याणकारक होईल.

**सरस्वतीसूक्त :** पावित्र्य प्रसरविणारी, समृद्ध, कर्तव्यधन, सत्यप्रेरक, मनुष्याच्या बुद्धीला दीप्तिमान करून द्रुतगती देणारी वाग्देवी अशी सरस्वतीदेवीची स्तुती गाऊन 'अन्नद्वारा आमचे स्त्रौत देवांपर्यंत नेवो अशी इच्छा अपेक्षा तिच्याकडून व्यक्त केली आहे.

**आप्रीसूक्त :** वेदाचे १३ वे मंडळ आप्रीसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. या देवतासमुहामध्ये (१) सुसमिद्ध अग्नि (समिधांमुळे प्रज्वलित झालेला अग्नि), (२) तननूपात अग्नि (अरणीत गर्भजात रूपाने असणारा नवजात अग्नि, (३) इळ (यज्ञात स्तुतीच्या वेळी प्रदीप्त होणारा अग्नि), (४) बर्हि (दर्भाने दीप्तिमान झालेला अग्नि), (५) द्वार-यज्ञद्वार, (६) उषासानक्त (उषा व रात्र), (७) दैव्यो (हातारौ नामक देवता), (८) तिस्त्रो देव्य: (सरस्वती, नदी अन्न आणि वाणी), (९) त्वष्टु (देवतांचा कारागीर), (१०) वनस्पती, (११) स्वाहा (अग्निला हवनद्रव्य अर्पण करताना म्हणावयाचा गौरव शब्द) ह्या ११ देवतांची स्तुती असून ह्या स्तव्य देवतांच्या प्रसन्नतेने संसार संपन्न होतो, म्हणून त्यांना यज्ञस्थानी आमंत्रित केले आहे.

**ऋतुपरंपरा – देवतासूक्त :** देवतासूक्तात वरील सर्व देवतांच्या प्रार्थना करून त्यांनी आमच्यावर प्रसन्न होऊन, आम्हाला समृद्ध व निरोगी ठेवून, आमच्या यज्ञस्थानी स्थानापन्न व्हावे, असे आवाहन केले आहे. **ऋतुसूक्तात** सहा ऋतु व मास यांचा उल्लेख आढळतो. ह्या सहा ऋतूंची नावे किंचित् निराळी असून त्यांचे स्वामीही निरनिराळे आहेत. त्या त्या देवतांना उद्देशून काही प्रार्थना यात आहेत. तसेच ह्या दोन्ही प्रकारच्या सूक्तात ह्या भक्तांना बुद्धी, यश, अन्न व संपत्ती, तसेच सर्व प्राणीमात्रांना सुख प्रदान करण्याबद्दल त्या त्या देवतांकडे याचना केली आहे. **इंद्रावरूण सूक्तामध्ये त्यांच्याकडे धन-संपत्ती व इच्छिलेले धन देऊन आम्हाला संतुष्ट करा आणि आमचे कल्याण करा, अशी प्रार्थना केली आहे.**

**ब्रह्मणस्पतिसूक्त :** ऋग्वेदात गणपती या देवतेचा उल्लेख नाही. गणपती हे इंद्राचे विशेषण म्हणून उपयोग करण्यात आले आहे. 'ऋक्' नामक गणांचा प्रमुख म्हणून गणपती ही ब्रह्मणस्पतीची उपाधी आहे. परंतु गणेश उपासनेशी या सूक्तांची सांगड घालण्यात आली आहे. हे ब्रह्मणस्पतीसूक्त ६४ ऋचांचे आहे.

यात ब्रह्मणस्पतीला अत्यंत भक्तिभावाने आळवून व त्या देवतेची स्तुती गाऊन, त्याच्या तेजस्वीतेची, धैर्यशाली गुणांची स्तोत्रे गावून त्याला यज्ञात स्थानापन्न होण्याचे आवाहन केले आहे. **अग्निमरूत व इंद्राग्निसूक्तात** ह्या चारही देवतांची स्तुती करून आळवून त्यांना, राक्षसांपासून रक्षण करून सुख देण्याची प्रार्थना केली आहे आणि दूधमिश्रित सोमरस पिण्यास सिद्ध व्हा, असे आवाहन केले आहे. तसेच दुष्टवचनी व दुष्टकर्मी लोकांपासून आमचे संरक्षण करून आमचा उत्कर्ष व्हावा, अशी इच्छा व्यक्त केली आहे.

**ऋभुसूक्त :** इंद्राचे दोन अश्व या ऋभूंनी स्वत:च्या मन:सामर्थ्याने तयार केले. आश्विनीकुमारांचा सुखकारक रथ त्यांनी तयार केला. अमृताप्रमाणे दूध देणारी गायही त्यांनीच निर्माण केली आणि आपल्या विशेष सामर्थ्याने शिथिलता प्राप्त झालेल्या आपल्या आईवडिलांची शरीरे पुन्हा बळकट करून त्यांना तरूण केले. ते ऋभू अमर आहेत, सत्यवादी आणि सज्जन आहेत. या ऋभू ऋषींचे दोन बंधू होते. ''हे ऋभूंनो! या एकवीस स्तोत्रांच्या बदल्यात तुम्ही आम्हाला एकतीस दिव्य रत्ने द्या!'' अशी यात त्यांची प्रार्थना करून दिव्य रत्नांचे दान मागितलेले आहे.

**विष्णूसूक्त :** हे सूक्त देवता सूक्ताचाच भाग असून यात विविध प्रकाराने विष्णू या देवतेचे स्तवन करून त्याच्या सामर्थ्याचे वर्णन केलेले आहे. अविनाशी, विश्वप्रतिपालक विष्णूने आपल्या तीन पायांत (त्याने संपूर्ण जगतात तीन ठिकाणी पाय ठेवले) हे संपूर्ण विश्व पादाक्रांत केले म्हणून त्याचे व त्याच्या परमपदाचे महत्त्व गाऊन ऋषी त्याला हवि अर्पण करतात.

**अप् सूक्तात** उदकांची स्तुती गाऊन आरोग्य अबाधित रहाण्यासाठी तसेच हातून काही पाप घडले असल्यास किंवा अन्य कारणांमुळे आमच्यात काही दोष निर्माण झाले असतील किंवा आम्ही कोणाचे शत्रुत्व केले असेल किंवा वाईट चिंतिले असेल तर ते धुवून टाका, अशातऱ्हेची प्रार्थना केली आहे.

**शुन:शेप सूक्तात** आजीर्गत ऋषींचा मुलगा शुन:शेप याने तीन यज्ञस्तंभांना बांधला गेलेला असता आदितीपुत्र वरूणाचा धावा केला व तो मुक्त झाला म्हणून वरुणाची स्तुती करून प्रार्थना केली आहे. **वरूण सूक्तातही** त्याचप्रकारची प्रार्थना असून आयुष्य वृद्धींगत करण्यासाठी प्रार्थना केली आहे. **सोमसूक्त:** सोम उपासकांच्या अंत:करणात रममाण होतो. घरदार, वीर्य, पुत्रपौत्र, यज्ञ, पितृकीर्ति, गृहस्थधर्म यांचे तो रक्षण करतो. त्याने आपल्या सामर्थ्याने ही सृष्टी संवर्धित केली आहे. शरीरात औषधींचा गुण वृद्धींगत व्हावा म्हणून ग मंत्राचा उपयोग केला जातो. अशा सर्व गुणांनी युक्त सोमास ते ''दर्शन देऊन आनंदीत कर!'' अशी प्रार्थना करीत आहेत.

**सवितृसूक्त:** या सूक्तात सूर्याचे उत्तम वर्णन केलेले असून या मंत्राच्या योगाने सूर्याची उपासना करण्याचा प्रघात आहे. **सूर्य सूक्तात** मानवाचा हृद्रोग व पंडुरोग नाहीसे करण्याचा मंत्र दिलेला आहे.

**पूषनसूक्त:** 'पूषन' ही एक महान देवता असून सर्व प्राणीमात्रांच्या सुखसमृद्धीसाठी तिचे स्तोत्र गायले आहे.

**आश्विनीकुमारसूक्त (३४):** या सूक्तात तेहतीस देवांचे वर्णन केलेले आहे. यापैकी अकरा स्वर्लोकात, अकरा पृथ्वीवर व अकरा अंतरिक्षात निवास करतात. ह्या सर्व सूक्तांत त्यांना आळवून यश, धन, बल, संपत्ती, दीर्घायुष्य तसेच ज्ञानांधकाराचा नाश करण्यासाठी प्रार्थना केल्या आहेत.

**इंद्रपालुपद सूक्तात** इंद्राची प्रार्थना करून धन व सामर्थ्य मागितलेले आहे.

**सपात सूक्तात,** तसेच **इंद्रपराक्रम सूक्तात** इंद्राची स्तुती, तर उषा सूकात 'उषा' देवतेची स्तुती, **अग्निसोम सूक्तात** वीर्यवान अग्निसोमांची स्तुती व **वायू सूक्तात** वायूची स्तुती करून त्यांना वरीलप्रमाणेच विविध प्रार्थना करून आळवले आहे.

**विश्वदेव सूक्तात** दहा ऋचा असून त्यांचा विनियोग वेगवेगळ्या कारणांसाठी करण्यात येतो. ह्या ऋचा आशीर्वाद-मंत्र म्हणूनही म्हणण्यात येतात. हे सूक्त संपूर्ण शांतिपाठ म्हणून प्रसिद्ध आहे. वंशवृद्धी, स्नेहप्राप्ती, सर्व कल्याण, औषधातून स्वास्थ्य-संपादन, संपत्तीलाभ व रक्षण, कल्याणप्राप्ती, संसरक्षणार्थ, भलेपण उपभोगाशीर्वाद, शतायुष्यप्राप्ती, देवी आदितीचा मंगल आशीर्वाद यासाठी ह्या ऋचांचा विनियोग करण्यात आलेला आहे.

**कुत्सअंगिरस सूक्तात** ऋभूंची, तसेच अश्विनीकुमार ह्या देवांच्या धन्वंतरीची, उषादेवीची, वीरपुरुष रूद्राची बल, धन, समृद्धी, स्वसंरक्षण, संपत्ती, आरोग्यप्रद औषधे, अभय, सौख्य यासाठी प्रार्थना केलेली आहे.

**दीर्घतमस सूक्तात** आश्विनीकुमारांनी केलेल्या पराक्रमाचे वर्णन आहे, तसेच उषादेवीची स्तुती करून उत्कृष्ट कर्तव्यबुद्धी आणि विपुलसंपत्ती प्रदान करण्यासाठी प्रार्थना केलेली आहे. या सूक्तांत दुष्ट अगर दु:खर स्वप्ने यांचा नाश करणारा मंत्र दिलेला आहे.

**सौरसूक्ते–** यात एकूण तेरा ऋचांचा समुह असून ते एक उत्तम सूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. यात सूर्याचे गुणवर्णन व मानवास होणारा लाभ ह्या गोष्टींवर आधारलेली स्तुती आहे. या सौर सूक्तांच्या मंत्रामध्ये मानवी शरीरातील विकृती जाळून टाकण्याचे सामर्थ्य आहे.

**इंद्रमरूत सूक्तात** इंद्र व मरुत यांचा संवाद असून या संवादाच्या अखेर या मरूताची अगस्ती ऋषींनी प्रार्थना केलेली आहे आणि निरनिराळे वरदान मागितले आहे.

**अश्वमेघ सूक्तातील** मंत्र यज्ञात बळी दिल्या जाणाऱ्या अश्वास उद्देशून आहेत. परंतु हे सूर्यरूपक असावे असे वाटते.

**अन्न सूक्तात** प्रत्येक खाद्यपदार्थातील पोषक रसाचे स्तवन आहे. **द्यावापृथ्वी सूक्तात** पृथ्वीचे तर **अस्यवामीय सूक्तात** एकूण वेगवेगळ्या तीस विषयांचे वर्णन आलेले आहे. हे सूक्त तत्त्वज्ञानपर असून यात एकूण ५२ ऋचा आहेत.

**बृहस्पतीसूक्त:** हे सूक्त पुत्र, धन कीर्ति आणि बुद्धी याच्यासाठी स्नानानंतर गायले जाते. यात बृहस्पतीची स्तुती असून ''आमच्या हृदयात नित्य वास करो व आमच्यावर ज्ञानाचा वर्षाव करो!'' अशी मागणी केलेली आहे.

**आतृणसूर्य सूक्तात** विष उत्पन्न होणाऱ्या गोष्टी आणि त्यापासून संरक्षण याची महती सांगितलेली आहे.

### मंडल दुसरे

ऋग्वेदामध्ये विविध देवतांना उद्देशून विविध प्रकारच्या प्रार्थना केलेल्या आहेत. त्यात त्या देवतांची, त्यांच्या सामर्थ्याची अत्यंत सुंदर शब्दात स्तुती करून त्यांचे महत्त्व दर्शविले आहे आणि त्यांना आळवून यज्ञाच्या ठिकाणी येण्याची विनंती केलेली आहे, तसेच आपल्यावर अखंड कृपाशीर्वाद ठेवण्याची मागणी केलेली आहे. सर्व दुष्ट, पापी वृत्तींपासून आपले संरक्षण करून धन, समृद्धी, बल, अभय, सौख्य, कल्याण, वंशवृद्धी, स्नेहप्राप्ती, संकटमुक्ती, बुद्धीतेज, वीर्यप्राप्ती इत्यादी असंख्य गोष्टींच्या प्राप्तीसाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

अर्थात्, प्रत्येक मंडलामध्ये देवतांची पुनरूक्ती झालेली आहे, हे उघड आहे. त्यामुळे त्यांना उद्देशून केलेल्या प्रार्थना व त्यांचे अर्थ हे बव्हंशी एकाच प्रकारचे व एकसारखे झालेले आहेत, हे मागेच सांगितलेले आहे. तेव्हा ही द्विरुक्ती किंवा पुनरुक्ती गृहीत धरूनच ऋग्वेदाचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. त्याच त्याच देवतांना उद्देशून, कमी-जास्त प्रमाणात, त्याच त्याच अर्थाच्या प्रार्थना केल्या गेल्या असल्या तरी त्या अनादि अनंत अशा काळापासून आत्तापर्यंत मानवाला साह्यभूतच झाल्या आहेत. आजही मानवाला ऋग्वेदाचा आधार घ्यावाच लागतो. किंबहुना हे चारही वेद हे चिरंजीवी वाङ्मय असून, या विश्वातील प्रत्येक कणाशी ते आपला संबंध दाखवून त्याची प्रचिती आणून देतात. त्यामुळेच या भूतलावर अस्तित्वात असणाऱ्या सर्व अवस्थांचा मूलभूत पाया म्हणजेच हे वेद होत.

हे वेद धर्माबद्दल माहिती देतात, नीतीची शिकवण देतात. राजनीती, युद्धनीती, युद्धकौशल्य याबद्दल सांगतात. ते अर्थाबद्दल (धन) सांगतात, यज्ञाबद्दल तसेच धार्मिक विधींबद्दल शास्त्रीयदृष्ट्या माहिती देतात. ते औषधी वनस्पती. त्यांचे उपयोग इत्यादींबद्दल माहिती देतात. ते देवतांना उद्देशून केलेल्या प्रार्थनांतून त्या त्या देवतेबद्दल आदर प्रगट करून, त्यांचे अगाध

सामर्थ्य सामान्यजनांना पटवून देऊन त्यांना भक्तिमार्गाची ओढ लावतात. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग आणि भक्तिमार्ग ह्या मार्गांनी ईश्वराप्रत पोहचण्यासाठी ईश्वराला आळवतात. थोडक्यात, हे वेदच विश्वोत्पत्तीस कारण ठरले आहेत. म्हणून धर्मकारण, राजकारण अर्थकारण आणि नीती यांची शिकवण देऊन, प्रत्येक मानवास दुष्ट व पापी वृत्तींचा संहार करून अत्युच्च अशा विश्वातील सर्वोत्तम ज्ञान-शिखरावर नेऊन बसविण्याचे कार्य करणाऱ्या त्या वेदांनी आपल्याला ऋणी केले आहे.

ऋग्वेदाच्या एकूण दहा मंडलांपैकी हे दुसरे मंडल होय! हे मंडल सर्वात लहान मंडल असून केवळ त्रेचाळीस सूक्तांचे बनलेले आहे. त्यात ४२९ ऋचा आहेत. गणपतीवर अभिषेक करताना ब्रह्मणस्पती सूक्ताचा उपयोग करतात.

**प्रात:स्मरण सूक्तात** चार अश्व (चार ऋत्विज, जे यज्ञाच्या चार बाजूंना बसतात), तीन चाबूक (तीन सवने), सात लगाम (वेदांचे सात छंद) व दहा द्वारे (दहा यज्ञपात्रे) अशा रीतीने संख्यांचा वापर करण्यात आलेला आहे. ह्या संख्यांमध्ये जो शून्याचा उपयोग केला गेलेला आहे तो अत्यंत महत्त्वाचा व अतिप्राचीन असून दशगुणगणनेचा प्रारंभच आहे, असे म्हणायला हरकत नाही. एक अगर दोन अश्वांच्या सहाय्याने रथाला जी गती येते त्या शक्तीचे मापन अश्वांच्या शक्तीने केलेले आहे. थोडक्यात, या विज्ञान युगात आपण Horse Power म्हणतो त्याचा उल्लेख या सूक्तात सापडतो.

गृह्य सूत्रांमध्ये या सूक्तांतील शेवटच्या ऋचेचा मंत्र हा नवजात बालकाच्या खांद्याला स्पर्श करून म्हटला जातो. यात त्या बालकाच्या भावी भव्यतेबद्दल इंद्राला केलेली प्रार्थना आहे. **आदित्य सूक्तात** एकूण पाच आदित्यांचे वर्णन व द्वेषबुद्धीपासून दूर रहाण्यासाठी, चिरतारूण्यासाठी, तसेच अपराधाला क्षमा करण्यासाठी प्रार्थना केलेली आहे. **वरुण सूक्तातील** ऋचेमुळे भय, पाप, ऋण, दारिद्र्य आणि दु:स्वप्ने दूर जातात.

**विश्वदेव सूक्तात** गुप्तपणे गर्भपात करणाऱ्या व्यभिचारी स्त्रियांना समाजातून बहिष्कृत करतात त्याप्रमाणे आमच्या पातकांना हाकलून द्या! अशी प्रार्थना आहे. म्हणजे त्या काळीही व्यभिचारी स्त्रिया गुप्तपणे गर्भपात करीत असत, याचा हा निर्देश आहे.

**देवता सूक्तात** इंद्र, इंद्रसोम, मरूत्, सरस्वती व बृहस्पती यांची स्तुती व प्रार्थना केलेली आहे. मरूतसूक्त, यातुसूक्त, अश्विनीकुमारसूक्त, त्या त्या देवतांची, त्यांच्या सामर्थ्याचे वर्णन गावून स्तुती केलेली आहे. तसेच ऋतु सूक्तात ऋतुदेवांची, सवितृ सूक्तात सवितेची, सोमपूषन सूक्तात सोम व देवमाता आदिती यांची, तर शकुन सूक्तात अपशकून दूर होण्यासाठी प्रार्थना केलेली आहेत.

## मंडल ३

ऋग्वेदातील दहा मंडलांपैकी हे तिसरे मंडल असून यात ६२ सूक्ते आणि ६१७ ऋचा आहेत.

**अग्निसूक्त व वैश्वानरअग्निसूक्त, आप्रीसूक्त, विश्वदेवअग्नीसूक्त** (विश्वदेव व अग्नि यांची प्रार्थना)

**इंद्रसूक्त, अश्विनीकुमारसूक्त, इंद्रऋभुसूक्त, उषासूक्त** यांमध्ये त्या त्या देवतांची महती गाऊन कल्याणासाठी, यशासाठी प्रार्थना केलेली आहे.

**पुरिष्यअग्नि सूक्तात** अग्नीच्या विविध स्वरूपांचे वर्णन केले आहे. पुरिष्य म्हणजे वनस्पतीमधील रस समृद्ध करणारा हा अग्नि ३० व्या **संपात सूक्तात** केवळ इंद्राची स्तुती केली आहे, तर ३१ व्या संपात सूक्तात सामाजिक प्रथेचा एक भाग (म्हणजेच मरणोत्तर क्रिया-कर्माचा अधिकार, तसेच गतपितामहांच्या श्राद्धाचा अधिकार नातवाला मिळतो) यात उलगडून सांगितला आहे.

**विश्वामित्रनदीसंवाद सूक्तात** विश्वामित्र ऋषींस सोमयज्ञार्थ नद्यांच्या (विपाश आणि शुतुंद्री या जलप्रवाही समृद्ध नद्या) पलीकडे जाण्यासाठी त्यांना काही क्षण प्रवाह खंडित करण्यासाठी विनवित आहेत. प्रथम ह्या नद्या आम्ही इंद्राच्या आज्ञेने वहात आहोत, असे सांगून, विश्वामित्रांची विनंती मान्य करतात. हा सर्व संवाद या सूक्तात आढळतो. **देवता सूक्तात** अनेक देवतांचा समावेश असून विश्वामित्र व वशिष्ठ ऋषी यांच्यामध्ये असणारा द्वैतभाव स्पष्ट केलेला आहे **कूट सूक्तात** विश्वदेवाचा, आद्य व अविनाशी कृतींचा कोणीही नाश करू शकत नाही असे खात्रीपूर्वक सांगितले आहे. शेवटच्या, म्हणजे ६२व्या **देवता सूक्तात** वेदांतील सर्वात श्रेष्ठ असा **'गायत्री मंत्र'** समाविष्ट केलेला आहे. गायत्रीला वेदमाता असे नाव असून हा मंत्र २४ वर्णांचा आहे व या मंत्राचे पुरश्चरण चोवीस लक्ष जपाचे आहे. याशिवाय अन्य देवतांची स्तुती व प्रार्थनाही या सूक्तात केलेली आहे.

## मंडल ४

ऋग्वेदातील हे चतुर्थ मंडल असून यात एकूण ५८ सूक्ते व ५८९ ऋचा आहेत.

**अग्नि सूक्तात** नेहमीप्रमाणे तिच्या पराक्रमाचे वर्णन करून कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. १०व्या अग्नि सूक्तात पापघ्नि म्हणून प्रसिद्ध असलेली एक ऋचा अग्नीच्या सान्निध्यात असावी, असा श्रेष्ठांचा दंडक आहे. **रक्षोहअग्नि सूक्तात** राक्षसांचा नाश करण्यासाठी अग्नीची विविध प्रकारे प्रार्थना केलेली आहे. **वैश्वानरअग्नी सूक्तात** सप्तविध धन आणि बलवर्धक अन्नाचे दान मागितलेले आहे. सप्तविध धनप्राप्तीचे स्वरूप पुढीलप्रमाणे : (१) वारसाहक्काने (२) विधिलाभ-अकस्मात, पूर्वकल्पना नसताना मिळालेले (३) खरेदी-विक्रीच्या व्यवहारात नफ्याच्या रूपाने लाभलेले (४) दुसऱ्यावर युद्धात, वादात अगर द्यूतात विजय प्राप्त करून मिळालेले, (५) न्यायबुद्धीने, म्हणजे स्वत:च्या वाट्याला आलेली कामे केल्यामुळे–मोबदला (६) विविध पिके, वृक्ष फळे यांच्यायोगे प्राप्त होणारे धन (७) शास्त्रसंमत दानाने किंवा दक्षिणेच्या योगे मिळालेले धन. ही ७ धने मनुस्मृतीमध्ये वर्णिलेली आहेत.

देवतासूक्त, अग्निआश्विनीकुमारसूक्त, इंद्रसूक्त, वामदेवसंवादसूक्त, संपातसूक्त, संपातऋतुसूक्त, इंद्रसोमसूक्त, उषाइंद्रसूक्त, अश्विनीकुमारसूक्त, इंद्रवायुसूक्त इंद्रबृहस्पतीसूक्त, उषासूक्त, सवितृसूक्त, द्यावापृथ्वीसूक्त, कृषीसूक्त ह्या सूक्तांत त्या त्या देवतांची थोरवी वर्णन केलेली असून जगाच्या कोटकल्याणाकरिता प्रार्थना आहे. तसेच **ऋभु सूक्तात** 'शरीर कष्टल्याविना

देवाचे सख्यत्व प्राप्त होत नाही', असा आदरणीय विचार मांडला आहे. **दधिक्रावन् सूक्तात** अग्निष्टोम यज्ञामध्ये दही भक्षण करताना किंवा देवाला पंचामृताने स्नान घालत असता 'दही घालण्याचा' म्हणून हा मंत्र उपयोगात आणला जातो. तसेच अश्वमेघ यज्ञामध्ये या ऋचेचा अश्वाच्या सन्निध जप करण्यात येतो. **इंद्रावरूण सूक्तात** आत्म्याचे मनोगत दिले आहे. **अनेकदेवता सूक्तात** अग्नीच्या रूपाचे वर्णन आहे. त्या सूक्तातील एक मंत्र नित्य वैश्वदेव कृतीमध्ये पठण केला जातो.

**मंडल ५**

ऋग्वेदातील एकूण दहा मंडलांपैकी हे पाचवे मंडल आहे. यात एकूण ८७ सूक्ते आणि ७२७ ऋचा आहेत.

**अग्नि सूक्तामध्ये** अग्निदेवतेला आळवून भक्तांना सुख, मार्गदर्शन, कल्याण व संकटमुक्ती, तसेच धन, आरोग्य व विजय प्राप्त करून देण्यासाठी मागणे मागितलेले आहे. तसेच सर्व धार्मिक कृत्ये सफल होण्यासाठी इच्छा व्यक्त केलेली आहे.

**इंद्र सूक्तामध्ये** नेहमीप्रमाणेच इंद्राची, त्याच्या गुणांची, पराक्रमाची, त्याच्या सामर्थ्याची स्तुती करून त्याला अश्वरथातून यज्ञाच्या ठिकाणी येण्याची व सोमरस, जो इंद्राला अत्यंत प्रिय आहे, तो प्राशन करण्याची विनंती केलेली आहे. **सूर्यग्रहण सूक्तात** सूर्यग्रहणाचा अत्यंत महत्त्वाचा उल्लेख आलेला आहे. आधुनिक दुर्बिणी किंवा वेधयंत्र ह्या आताच्या प्रगत युगातल्या गोष्टींप्रमाणे वेदकालात तुरीय नावाचे उपकरण तयार करण्यात आलेले होते व त्याच्या सहाय्याने सूर्यग्रहणाचा वेध घेण्याचे काम चालत असे. **विश्वदेव सूक्तात** विश्वदेव किंवा अश्विनीकुमारांना यज्ञाच्या ठिकाणी पाचारण करण्यात आलेले आहे. ४४ व्या विश्वदेव सूक्तात ६ देवतांची स्तोत्रे असून झोपलेल्या भगवंतांना जागे करण्यासाठी जागरस्तोत्र किंवा जागरमंत्र याच सूक्तांच्या अखेरीस आहेत. तसेच मूर्च्छित पडलेल्यास शुद्धीवर आणण्यासाठी या मंत्राच्या सहाय्याने पाणी शिंपडून त्यास मोहीत करून शुद्धीवर आणण्याचाही प्रयोग केला जातो. तसेच कोजागिरी पौर्णिमेच्या जागर व्रताच्या वेळी ह्या ऋचांचा पाठ करतात. **मरूत सूक्तात** मरूतांची, तसेच **देवता सूक्तांतही** मरूतांची प्रार्थना व त्याचप्रमाणे अन्य दानस्तुतीही केलेली आहे. **मित्रावरूण सूक्तात** मित्रावरूणांची व **अश्विनीकुमार सूक्तात** अश्विनीकुमारांची थोरवी गायिली आहे. **मित्रवरूणपालुपदसूक्त** व अश्विनीकुमारपालुपद सूक्तात त्यांना यज्ञस्थानी सोमपानार्थ व हवि अर्पण करण्यासाठी पाचारण केलेले आहे. **अश्विनीकुमारपालुपदसूक्त** ७८ मधील ३ ऋचा 'गर्भस्त्राविजी उपनिषद' म्हणून प्रसिद्ध आहेत. यामंत्राचा उपयोग प्रसूतीकाली अडलेल्या मनुय, गाय, अश्व व हरिण यांच्याबाबतीत हा प्रयोग केला जातो. मानवाचा गर्भ १० महिने उदरात असतो, त्यामुळे या तीन ऋचांच्या १० आवृत्त्या कराव्या लागतात. मानवाचा गर्भ उदरात चलनवलन करतो. तो उल्बाच्या खोलीत गुंडाळलेला असतो आणि आपणहून सजीवपणे बाहेर येतो, हा वैद्यकीय सिद्धांत त्या ऋचांमध्ये मांडलेला आहे. म्हणून हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. **सवितृ सूक्तात** सूर्याची थोरवी गायिलेली आहे व शिष्य आणि गुरू यांच्यातील ज्ञानासंदर्भात संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून त्याला विद्या देण्यापूर्वी त्याचा शिष्य म्हणून स्वीकार करताना ही ऋचा पठन केली जाते. उपनयन संस्कारात गायत्री दीक्षेच्या पूर्वी ही ऋचा पठन करून विद्यावान आचार्य आपली पाण्याने भरलेली ओंजळ बटूच्या हातावर सोडतो. **उषा सूक्तात** उषेची, पर्जन्य सूक्तात पावसाची, **पृथ्वीबळित्यासूक्तात** पृथ्वी देवीची स्तोत्रे गायिलेली आहेत.

**मंडल ६**

ऋग्वेदाच्या एकूण १० मंडलांपैकी हे ६ वे मंडल असून यात एकूण ७५ सूक्ते व ७६५ ऋचा आहेत.

**अग्निसूक्तात** अग्नीच्या अतुल सामर्थ्याची, तिच्या तेजाची व तिच्या मातृवात्सल्याची महती गाऊन पुत्रपाअत्रादि संपत्ती, शक्ती, सामर्थ्य, बळ, अन्नसमृद्ध, दीर्घायुष्य आणि पापापासून मुक्त ठेवण्याची प्रार्थना केली आहे. **वैश्वानरअग्निसूक्तात** वैश्वानर अग्नीचे वर्णन आहे. **इंद्र सूक्तात** इंद्राचे शत्रुनाशक, अजिंक्य, ओजस्वी, वीरश्रेष्ठ, युद्धकुशल, संततीदाता, सोमप्रेमी आणि स्वरूपसुंदर अशा शब्दांत वर्णन करून जगाच्या कोटकल्याणाकरिता केलेल्या प्रार्थना आहेत. **गोसूक्त** हे गायींचा गौरव करणारे सूक्त, तसेच त्यांची वृद्धी करणारे, दुधदुभते वाढविणारे, निरोगीता पसरवणारे असे सूक्त आहे. रोज सायंकाळी गायी गोठ्यात परत आल्यावर नैऋत्य कोपऱ्यात अग्नि प्रज्वलित करून धूप, गुग्गुळ अगर चंदन जाळावे व गायींच्या शेणींच्या सहाय्याने अग्नि तयार करून गायीचे दूध काढण्यापूर्वी गायीकडे तोंड करून, तिच्याजवळ जाऊन ही ऋचा म्हणावी. पृश्नीसुक्त (मरूत्) व देवतासूक्त, पूषनपालुपदसूक्त, पूषनसूक्त, विश्वदेवसूक्त, सरस्वतीसूक्त, इंद्राग्निसूक्त, अश्विनीकुमारसूक्त, उषासूक्त, मरूतसूक्त, मित्रावरूणसूक्त व इंद्रावरूणसूक्त, द्यावापृथिवीसूक्त, सवितृसुक्त, इंद्रासोमसूक्त, बृहस्पतीसूक्त, सोमरूद्रसूक्त ह्या सर्व सूक्तांत त्या त्या देवतांची स्तुती करून त्यांना यज्ञाच्या ठिकाणी पाचारण करून विविध इच्छापूर्तीसाठी प्रार्थना केलेली आहे. शेवटचे सूक्त **युद्धसूक्त** म्हणून प्रसिद्ध आहे. युद्धासाठी निघालेल्या राजास स्फूर्ती व आशिर्वाद प्रदान करण्यासाठी उपयोग करीत. तसेच राज्याभिषेकाच्या वेळी राजाला सर्व आयुधे त्या त्या मंत्राच्या घोषात प्रदान करण्यात येत असत.

**मंडल ७**

ऋग्वेदातील एकूण १० मंडलांपैकी हे ७ वे मंडल असून यात एकूण १०४ सूक्ते व ८४१ ऋचा आहेत.

यात अग्निसूक्त, वैश्वानरअग्नीसूक्त, इंद्रसुक्त, दाशराज्ञ युद्धसूक्त, संपातसूक्त, वशिष्ठ-इंद्र-संवाद-सूक्त, विश्वदेवसूक्त, सवितृवाजिनसूक्त, दधिक्रावनसूक्त, अपसूक्त, ऋभुसूक्त, आदित्यसूक्त, द्यावापृथिवीसूक्त, वास्तोष्पतीसूक्त, मरूत्सूक्त, सूर्यामित्रवरूणसूक्त, मित्रावरूणआदित्यसूक्त, अश्विनीकुमारसूक्त, उषासूक्त, इंद्रावरूणसूक्त, वरूणसूक्त, वरूणपालुपदसूक्त, इंद्रवायूसूक्त, इंद्राग्निसूक्त, सरस्वतीसूक्त, देवतासूक्त, इंद्रबृहस्पतिसूक्त, इंद्रविष्णूसूक्त, विष्णुसूक्त, पर्जन्यसूक्त, मंडूकसूक्त (बेडूक) व रक्षोघ्नसूक्त समाविष्ट आहेत. तसेच ३५ **शांति सूक्तात** घरभरणीच्या अगर पायाभरणीच्या वेळी

यातील पहिल्या ऋचेचा ३ वेळा पाठ म्हणतात. **प्रातःस्मरण सूक्तात** प्रातःस्मरण करावयाच्या ऋचा दिलेल्या आहेत. त्या अत्यंत नादमय, अर्थगर्भ व पाठ करण्यास उत्तम आहेत.

**विष सूक्तात** भक्तरक्षक मित्रावरूणांना, रोगाने ग्रासणाऱ्या विषापासून भक्तांचे संरक्षण करण्याची विनंती केलेली आहे. **स्वापदेव सूक्तात** २ ते ८ ऋचांना 'प्रस्वापिनी उपनिषद' असे म्हणतात. यात निद्रा देवतेचे स्तवन आहे. या ऋचांच्या पठणाने निद्रा लागते. **मरूतरूद्र सूक्तातील** १२ वी ऋचा म्हणजे प्रसिद्ध 'मृत्यूंजय' मंत्र होय! दीर्घायुषी होण्यासाठी या मंत्राच्या सहाय्याने शिवांना दुधात भिजवलेल्या भाताच्या शताहुती अर्पण करतात. आजारी व्यक्तीस दीर्घायुष्य लाभावे म्हणून, तसेच अकाली अपमृत्यू टाळण्यासाठीही या मंत्राचा उपयोग करतात. करावयाचे प्रयोगही यात दिले आहेत. **२१ व्या इंद्र सूक्तात** शिश्नदेवांची पूजा करणाऱ्या लोकांचा उल्लेख आहे. शिश्न हाच देव मानून त्याच्या तृप्तीत मग्न असणाऱ्यांना भक्तीच्या अगर यज्ञक्रियेमध्ये स्थान नाही. जितेंद्रियांना विशेष स्थान आहे म्हणून या सूक्तात इंद्राची एक विशेष प्रार्थना आहे.

### मंडल ८

ऋग्वेदातील एकूण १० मंडलांपैकी हे ८ वे मंडल असून यात १०३ सूक्ते व १७४२ ऋचा आहेत. १० व्या मंडलाखालोखाल १ ले व त्यानंतर या मंडलाचा क्रम लागतो. ही सूक्ते कण्व ऋषींनी रचलेली आहेत.

इंद्रसूक्त, इंद्रपूषनसूक्त, अश्विनीकुमारसूक्त, मरूतसूक्त, अग्निसूक्त, देवतासूक्त, आदित्यसूक्त, अश्विनीकुमारावायुसूक्त, विश्वेदेवसूक्त, वरूणसूक्त, सोमसूक्त, विष्णुइंद्रसूक्त अशी सूक्ते यात समाविष्ट आहेत. **३३ व्या इंद्रसूक्तात** इंद्राने स्त्रियांच्या मनाचे उत्कृष्ट चित्रण केलेले आहे व स्त्रियांनी कसे वागावे याबद्दल उत्कृष्ट मार्गदर्शन केलेले आहे. उदाहरणार्थ: "हे स्त्रिये, तू आपली नजर खाली ठेव! वर दृष्टी करू नकोस! आपले पाय नीट जुळलेले ठेव! आपला नितंबभाग दिसणार नाही, याची काळजी घे! तू स्त्री असलीस तरी या यज्ञात ब्रह्मा म्हणून तुझा गौर केला आहे." **कूटसूक्ताची** विश्वेदेव देवता असली तरी निरनिराळ्या १० देवतांच्या स्तुती यात आहेत. **दंपती सूक्तात** यज्ञकर्त्या पतीपत्नींना विपुल अन्न, विपुल संपती व दीर्घायुष्य प्राप्त होते. देव त्यांना पुत्रपौत्रादि प्राप्त करून देतात. यजमान दंपती पूषन देवावर श्रद्धा ठेवतात. **दुस्वप्नघ्नसूक्तात** निद्रेतील स्वप्न, जागृतीतील वाईट विचार,अशुभ कल्पना, अवैध कृत्यांची इच्छा, दुष्ट वासना, चौरकर्म वासना यांच्या नाशासाठी ऋचा दिल्या आहेत. **६१ व्या इंद्रसूक्तात** ५ ऋचा शांतीपाठ म्हणून प्रसिद्ध आहेत. अपशकून वगैरेंच्या परिणामनाशासाठी या सूक्तांतील वरील ५ ऋचांचा उपयोग करतात. **८१ वे इंद्रसूक्त** गणपतीसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. गणपती ही वैदिक देवता नाही. परंतु ब्रह्मणस्पती सूक्ताप्रमाणे या सूक्तातील वर्णन गणपतीला योग्यप्रकारे लागू पडते. म्हणून गणपतीभक्तांच्या पाठात या ९ ऋचांच्या सूक्ताचा समावेश आहे.

### मंडल ९

ऋग्वेदाच्या १० मंडलांपैकी हे ९ वे मंडल आहे. यात ११४ सूक्ते व ११७६ ऋचा आहेत. या मंडलातील बहुतेक सूक्ते **पवमान सोम सूक्ते** म्हणून प्रसिद्ध आहेत. सोम ही पर्वतीय, परंतु पाण्याच्या आश्रयाने थंड हवामानात वाढणारी वनस्पती. या वनस्पतीच्या रसाला सोमरस म्हणतात. यामध्ये विविध पदार्थ मिसळून विविध प्रकारचे रूप तयार करतात. त्याची माहिती या सूक्तात दिलेली आहे. सोमरस तयार करण्याची कृती– सोमवल्ली ओली असतानाच त्यात अत्यल्प पाणी घालून दगडांच्या सहाय्याने कुटून लोकरीच्या फडक्यातून गाळून तो सोमरस सोमपात्रात ठेवण्यात येतो. वरील कृती करीत असताना मुखाने या मंडलातील मंत्र म्हणावे लागतात. सोमरसामध्ये किंचित् मादकता, वीर्यवृद्धी आणि उत्साहनिर्मिती हे गुण आहेत.

या मंडलात 'पवमान पंचसूक्त' आहेत. यामध्ये एकूण ६६ सूक्ते असून विशेषत: भगवान विष्णूच्या अभिषेकाच्या वेळी हे सूक्तपंचक म्हणण्यात येते.

यात सोमाची स्तुती करून त्याच्याकडे विविध प्रकारच्या सुखांसाठी इच्छा व्यक्त केली आहे. **आसन्नमरण सूक्तातील** ऋचांच्या पठणाने आसन्नमरण असलेल्या मानवाला सुखाने मरण येते. हे सूक्त शुद्ध होऊन आसन्नमरण व्यक्तीच्या शिरोभागी बसून म्हणतात. त्यामुळे तिचे क्लेश सुसह्य होतात. या मंत्राच्या पवित्र पाण्याने त्याच्या नेत्रांना व जिभेला स्पर्श केला जातो.

### मंडल १०

**ऋग्वेदातील १० मंडलांपैकी हे सर्वात शेवटचे व अत्यंत महत्त्वाचे असे मंडल होय! यात १९१ सूक्ते व १७४४ ऋचा आहेत. विविध विषय या मंडलात समाविष्ट झालेले आहेत. अग्निसूक्त २** मध्ये देहपातानंतर प्रवास करणाऱ्या जीवांसाठी देवयान (देहाच्या आत संपूर्ण सचेतनता व शुद्धी आणि बाहेर उत्तरायण, शुक्लपक्ष आणि दिवस ह्या अवस्थांमध्ये देह ठेवणारा देवयान मार्गाने जातो) व पितृयान हे दोन मार्ग सांगितलेले आहेत. **अग्निसूक्त ५** मध्ये प्रज्ञावंत ऋषींनी निर्माण केलेल्या सात धर्ममर्यादा, म्हणजेच ज्यांचा आश्रय कधीही धरू नये. त्यांचा यात उल्लेख आहे. त्या सात आचाराची नावे: (१) पान-मद्य (२) अक्ष-द्यूत (३) स्त्रिया-व्यभिचार (४) मृगया-शिकार (५) दण्डपारूष्य-हिंसा (६) वाक्पारूष-वाक्ताडन (७) निंदा. हे मानवी आचारधर्माप्रमाणे निषिद्ध मानले आहेत. **अग्निसूत्र २०** या सूक्तातील एक चरण 'शांतीमंत्र' म्हणून प्रसिद्ध आहे. दुष्ट ग्रह व नक्षत्र यांच्या शांतीसाठी या मंत्राचा जप अथवा हवन करतात. इतर अग्निसूक्तांत अग्निदेवतेची स्तुती व सुखसमृद्धीसाठी केलेल्याप्रार्थना आहेत. **अप् सूक्तात** दोन महत्त्वाचे मंत्र आढळतात. त्यातील पहिला संध्येमध्ये मार्जन करताना म्हटला जातो, तर दुसरा श्राद्धसमयी पिंड जलदान करताना म्हटला जातो. यम-यमी संवाद सूक्तात यम व यमी ही भावंडे असून कामातुर यमी यमास, म्हणजे भावासच पुत्रप्राप्तीसाठी शरीरसंबंधाचा आग्रह धरते. परंतु यमनियमांचा नियंता यम तिला 'वैद्यशास्त्रीय दृष्ट्या' हा संबंध कसा उचित नाही, तेव्हा "तू माझ्यापासून दूर जाऊन अन्य पुरुषाला आलिंगन देऊन वश कर!" असे सांगून

या लोभापासून तिला परावृत्त करतो, असा संवाद आहे. **अंत्येष्टि सूक्तात** १४ ते १८ या पंच सूक्तांमध्ये अंत्यसंस्काराच्या वेळी पठण करण्यात येणारे काही महत्त्वाचे मंत्र आहेत. **स्मशान सूक्तात** पितरांना तृप्त करणाऱ्या अग्नीची प्रार्थना आहे. **गोसूक्तात** गाईंवर कृपादृष्टी रहावी यासाठी प्रार्थना केलेली आहे. **इंद्र सूक्तात** इंद्राची स्तुती व पराक्रमाचे वर्णन करून कल्याणासाठी प्रार्थना केलेली आहे. **इंद्रसूक्त २७** यात गृहस्थोपयोगी विचार मांडलेले आहेत. **अक्ष सूक्तात** अक्ष म्हणजे फांसे यांचा उपयोग केला जातो. त्यामुळे, म्हणजे या जुगारी खेळामुळे माणसाच्या आयुष्याचे किती अपरिमित नुकसान होते, त्याचा संसार कसा उध्वस्त होतो आणि त्याला कसे वाळीत टाकले जाते, तो कसा तिरस्करणीय होतो, हे सांगितले आहे. **सद्गति सूक्तात** बृहद्रथ ऋषींचा पुत्र वाजिन् याच्या मृत्यूनंतर त्याला सद्गती लाभावी म्हणून बृहरथ ऋषींनी अग्निरूपी सूर्याची प्रार्थना केलेली आहे. **अभिचारसूक्त–** चमत्कार किंवा जादूटोणा यालाच अभिचार असे नाव आहे. अभिचार सूक्तमंत्राने मृत व्यक्तीस सजीव करता येते, असे मानले जाते. ज्ञान सूक्तामध्ये ज्ञानोपासनेच्या अनेक पायऱ्या आहेत. नेत्र व कर्ण यांच्या सहाय्याने त्या चढल्या तर ज्ञानाच्या सागरात समृद्धपणे डुंबण्याचे सामर्थ्य प्राप्त होते, असा आशय मांडला आहे. **ग्रावनसूक्त:** सोमवल्लीपासून रस काढण्यासाठी ज्या दगडांचा उपयोग करतात त्यांना ग्रावन असे म्हणतात. त्या ग्रावनांना केलेली प्रार्थना यात आहे. विश्वकर्म सूक्तात ज्या विश्वकर्म्याने ही सृष्टी निर्माण केली त्या विश्वकर्म्याच्या लीलेचे वर्णन केले आहे. मन्यू सूक्तात उद्धारासाठी उत्साह प्रदान करणाऱ्या मन्युदेवतेचे वर्णन आहे. **सूर्याविवाह सूक्तात** सूर्यकन्या सूर्या व अश्विनीकुमार यांच्या विवाहसमारंभाचे वर्णन केलेले असून विवाह विधि व त्यांचे संस्कारमय उद्देश यांचे महत्त्व दर्शविलेले आहे. यामधील काही ऋचांमध्ये नवदांपत्याला द्यायचा आशीर्वादही सांगितला आहे. तसेच वधूला मंगलमयी, सौभाग्यसंपन्न, दशपुत्रांची माता, सासू, सासरे, नणंद, दीर यांना प्रसन्न ठेवणारी कर, असा आशीर्वाद दिलेला आहे.

**पुरुष सूक्तात** एकूण १६ ऋचा असून हे सूक्त भगवान विष्णूवर अभिषेक करताना वा ईश्वरोपासनेच्याबाबतीत पठण करतात. हे सूक्त म्हणजे परमेश्वराच्या विराटस्वरूपाचे वर्णन आहे. **औषधी सूक्तात** प्राचीन काळी देवतांनी ज्या १०७ वनस्पतींचा औषधी म्हणून उपयोग केला त्यांची स्तुती करून आशीर्वाद मागितलेले आहेत. **भिक्षू सूक्तात–** अन्नदानाची महती सांगितलेली असून निर्धन आणि भुकेलेल्याला अन्न न देणाऱ्या कृपणाची संपत्ती फोल होय! तेव्हा धनिकाने दान करणे सोडू नये, असे सांगितलेले आहे. **प्रजापति सूक्तात** पृथ्वीच्या रचनेसंबंधी प्रजापतीने ज्या क्रिया केल्या त्याचे सविस्तर वर्णन आहे. याच मंत्राने यज्ञात प्रजापतीला आहुती दिली जाते. **रात्री सूक्तात** रात्री या शब्दाचा अर्थ माया असत्याचा पुरावा पुराणात आहे. यास 'मायेचे गौरवसूक्त' असेही म्हटले जाते. या सूक्ताचे पठण सप्तशतीच्या परिवार सूक्तातील एक सूक्त म्हणून सप्तशतीच्या पाठापूर्वी करण्याचा एक प्रघात आहे. दु:स्वप्नांच्या परिहारासाठी, तसेच रात्री झोपताना या सूक्ताचा पाठ म्हणतात. **नासदीय सूक्तास** ऋग्वेदातील एक उत्कृष्ट सूक्त म्हटले जाते. सृष्टीच्या रचनेचा इतिहास यात आहे. **इंद्रसूक्त १४५** हे इंद्रपत्नीने आपल्या सवतीचा किंवा आपल्या शरीरसुखाच्या आड येणाऱ्या युवतींचा नाश व्हावा म्हणून रचले आहे. **आदित्य सूक्ताचा** शांतिपाठ म्हणून उपयोग केला जातो. **आशीर्वाद सूक्तात** यज्ञीय यजमान, यजमानपत्नी व यज्ञकर्ते पुरोहित यांना आशीर्वाद देण्यात आलेला आहे.

याशिवाय या मंडलात इतर मंडलांतील सूक्तांप्रमाणेच त्या त्या देवतांचे व त्या त्या विषयांचे (उदाहरणार्थ: गर्भरक्षसूक्त, शत्रुनाशनसूक्त, दु:स्वप्ननाशनसूक्त, रोगनाशकसूक्त, श्रद्धासूक्त, रक्षोघ्नसूक्त, आत्मानुभवसूक्त, तार्क्षसूक्त (गरूडसूक्त) पर्जन्यसूक्त इत्यादी) वर्णन करून जगाच्या कल्याणाकरिता प्रार्थना केलेली आहे. तसेच अपयुक्तसूक्त, सोमसूक्त, पूषनसूक्त, बृहस्पतिसूक्त, आप्रीसूक्त, सृष्टीउत्पत्तीसूक्त, प्रजापतीसूक्त इत्यादी देवतांच्या प्रार्थना व त्यांची महती यांचे वर्णन आहे.

दहावे मंडल हे विविध विषयांचे ज्ञानभांडार आपल्यापुढे उघडे करते आणि म्हणून हे मंडल अतिशय महत्त्वाचे ठरले आहे. याशिवाय इतर नऊ मंडलांमध्येही आपल्याला अभिप्रेत असलेल्या अनेक विषयांवरील सूक्ते महत्त्वपूर्ण माहिती देतात. खोलात जाऊन विचार केल्यास या ज्ञानकमलाची एकेक पाकळी अलगद उलगडत चालल्याचे हळूहळू लक्षात येऊ लागते. त्यातील गर्भितार्थ ध्यानात येऊ लागतो. अर्थात्, हा ज्ञाननिधी असा आहे की तो एका जन्मात उलगडत जाणे महाकठीण. तरीही अंशभर का होईना आपण त्याचा आस्वाद घेऊ शकलो तर याचा आनंदही काही थोडा नाही!

ऋग्वेदाची मूळ संहिता व्यासांची असली तरी उत्तरकाळात या वेदांत काही सूक्त समाविष्ट होत गेली. अशा सूक्तांना 'खिलसूक्ते' म्हणतात तसेच यांनाच परिशिष्टसूक्ते किंवा पदशिष्टसूक्ते असेही नाव आहे. यांना पद-क्रम-पाठ नाही. खिलसूक्ते विविध असून त्यांचा विनियोग खालील गोष्टींसाठी करण्यात येतो.

(१) शकुनसूक्त– अपशकूनांचा परिहार करणे. (२) श्रीसूक्त– वैभवप्राप्ती. (३) पावमानीसूक्त– पवमानाची फलश्रृती. (४) रात्रीसूक्त– सुखनिद्राप्राप्ती. (५) मेघासूक्त– उपनयन संस्कारात मेधाजनन. (६) संज्ञानसूक्त– कल्याणप्रद समभाव प्रार्थना.

यातील श्रीसूक्त हे उत्तम व प्रभावी सूक्तांपैकी एक सूक्त आहे. 'श्री' याचा अर्थ केवळ धन किंवा लक्ष्मी नसून या सूक्तात 'श्री'चे विविध अर्थ दिलेले आहेत. संपत्ती, सत्ता, आयुष्य, आरोग्य, दीप्तिमान ऐश्वर्य, कीर्ति, धान्य, धन, पशुधन, पुत्र, नातवंडे आणि शतवर्षांचे प्रदीर्घ आयुष्य ह्या गोष्टी एकत्र आल्या की त्यास 'श्री' असे म्हणतात. ह्या सर्व गोष्टींचा लाभ घडून यावा म्हणून या सूक्ताचे पठण केले जाते. तसेच देवीच्या नक्षत्रांत विशेष संकल्प करून या सूक्ताचे पाठ केले जातात. त्याचप्रमाणे देवीवर अभिषेक करण्यासाठी याच सूक्ताचा उपयोग

केला जातो. यातील पहिल्या १५ ऋचांचा पाठ झाला म्हणजे एक अभिषेक पूर्ण होतो. १६ ऋचा ही फलश्रुती आहे. तसेच पुढील फलश्रूतीच्या ९ ऋचा लक्ष्मी गायत्री म्हणून पाठ पूर्ण करतात. विशेषकरून दोन्ही संध्यासमयी गायीची धार काढताना, स्नान करताना, बी पेरताना, झाडांना पाणी घालताना, पृथ्वी, विहीर, दीप यांची पूजा करताना, लक्ष्मीपूजन (दिवाळीत) करताना आणि देवीचे दर्शन घेताना हे सूक्त म्हणावे असा संकेत आहे.

ऋग्वेदाचा तसेच पर्यायाने वेदांचा विस्तार हा महाप्रचंड व महाकाय असा आहे. तो ज्ञानसागर सहजासहजी साध्य होणारा नव्हे. तोसामान्य मानवाच्या आकलनापलीकडील आहे. तो पार करण्यासाठी आचार्यांची, तसेच त्यांच्या सहाय्याने असंख्य ज्ञानाच्या पायऱ्या चढून जाण्याची आवश्यकता आहे. त्यातील एकेक पायरी म्हणजे बारा वर्षांचे गुरूच्या सान्निध्यातील तप होय! त्यामुळे संपूर्ण वेदांचे अनुभूतीपूर्ण अध्ययन करणे, हे अतिशय अवघड आहे. तरीसुद्धा 'वेदांत वा पुराणांत आहे तरी काय?' या प्रश्नाचा थोडातरी उलगडा वरील माहितीवरून झाला असेल, अशी अपेक्षा आहे. एवढे झाले तरी आपल्यासारख्या सामान्यजनांसाठी खूप आहे. हा आनंदही काही थोडा-थोडका नाही, तर तोही प्रचंडच आहे आणि जसजसे खोलात शिरून त्याचे अध्ययन करावे तसतसे त्याचे विविध पैलू अधिकाधिक समर्थपणे उलगडत जातील, यात शंकाच नाही. म्हणून ज्या प्रज्ञावंतांनी, ज्या महर्षिंनी, ज्या गुरूंनी या वेदांचा, त्यांच्या विविध शाखा व उपशाखांचा काटेकोरपणे अभ्यास करून जगाला हे ज्ञानाचे दालन उघडे करून दिले त्यांना मनोभावे वंदन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे!

आपले वेद आपली पुराणे ठेव योजनेतील
ग्रंथ: ऋग्वेद
**ले.: स. कृ. देवधर**
**प्रकाशक: श्री. मनोहर य. जोशी**
**प्रसाद प्रकाशन, १८९२ सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.**

---

(पृष्ठ क्र. ५ वरून)

महामत्स्या। बौद्धिक ज्ञानजलाच्या प्रलयांत तूं आमचें हें तारूं पैलतीराला नेऊन सुरक्षित लाव!

हे हनुमंता! तूं आमचे जाणिवेंत सांपडलास, हें म्हणणें म्हणजे वाऱ्याची मोट जाळ्यांत बांधली, असें म्हणण्याप्रमाणेंच व्यर्थ आहे. गुरु म्हणजे मोठें. अर्थात हे सद्गुरो। ''जें जें पाहीं भूत तें तें जाणावें भगवंत।'' असा या असंख्य आणि अमर्याद वस्तूजाताचे ठिकाणीं तुझा साक्षात्कार कसा होईल बरें? तुझें महाभाग्यवान भक्त संत देवनाथ यांस असा साक्षात्कार झाला होता. त्यांना त्यांचे सद्गुरू आणि सारे सद्रूप विश्व हनुमद्रूप म्हणजे आत्मरूप दिसूं लागलें! तसें मला 'कधीं दिसेल बरें?' असें म्हणतांना प्रथम तुझ्या सगुण दर्शनाची मी अपेक्षा करीत आहें, हे उघड आहे. शुद्ध पट हें नसें त्यावरील चित्राचें अधिष्ठान, त्याप्रमाणें खळ लावलेला शबलपट हेंहिं अधिष्ठानच नव्हे काय! जगचित्रास किंवा स्वमुखदर्शनास आकाश हा फलक किंवा आदर्श योग्य नव्हे, त्यास आधारभूत निदान मध्यें कांच तरी पाहिजे. तेंच वर्णनाचा व चिंतनाचा विषय होणे शक्य आहे. त्यापुढें कोणीं काय बोलावें? व काय जाणावें! जीव-जगत् ईश्वर या द्वैतभावनेचा एका परमात्मस्वरूपीं लय होणें, हें ध्येय खरें. पण ते बिंबरूप एकमुख पाहाणार कोण? सचश्चिदात्मा विविधाकृतिश्चित्, सिद्धयेत्पृर्यक्सत्यचितो न भिन्ना, भूषा विकारा: किमु सन्ति सत्यं, विना सुवर्ण पृथमय लोके॥१५॥ तद् युष्मदोरस्मदि संप्रतिष्ठा, तस्मिन्विनष्टेऽस्मदि मूलबोधात्। तद् युष्मदसन्मति वर्जितैका, स्थितिर्ज्वलन्ति सहजाऽत्यन:स्यात्॥१६॥ श्रीरमन सद्दर्शनानुवाद.

---

(पृष्ठ क्र. ११ वरून)

वाचविले आणि तीच वडिलांची भक्ती 'पुढें चालवा ही प्रचिती' आणून दिली. असो.

साईबाबांची स्वामी समर्थांशी असलेल्या एकात्मतेबद्दल याआधी अ. ५, ओ. ५६ मध्ये निंबातळीच्या पादुकास्थापनाच्या आख्यानात आलेच आहे:

**उद्या जाणार तों आज स्वप्न।**
**स्वामीसमर्थ आज्ञापन।**
**शिरडीस सांप्रत मम स्थान।**
**तेथें तूं प्रस्थान करी गा॥५६॥**

त्याशिवाय कै. प. पू. नरसिंहस्वामीजींनी त्यांच्या Sai Baba's Charters and Sayings या पुस्तकातील अनुक्रम ७४ मध्ये एका भक्ताचा याबाबतीत अनुभव कथन केला आहे; तो असा:

''मुंबईतील ताडदेव येथील केशव नाईक इ.स. १८७८ च्या सुमारास अक्कलकोटी गेले तेव्हा स्वामी समर्थांचा निर्याणाचा बेत चालल्याचे त्यांना कळले. तेव्हा त्यांनी महाराजांना विचारले, ''महाराज! आपण गेल्यावर आम्हाला आश्रय कोणाचा?'' त्यावर स्वामींनी त्यांना आपल्या पादुका देऊन त्यांची पूजा करण्यास सांगितले. तसेच ''आता आपला अवतार अहमदनगर जिल्ह्यात शिरडी येथे होईल, तेथे तू नेहमी जात जा व तेथेच तुझी भक्ती चालू ठेव, म्हणजे तुला माझी आठवण होणार नाही व तू सुखी होशील,'' असेही सांगितले. केशव नाईक मग शिरडीला नेहमी जाऊ लागले.

स्वामी समर्थांना त्यांचे भक्त दत्ताचा अवतार मानतात. तेव्हा साईबाबांनाही आम्ही दत्तात्रेयाचा अवतार मानून त्यांची आरती करतो यात आश्चर्य नाही:

**''अवतीर्ण झालासे।**
**स्वामी दत्त दिगंबर॥ दत्त दिगंबर॥**
**आरती साईबाबा॥६॥''**

**''ऐसा येई बा।**
**साई दिगंबरा। अक्षयरूप अवतारा।**
**सर्वहि व्यापक तूं।**
**श्रुतिसारा। अनुसयाऽत्रिकुमारा॥ध्रु॥''**

**रुसो भगिनी बंधुही,**
**श्वशुर सासुबाई रुसो।**
**न दत्तगुरू साइ मा,**
**मजवरी कधीही रुसो-॥१॥**

# पाऊलरेषा विद्या

तुम्हाला आपले भविष्य जाणण्याची इच्छा आहे का? अहो, हा काय प्रश्न झाला? आपले भविष्य काय आहे हे जाणण्याची इच्छा कोणाला नसते? हां, तसे काही लोक म्हणतात, ''भविष्य वगैरे सब झूट आहे. असे भविष्यात लिहिलेले कोणाला कळणे शक्य आहे का?'' तसे पाहिले तर हे त्यांचे म्हणणे वरवरचे असते. त्यांनाही अंतर्यामी उद्या काय घडणार आहे, वर्षाने काय घडणार आहे, दहा वर्षांनी काय होईल हे सर्व जाणण्याची इच्छा असते. भविष्यात फेरफटका मारायला कोणाला आवडणार नाही?

## भविष्य जाणण्याची साधने

मग हे भविष्य मानव कशाच्या आधाराने जाणून घेत असतो. चंद्राच्या उगवण्याच्या वेळेच्या अनुरोधाने समुद्राला भरती येते व ओहोटी लागते, हे पाहिल्यावर आकाशातील ग्रह, तारे हे पृथ्वीवर आणि पर्यायाने मानवावर परिणाम करीत असलेच पाहिजेत, असे मानवाला वाटले व त्याने माणसाच्या जन्मवेळेची ग्रहरचना काय असते हे पाहून त्यावेळच्या ग्रहरचनेच्या अनुरोधाने माणसाचा स्वभाव, त्याची कर्तबगारी, त्याची आकांक्षापूर्ती ह्या गोष्टी ठरविण्याचा प्रयत्न चालविला. ह्या ग्रहरचनेलाच आपण 'जन्मलग्नकुंडली' असे म्हणतो व तिच्यावरूनच ज्योतिषी माणसाचे भविष्य वर्तवीत असतात. ग्रहताऱ्यांच्या ह्या मानवावर होणाऱ्या परिणामामुळेच लग्नाच्या बाबतीत पत्रिकेला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. कित्येक लोक तर ह्या कुंडल्या जमल्याशिवाय लग्नाच्या बाबतीत पाऊल पुढे टाकण्यास कोणत्याही प्रकारे तयार नसतात!

निरनिराळ्या लोकांच्या हातावरील रेषांचा अभ्यास केल्यावर असे दिसून आले की त्या सारख्या नसतात. एवढेच काय प्रत्येक हात हा इतका निराळा असतो की त्याच्यासारखा दुसरा हात (रेषा व चिन्हे ह्यांच्या बाबतीत) नसतो. म्हणूनच सर्व गुन्हेगारांच्या हातांचे ठसे उमटवून घेऊन ते पोलिसखात्याने जपून ठेवलेले असतात. ह्या ठशांचा उपयोग गुन्हे अन्वेषण खात्याला फार होतो आणि त्या बाबतीतील ठशांचे जे तज्ज्ञ असतात ते त्या ठशांवरून गुन्हेगार नेमका शोधून काढतात.

आता हात म्हटला की आपल्याला सहज जर कोठली गोष्ट जाणवत असेल तर ती म्हणजे हातावरील रेषा व उंचवटे. ह्या रेषांपैकी काही ठळक असतात तर काही पुसट असतात. हातावरील उंचवटेही कमी अधिक उंचीचे असतात. ह्याशिवाय सामान्य माणसांना सहज न दिसणारी अशी काही चिन्हे हातावर असतात. त्यांना शास्त्रीय भाषेत शंख, चक्र, शुक्ति अशा संज्ञा आहेत. तेव्हा हातावरील रेषा, उंचवटे व चिन्हे हे सर्व पाहून व त्यांची फळे लक्षात घेऊन हस्तसामुद्रिक कोणाही माणसाचे भविष्य वर्तवीत असतो.

ह्या भविष्य सांगण्याच्या वरील दोन पद्धतीशिवाय रमलज्योतिष, मुखपरीक्षाशास्त्र (चेहरा पाहून भविष्य वर्तविण्याचे शास्त्र) अशा अन्य तऱ्हांनी भविष्य वर्तविले जाते; पण आपले हात आणि त्यावरील रेषा व उंचवटे हे जर माणसाचे भविष्य सांगण्यास उपयुक्त ठरतात, तर आपले पाय आहेत त्यांच्यावरही रेषा व उंचवटे आहेत त्यांचा उपयोग भविष्य वर्तविण्यासाठी होणार नाही का? असा विचार सुप्रसिद्ध हस्तसामुद्रिक श्री. अश्विन इंद्रसेन रेळे ह्यांना बरेच दिवस सतावीत होता; परंतु एक जुना संस्कृत ग्रंथ त्यांच्या हाती आला आणि त्याने हे पावलांवरील रेषा, उंचवटे ह्यांचे रहस्य उलगडण्यास त्यांना मदत केली. म्हणून 'हस्तसामुद्रिक भूषण', 'रत्नभूषण', 'ज्योतिष पंडित', 'ज्योतिष भास्कर', 'सामुद्रिक चिकित्सक' ह्या पदव्या असलेल्या श्री. रेळे ह्यांनी त्या ग्रंथाचा अभ्यास करून त्यातील भविष्यकथनाची पद्धत सोप्या मराठी भाषेत, सामान्य माणसांनाही कळेल अशा पद्धतीने मांडण्याचे ठरविले. ह्या त्यांच्या संकल्पाचे फलित म्हणजेच प्रस्तुतचा 'पाऊलरेषा विद्या' हा ग्रंथ होय.

### तळपायाचा विचार


आपल्या शरीरातील पायांचे महत्त्व फार मोठे आहे. आपल्या सर्व शरीराचा भार वाहून नेण्याचे काम आपले पायच करीत असतात. त्यांची कधीच कोठल्याही प्रकारची तक्रार नसते. हां, एवढे मात्र खरे की आपण त्यांच्यावर अधिक ताण दिला की ते बोलू लागतात व त्यांना रगडून त्यांची सेवा करण्याची पाळी माणसावर येते! चालण्याप्रमाणेच कठिण समय येता किंवा काही संकट येताच पलायनाशिवाय आपल्याला दुसरा मार्गच राहिलेला नाही, असे स्पष्ट दिसताच पळण्यासाठी आपण पायांचाच उपयोग करतो आणि संकटातून आपली सुटका करून घेत असतो. आपले पाय आपल्याला इतके उपयोगी पडत असले तरी त्यांच्याकडे आपले लक्ष मात्र कमीच असते. एक गोष्ट मात्र आपण नियमाने करीत असतो, आपल्या पायाच्या बोटांची नखे ज्यावेळी वाढतात त्यावेळी ती आपण काढून टाकीत असतो!

आपण जरी पायाला वर सांगितल्याप्रमाणे फारसे महत्त्व देत नसलो तरी रेळे सांगतात की पायाच्या त्वचेचा रंग व त्याचा मऊ अथवा राकटपणा ह्यावर माणसाचे भविष्य अवलंबून असते. पाऊलरेषा विद्या ह्या पुस्तकाच्या पृष्ठ ८ ते १६ ह्या भागात ह्याच गोष्टींचा विचार करण्यात आला आहे. पृष्ठ ८–१३ ह्या भागात त्वचेचे निरनिराळे प्रकार व त्यावरून निष्पन्न होणारे भविष्य सांगितलेले आहे. त्वचेच्या रंगछटा पुढीलप्रमाणे असतात. (१) गुलाबी रंगछटा, (२) लालभडक रंगछटा, (३) पांढुरकी रंगछटा, (४) काळसर रंगछटा, (५) पिवळी रंगछटा, (६) निळी रंगछटा व (७) हिरवी रंगछटा. अर्थातच ह्या प्रत्येक रंगछटेचा परिणाम मानवाच्या जडणघडणीवर निरनिराळ्या प्रकारांनी घडत असतो. गुलाबी रंगछटा असणारी व्यक्ती सुखी व भाग्यवान असते, लालभडक रंगछटेचा माणूस स्वभावाने चंचल असतो, पांढुरकी छटा असणारे लोक ऐतखाऊ असतात, त्यांना जिद्द नसते, कमी कर्तृत्वामुळे ह्यांच्यात उदारपणाचा अभाव असतो. अशाप्रकारे ह्या सर्व रंगछटांच्या व्यक्तींचे वर्णन रेळे ह्यांनी आपल्या पुस्तकाच्या वरील पृष्ठांत केले आहे. अर्थात सामान्यजनांना ह्या निरनिराळ्या रंगछटा समजणे कठिण आहे. तज्ज्ञ व्यक्तीच त्या रंगछटा सरावाने जाणू शकतील.

पावलाच्या रंगाप्रमाणेच त्याची त्वचा ज्या प्रकारची असेल त्या प्रकाराप्रमाणेही भविष्य बदलत असते. त्वचेचे मुख्य दोन प्रकार असतात, एक मऊ, तलम त्वचा व दुसरी खडबडीत राकट त्वचा. ह्यापैकी मऊ त्वचेची

माणसे अत्यंत सुसंस्कृत व सभ्य असतात. ते आशावादी व कशाही परिस्थितीत सुखी असतात. तर खडबडीत त्वचेची माणसे काबाडकष्ट करणारी व श्रमजीवी असतात, असे श्री. रेळे सांगतात. (पृ. १४ ते १६)

## तळपायावरील रेषा व चिन्हे




आपण आपल्या तळपायांकडे सूक्ष्म दृष्टीने पहात नाही त्यामुळे आपल्या तळपायांवरदेखील तळहाताप्रमाणेच रेषा व चिन्हे असतात. ह्याची आपल्याला कल्पनाही येत नाही; पण रेळे ह्यांच्या पुस्तकांतील पृष्ठ १७ ते २४ पाहिल्यावर आपल्याला कळून येते की आपल्या तळपायावरही रेषा असतात. त्यांच्या आकृत्या पृष्ठ १७ व पृष्ठ १८ वर दिल्या आहेत.

तळपायावर चिन्हे किती प्रकारची असतात त्यांचे वर्णन ह्या पुस्तकात पृष्ठ १८ ते २२ वर केलेले दिसेल. चक्र, शंख, शुक्ति, चौकोन, त्रिकोण, फुली, नक्षत्र ही सामान्यपणे तळपायावर दिसणारी चिन्हे होत. ह्या चिन्हांची फळे प्रस्तुत पुस्तकात पुढीलप्रमाणे दिली आहेत :

**चक्र :** ज्याच्या एका बोटावर चक्र असते तो माणूस चतुर असतो. दोन चक्रे असणारा ऐश्वर्यवान असतो. तीन चक्र असणारा रंगेल व विलासी असतो. अशाप्रकारे पुढे ४ ते दहा चक्रे असणाऱ्या माणसांचे स्वभाव पृष्ठ १९ व २० वर दिले आहेत.

**शंख :** एका बोटावर शंख असणारा माणूस बुद्धिमान व चळवळ्या असतो. दोन बोटांवर शंख असणारा माणूस विरक्त व संन्यस्त वृत्तीचा असतो. अशाप्रकारे पुढे ३ ते १० शंख असणाऱ्या माणसांचे भविष्य पृष्ठ १९ वर सांगितले आहे.

**शुक्ति :** हे चिन्ह फारच थोड्या पावलांवर आढळते. एकाच बोटावर शुक्ति असलेला मनुष्य दरिद्री असतो. दोन शुक्ति असणारा धनवान व ऐतखाऊ असतो. अशा माणसाला वडिलोपार्जित धन मिळते. अशाच प्रकारे पुढे ३ ते १० शुक्ति असणाऱ्या माणसांचे भविष्य पृष्ठ वीसवर दिसते. शेवटच्या १० शुक्ति असलेल्या माणसाचे कर्तृत्व अलौकिक व लोकोत्तर असते, असे श्री. रेळे म्हणतात. (पृ. २०)


इतर चिन्हे म्हणजे चौकोन, त्रिकोण, फुली, नक्षत्र ह्यांच्या आकृत्या देऊन त्यांचीं फळे पृ. २१ वर दिलेली आहेत. त्रिकोण हे चिन्ह ऐश्वर्य व कीर्ती देणारे आहे. तर चौकोन हे चिन्ह पायावर अपवादात्मकच असते, असे सांगून त्याचे फळ म्हणजे मनुष्य परिस्थितीच्या बंधनात गुरफटलेला असतो. फुलीमुळे जीवनात मोठ्या उलथापालथी घडतात व नक्षत्रामुळे काही वैशिष्टचपूर्ण फलप्राप्ती होते. हे चिन्ह असणारा माणूस महान खटपट्या असून महत्वाकांक्षी असतो. ह्या चिन्हाची आणखी फळे पृष्ठ २२ वर दिली आहेत.

ह्यानंतर पृष्ठ २२ वर यव, बिंदु, वर्तुळ, मत्स्य ह्या चिन्हांची फळे देऊन पताका ह्या क्वचितच दिसणाऱ्या चिन्हाचे फळ पृष्ठ २३ वर दिले आहे.

ह्याशिवाय ही चिन्हे कोणत्या पायावर असतात, त्याप्रमाणे त्यांचे फळ असते, असे सांगून श्री. रेळे ह्यांनी ही चिन्हे उजव्या पायावर असतात तेव्हा काय फळे मिळतात व डाव्या पायावर असल्यास काय फळे मिळतात, त्याचे वर्णन पृ. २३ वर दिले आहे.

## तळपायावरील रेषा व उंचवटे

तळपायावरील रेषा पाहिल्यावर श्री. रेळे ह्यांच्या मनात ह्या रेषांचा उपयोग भविष्य वर्तवण्यासाठी (हातावरील रेषांप्रमाणे) होईल की नाही, अशी शंका निर्माण झाली आणि त्यांनी त्या दृष्टीने शोध करण्यास सुरूवात केली. शेवटी पूर्वीच्या काही ग्रंथांच्या अभ्यासाने व अवलोकनाने त्यांना तळपायावरील रेषांचे ज्ञान झाले व त्यांची फळे कळू लागली (पाऊल टाकण्यापूर्वी). ह्यासंबंधी श्री. रेळे म्हणतात, ''पावलाच्या सामुद्रिक विद्येत अनेक रेषा व त्यांची फळे




ह्यांची माहिती पूर्वीच्या ग्रंथांत देण्यात आली आहे; परंतु ह्या रेषांना हस्तसामुद्रिकाप्रमाणे नावे दिलेली नाहीत. त्यामुळे ही विद्या फार पुढे येऊ शकलेली नाही. म्हणून आता पायावरील रेषा व उंचवटे ह्यांना नावे देण्याचा प्रयत्न केला आहे.'' (पृ. २४)

वरील प्रस्तावना केल्यावर श्री. रेळे ह्यांनी पायावर आढळणाऱ्या एकूण ३९ रेषांचे वर्णन करून त्यांच्या प्रत्येकी एक (पृष्ठ ३४ वर ज्ञानवंत रेषेच्या दोन) ह्याप्रमाणे प्रत्येक रेषेच्या वर्णनासोबत आकृत्याही काढून दाखविल्या आहेत. ह्या सर्व रेषांचे फळही सविस्तर वर्णन केले आहे (पृ. २५ ते ४२). तळपायावरील ह्या रेषांची नावे पुढीलप्रमाणे आहेत: (१) प्रवासी रेषा, (२) पराक्रम रेषा, (३) चंद्राकृती रेषा, (४) नेतृत्व रेषा, (५) प्रमुख रेषा, (६) पुरुषोत्तम रेषा, (७) माया रेषा, (८) मदन रेषा, (९) भंपक रेषा, (१०) चिकित्सक रेषा, (११) योगी रेषा, (१२) ख्यालीखुशाली रेषा, (१३) तत्त्वनिष्ठ रेषा, (१४) नुकसान रेषा, (१५) गूढवादी रेषा, (१६) वैराग्य रेषा, (१७) कला रेषा, (१८) सद्भाग्य रेषा, (१९) सन्मान रेषा, (२०) ज्ञानवंत रेषा, (२१) बंधनयोग रेषा, (२२) पुढारी रेषा, (२३) गूढविद्या रेषा, (२४) चोर रेषा, (२५) वरदहस्त रेषा, (२६) दैवज्ञ रेषा, (२७) बहुश्रुत रेषा, (२८) संपत्ती रेषा, (२९) कुटिल रेषा, (३०) निरुत्साह रेषा, (३१) व्यभिचार रेषा, (३२) कवि रेषा, (३३) अधिकार रेषा, (३४) गुप्तधन रेषा, (३५) सज्जन रेषा, (३६) संन्यासी रेषा, (३७) यशदायी रेषा, (३८) व (३९) यशदायी रेषा.

वरील रेषांपैकी १ ते २८ ह्या रेषा उजव्या पायावरील पहाव्या व पुढच्या २९ ते ३९ ह्या रेषा डाव्या पायावरील पहाव्या, असे श्री. रेळे सांगतात. उजव्या व डाव्या पायावरील रेषांतील फळाच्या दृष्टीने फरक स्पष्ट करताना श्री. रेळे सांगतात, ''उजव्या पायाप्रमाणे डाव्या पायावरही रेषा असतात; पण उजव्या तळपायावरील रेषा अधिक फळे देतात. त्या मानाने डाव्या तळपायावरील रेषा कमी प्रभावी व कमी फळे देणाऱ्या असतात (पृ. ३८). प्रवासी रेषा, पराक्रम रेषा, नेतृत्व रेषा, मदन रेषा, भंपक रेषा, योगी रेषा, तत्त्वनिष्ठ रेषा, नुकसान रेषा, गूढवादी रेषा, वैराग्य रेषा, कला रेषा, सन्मान रेषा, पुढारी रेषा, गूढविद्या रेषा, चोर रेषा, दैवज्ञ रेषा, बहुश्रुत रेषा, संपत्ती रेषा, कुटिल रेषा, निरुत्साह रेषा, व्यभिचार रेषा, कवि रेषा, अधिकार रेषा, सज्जन रेषा, गुप्तधन रेषा, संन्यासी रेषा, यशदायी रेषा इत्यादी जी रेषांची नावे श्री. रेळे ह्यांनी दिली आहेत, त्यांचा विचार केला असता पुढील गोष्टी मुख्यत: लक्षात येतात :

(१) हस्तसामुद्रिकामध्ये सध्या प्रचलित असलेली धनरेषा, आयुष्यरेषा इत्यादी रेषांच्या नावापेक्षा वरील नावे निराळी आहेत.


(२) रेषांच्या नावावरून त्यांच्या फळांची कल्पना करता येते व श्री. रेळे त्या त्या रेषांची तीच फळे (आपल्या कल्पनेप्रमाणेच) सांगतात.

(३) नेतृत्व रेषा – पुढारी रेषा, गूढवादी रेषा – गूढविद्या रेषा, वैराग्य रेषा – योगी रेषा – संन्यासी रेषा, संपत्ती रेषा – गुप्तधन रेषा, मदन रेषा – व्यभिचार रेषा, अशाप्रकारच्या काही रेषांच्या जोड्यांचा विचार केल्यास त्यांची फळे जवळजवळ सारखीच आहेत. मग त्यांना ही निराळी नावे कशाला?

(४) आपल्या हस्तसामुद्रिक शास्त्रात बहुतेक रेषांची नावे ही संस्कृत किंवा त्या भाषेवर आधारित अशी आहेत. त्यांमध्ये 'भंपक रेषा' हे नाव बसण्यासारखे नाही. अर्थात अलीकडे 'भंपक' माणसे फार निर्माण होत आहेत. तेव्हा त्यांचे यथातथ्य वर्णन तोच (भंपक) शब्द करू शकतो. त्यामुळे औचित्याचा विचार बाजूस सारून तो शब्द वापरणे श्री. रेळे ह्यांना अपरिहार्य झाले असावे.

### चिन्हे

शंख, चक्र, शुक्ति इत्यादी चिन्हे ज्यावेळी पायाच्या बोटांवर असतात त्यावेळी त्यांची फळे काय असतात, ह्याचे वर्णन श्री. रेळे ह्यांनी पृ. १८ ते २३ वर केलेच आहे; परंतु




स्वस्तिक व चक्र ही चिन्हे काही वेळा खुद्द तळपायावरही असतात त्यावेळी त्यांची फळे काय असतात ह्याचे वर्णन पृ. ४३ व ४४ वर आलेले आहे. पृ. ४३ वर दिलेल्या आकृत्यांवरून ही चिन्हे कोठे दिसतात ते स्पष्ट होईल.

### पायाची बोटे

हस्तसामुद्रिकात तळहातावरील रेषा व उंचवटे ह्यांचे ज्याप्रमाणे महत्त्व असते, त्याप्रमाणेच हाताच्या बोटांचेही फार महत्त्व असते. बोटांची लांबी, जाडी त्यांच्यावरील चक्र, शंख इत्यादी चिन्हे, एवढेच काय बोटांची नखे व त्यांचा रंग ह्या सर्वांचा विचार हस्तसामुद्रिक करीत असतो. त्याप्रमाणेच पायाच्या बोटांचा विचारही पाऊलरेषा विद्येत आवश्यक असतो. प्रमाणबद्ध लांबीची बोटे, आखूड बोटे, फटी असलेली बोटे, पायाच्या बोटांची नखे, नखांच्या रंगछटा, पायाचा अंगठा ह्या सर्वांचा विचार प्रस्तुत पुस्तकात पृ. ४४ ते ४८ वर आलेला आहे. हाताची बोटे व पायाची बोटे ह्यांचे भविष्यकथनाच्या दृष्टीने काय महत्त्व आहे, हे सांगताना श्री. रेळे म्हणतात, ''हाताच्या बोटांना बौद्धिक व सांस्कृतिदृष्ट्या अतिशय महत्त्व असते तसे ते पायाच्या बोटांना नाही. म्हणून पादतलसामुद्रिकाच्या दृष्टीने त्याला विशेष महत्त्व देऊ नये. तरीदेखील काही फळे अनुभवसिद्ध आहेत.'' (पृ. ४४) अशी प्रस्तावना करूनच श्री. रेळे ह्यांनी पायाच्या बोटांची व नखांची चर्चा केली आहे.

अशाप्रकारे तळपायाच्या बोटांचा, नखांचा विचार फळाच्या दृष्टीने केल्यानंतर तळपायाच्या आकाराचाही विचार पृ. ४८ वर केलेला आहे. आखूड पाय, लांबट पाय, कृश व हडकुळे पाय, चौकोनी पाय असे विविध प्रकारचे पाय असतात व त्यांच्या आकाराप्रमाणे त्यांची फळे असतात, असे श्री. रेळे यांनी सांगितले आहे.

### तळपायावरील उंचवटे

हस्तसामुद्रिकात तळहातावरील उंचवट्यांचे महत्त्व विशेष असते. त्याचप्रमाणे तळपायावरील उंचवटे असतात त्यांचे महत्त्व भविष्याच्या दृष्टीने किती असते ते पृष्ठ ४८ वर सांगताना श्री. रेळे म्हणतात, ''हस्तसामुद्रिक शास्त्रात हातावरील उंचवट्यांना फार महत्त्व असते, कारण हातावरील रेषा कोणत्या ना कोणत्या उंचवट्याच्या अनुषंगाने निघतात. तशा त्या तळपायावर निघताना दिसत नाहीत. त्यामुळे तळपायावरील सामुद्रिकामध्ये उंचवट्यांना महत्त्व नाही.''

''तळपायावरील सामुद्रिकामध्ये उंचवट्यांना महत्त्व नाही,'' असे पुन्हा एकदा पृष्ठ ४९ वरही आपले मत श्री. रेळे ह्यांनी दिले आहे.

ह्यानंतर पृ. ४९ ते ५९ ह्या पानांवर संस्कृत ग्रंथांतील श्लोक व त्यांचे अर्थ दिले आहेत. त्यासंबंधी रेळे म्हणतात की ही माहिती ''आपल्या भारतीय पूर्वाचार्यांनी पूर्वी लिहून ठेवलेली आहे.'' (पृ. ४९)

स्त्रीचे तळवे कसे असावेत ह्याचे वर्णन करणारे व त्यांची फळे सांगणारे तीन संस्कृत श्लोक पृ. ४९ व ५० वर दिले आहेत. त्या श्लोकांवरून स्त्रीच्या तळव्याचा किती सूक्ष्म अभ्यास शास्त्रज्ञांनी केलेला होता, ह्याची कल्पना येते.

दुःखी माणसाची लक्षणे व पुरुषाचे तळवे ह्यांबद्दल दोन संस्कृत श्लोक व त्याची भाषान्तरे पृ. ५० वर दिसतात. त्यावरून असे दिसते की स्त्रीप्रमाणेच पुरुषाच्या तळव्यांचाही अभ्यास पूर्वाचार्यांनी केलेला होता.

स्त्रीच्या खोटा, टाच ह्याही महत्त्वाच्या असतात. त्यांचा विचार पृष्ठ ५१-५२ वर केलेला आढळेल. पायाची खोट व टाच ह्यांना भविष्याच्या बाबतीत इतके महत्त्व असेल, असे आपल्याला क्वचितच वाटते.

पायाचा अंगठा हाही फार महत्त्वाचा असतो. तो काही वेळा फार मोठा असतो, काही वेळा बारीक असतो, काही वेळा गुबगुबीत व मांसल असतो, तर काही ठिकाणी सरळ अथवा वाकडाही असतो. पायाची बोटे हाताच्या बोटांप्रमाणे केव्हा लांबलचक अशी

असतात तर केव्हा आखूड असतात. ह्या सर्व अंगठ्याच्या प्रकारांचे निरनिराळे परिणाम भविष्यावर होत असतात. त्यांचे सविस्तर वर्णन पृष्ठ ५२ व ५३ वर केलेले दिसेल.

### इतर बोटांची लक्षणे

अंगठा जसा निरनिराळ्या आकाराचा व जाडीचा असतो तसेच इतर बोटांचेही आहे. काही माणसांची सर्व बोटे सारख्याच लांबीची असतात तर काही लोकांच्या पायाचा अंगठा लांब असतो व इतर बोटे क्रमाक्रमाने लहान होत गेलेली असतात. अशाप्रकारच्या दोन्ही पावलांचा विचार केल्यावर त्यांच्या लक्षणांप्रमाणे निरनिराळी फळे असतात व ती पृष्ठ ५४ व ५५ वर दिलेली आहेत.

### अकरा बोटांची पावले

आपण हे पाहतो की काही लोकांच्या हाताला एखादे जादा बोट असते. ते कोठे असेल ते सांगता येत नाही. कोणाच्या एकाच हाताला सहा बोटे असतात तर कोणाच्या दोनही हातांना सहा सहा बोटे असतात. जी तऱ्हा हातांची तीच तऱ्हा पायांची. म्हणून काही माणसांना अकरा बोटे असतात तर काही माणसांच्या दोन्ही पायांची मिळून बारा बोटेही असतात. अर्थात ह्या सर्वांची फळे निरनिराळी असतात. ह्यांचा विचारही संस्कृत ग्रंथकारांनी केलेला आहे. ह्यासंबंधींचे श्लोक ५६ वर दिले आहेत. स्त्रीच्या पायांच्या बोटांचा आणखी विचार तसेच पायावर असलेल्या तिळांचा विचार संस्कृत श्लोकांच्या आधारे पृ. ५७ ते ५९ वर दिलेला आहे.


वधूपरीक्षेच्या बाबतीतही तळव्याचा विचार करणे व बोटांचा व अंगठ्याचा विचार करणे कसे आवश्यक आहे, हे रेळे ह्यांनी पृष्ठ ५९ ते ६३ वर सांगून शेवटी पादतलाचा ठसा कसा घ्यावा, ह्याचे सविस्तर वर्णन करून हा एका वेगळ्या विषयावरचा ग्रंथ संपविला आहे.

ज्योतिर्भास्कर श्री. जयंत साळगांवकर ह्यांनी आपल्या प्रस्तावनेत (उत्साही पाऊल) ह्या पुस्तकाविषयी असे लिहिले आहे, ''मराठीत हस्तसामुद्रिकाच्या पुस्तकातच पायावरच्या रेषांबद्दल क्वचित एखादे प्रकरण आढळते. श्री. रेळे ह्यांनी 'पाऊलरेषा विद्या' हे पुस्तक लिहून केवळ तळपायावरील रेषांमधून भविष्य, स्वभाव, व्यवसाय, अर्थलाभ इत्यादी गोष्टी कितपत आणि कशा काय उपलब्ध होऊ शकतील, याबद्दलचे दिग्दर्शन केले आहे. श्री. रेळे यांनी 'पाऊलरेषा विद्या' या पुस्तकाच्या रूपाने एका न रुळलेल्या नव्या वाटेवर आपले पहिले पाऊल टाकले आहे. हा त्यांचा प्रयत्न स्वागतार्ह आणि अभिनंदनीय आहे.''

ज्योतिर्भास्कर श्री. जयंत साळगांवकर ह्यांनी म्हटल्याप्रमाणे एका नवीन विषयाला हात घालून पुस्तक लिहिल्याबद्दल लेखक व ते प्रकाशित केल्याबद्दल मॅजेस्टिक प्रकाशन अभिनंदनास पात्र आहेत. म्हणून ह्या दोघांचे मन:पूर्वक अभिनंदन.

(पाऊलरेषा विद्या – लेखक श्री. अश्विन इंद्रसेन रेळे, प्रकाशक – मॅजेस्टिक प्रकाशन, पृष्ठे – ६४, मूल्य – २५ रु.)

# श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



'श्री साइलीला'च्या वाचकांना स्मरतच असेल की **संमेलन** विशेषांकात 'जे न बोलायचे....' या सदरात 'बाबांची शिकवण' या शीर्षकांतर्गत प्रसिद्ध झालेल्या लेखात म्हटले होते की.... आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. पण शिवाजी पार्कवर ज्या पादुकांचे आगमन होणार आहे त्या पादुकांच्या प्रतिमा नसून साक्षात् श्री साईबाबांनी वापरलेली ती प्रत्यक्ष पवित्र पादत्राणं आहेत....

आता श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

# "तुझे आहे तुजपाशी...."

— साईशा

नाहं मनुष्यो नच देवयक्षो।
न ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रः।
न ब्रह्मचारी न गृही वनस्थो।
भिक्षु र्न चाहं निजबोधरूपः॥

वरील श्लोकाचा अर्थ असा की मी मनुष्य नाही, मी देव नाही, मी यक्ष नाही, मी ब्राह्मण नाही, मी क्षत्रिय नाही, मी वैश्य नाही, मी शूद्र नाही, मी ब्रह्मचारी नाही, मी गृहस्थाश्रमी नाही, मी वानप्रस्थाश्रमी नाही, मी संन्यासी नाही, तर "मी आत्मज्ञानमूर्ती" आहे, असे जिचे वर्णन केले जाते, ती साक्षात् परमात्ममूर्ती श्री साईबाबांच्या रूपात गेल्या शतकाच्या उत्तरार्धात या पृथ्वीतलावर 'शिरडी' या पुण्यग्रामी सगुणरूपात अवतरली.

ईश्वर दोन रूपात प्रतीत होतो. निर्गुण आणि सगुण दोन्हीही एकच आहेत, भिन्न नाहीत. ईश्वराचे निर्गुण रूप म्हणजे निराकार रूप. त्याला आकार नसतो. किंबहुना तो आपल्या कल्पनेचा विलास असतो. म्हणजे त्याचे रूप हे आपण केवळ कल्पनेनेच जाणून घेऊ शकतो. पण ईश्वराच्या सगुण रूपाचे तसे नाही. सगुण रूपातला हा ईश्वर देहधारी असतो. ज्याला आपल्याला डोळे भरून पाहता येईल, ज्याची आपण पूजाअर्चा करू शकू, ज्याच्या प्रत्यक्ष सहवासात आपण परमानंदाचा लाभ घेऊ शकू, ज्याच्या प्रेमरसरंगात आपण बुडून जाऊ शकू आणि ज्याला या संसारतापापासून सुटका मिळविण्यासाठी आळवू शकू, अशी एखादी देहाकृती मग मानवतार घेऊन अवतीर्ण होते. निर्गुण रूपामध्ये ईश्वराचे नाव, जात, वर्ण, धर्म, योनी, आश्रम इत्यादींचा विचार करण्याचे काही कारणच नसते. कारण तो मुळातच निराकार असतो. पण हाच ईश्वर "एकदा सगुण रूपात या पृथ्वीतलावर अवतरल्यावर त्याला लौकिक नाव, लौकिक जात, लौकिक वर्ण, लौकिक आश्रम धारण करणे प्राप्त होते. सगुणाची भक्ती करता करताच अभ्यासाने निर्गुण ध्यास वाढू लागतो. श्री सच्चिदानंद सद्‌गुरू साईनाथ महाराज हे याच कोटीतले सगुण रूपातले परमात्मा होत. निर्गुणध्यास वाढण्याकरिता काही अधिकारी व्यक्तींना (उदाहरणार्थ: काकासाहेब दीक्षित, सिद्दीक फाळके, बाळाराम मानकर इत्यादी) बाबांनी काही काही काळ आपल्यापासून वंचित ठेवले होते. ज्या वेळी ते बाबांच्या प्रत्यक्ष सहवासात नसत (काकासाहेब दीक्षितांना नऊ महिने त्यांच्या वाड्यात माडीवर बसवून त्यांच्याकडून अनेक पारमार्थिक ग्रंथांचे वाचन करून घेतले. सिद्दीक फाळकेंनाही उत्तराभिमुख असलेल्या चावडीत सतत नऊ महिने ठेवून घेतले. बाळाराम मानकरांनाही काही काळ मच्छिंद्रगडावर ठेवून घेतले. म्हणजेच पर्यायाने ह्या सर्व अधिकारी भक्तवर्गास एक तऱ्हेची संन्यासाची दीक्षाच बाबांनी दिली.) त्या वेळी त्यांना जळी-स्थळी, काष्ठी-पाषाणी आपली, म्हणजेच त्यांच्या सद्‌गुरूंची मूर्ती डोळ्यासमोर यावी आणि जेणेकरून त्यांनी सगुण आणि पर्यायाने निर्गुणाचे ध्यान करावे म्हणून बाबा ही लीला घडवून आणीत. म्हणजे त्या वेळेला बाबा सगुण आणि निर्गुण दोन्ही रूपात त्या भक्तांसमोर वावरत असत. असे हे परमात्म्याचे सगुणावतार श्री साईनाथ महाराज हे आत्मबोधाची खाण होते. ते आनंदविग्रह पूर्ण होते. ते विश्वव्यापक होते. ते संतचूडामणी होते. ते प्रत्यक्ष यज्ञमूर्ती, ज्ञानमूर्ती, परमात्मरूप कैवल्यमूर्ती होते. ते जीवन्मुक्त होते. भिक्षा मागण्याकरिता हातात फुटक्या खापराचा तुकडा, वस्तीकरिता झाडाच्या मुळाचा आश्रय, शरीर झाकण्याकरिता अत्यंत जीर्ण वस्त्र, कोणाच्याही सहाय्याची अपेक्षा न ठेवणे व सर्वत्र समदृष्टी ही जीवन्मुक्ताची लक्षणे होत.

अवतार म्हणजे काय? तर एखाद्या विशिष्ट प्रतिकूल परिस्थितीत सगुणरूपात अवतरलेला परमात्मा. ज्याप्रमाणे आयुष्यातल्या साध्या-साध्या व्यावहारिक गोष्टींचे शिक्षण देण्याकरितादेखील गुरूची आवश्यकता असते त्याप्रमाणे ईश्वराच्या ओळखीसाठी, त्याच्या जवळ जाण्यासाठीही आपल्याला 'सगुण परमेश्वरावताराची' गरज असते. ह्याच अवतारांना आपण संत किंवा सद्‌गुरू म्हणतो. हे सद्‌गुरू अव्यक्ताशी तादात्म्य पावलेले असतात व त्या अव्यक्तातूनच प्रकाशमय देहाने बाहेर येतात. ते मानवाला स्वानुभवाचा मार्ग दाखवण्यासाठीच केवळ जन्म घेतात. ते आपल्या स्वतःच्या कृतीने आणि सदुपदेशाने या जगात आनंदी कसे रहावे, सुखदुःखाच्या अतीत कसे रहावे व अखंड शांतीचा लाभ कसा करून घ्यावा, हे शिकवितात. ते आपल्यासारख्या अल्पजीवी बुद्धीच्या मानवाला आपली जागा दाखवून देतात. ते सांगतात, **"बाबा रे! तुझे आहे तुजपाशी, परि तू जागा चुकलासी."** सद्‌गुरू हे महासिद्धीने प्राप्त असतात. अष्टसिद्धी व नवविधि हात जोडून त्यांच्यासमोर उभ्या असतात. ते जगापासून काहीही घेत नाहीत व जगाला आपले स्वतःचे असे काही देऊही शकत नाहीत, पण त्यांच्या सत्संगाने, भक्तीच्या मार्गाने, अल्पप्रयासाने 'फळ' आपल्या हाती येते. ते देहधारी असले तरी अंतरी निर्गुण, निर्विकारी, निःसंग व निर्मुक्त असतात. त्यांच्या अंगी लीनता, निरभिमानता, कमालीची क्षमाशीलता, नैसर्गिक विलक्षण अक्षोभ्यता, ऋजुता, मृदुता, सोशिकता तसेच संतुष्टता हे सर्व गुण आढळतात. ते आपले ईश्वरदत्त जीवितकार्य करतात व तसे करताना स्वानंदसुखात तल्लीन असतात. ते ईश्वराप्रमाणेच शुद्ध-बुद्ध-मुक्त स्वरूपाचे असतात. सामान्य जीवांप्रमाणे ते ईश्वराच्या बंधनात कधीही बांधले जात नाहीत. कारण ते जन्मापासून सदैव आत्माराम, म्हणजेच आत्मानंदी लीन असल्यामुळे ऐहिक सुखाच्या लाभासाठी मानवाप्रमाणे स्वार्थी धडपड करण्याची इच्छा त्यांना कधीही होत नाही. लौकिक अर्थाने देह धारण केला असला तरी सर्व

प्रयत्न मात्र लोकहिताकरताच ते करीत असतात. त्यांचे शरीर आणि मन हे दोन्ही साधकत्वालाच पोहोचलेले असल्यामुळे त्यांच्या ठायीची 'स्मृती' कधीही लोप पावत नाही, इतकेच नव्हे तर प्रयत्न न करताही ती त्यांच्या ठायी उदय पावत असते. हे अवतार या ब्रह्मांडाचे उत्पत्ती-स्थिती-लयकर्ता आहेत. मनुष्यरूपात अवतरल्यामुळे त्यांची सर्व कृत्ये मनुष्यासारखीच होतात (यामुळे त्यांच्या पंचमहाभौतिक देहाला काही मर्यादाही पडतात.). तरीही ते आत्मरूपी तल्लीन व सदा चिन्मयरूप असल्याने त्याचे अनंतत्व सदैव प्रतीत होत रहाते. त्यांचे विलक्षण चमत्कार, त्यांचे विलक्षण शक्तीयुक्त दिव्यभावच ह्या अवतारांचे खरे स्वरूप होय! मानवाला प्रपंचातून तारून नेऊन, त्याच्या मोक्षमार्गातील अडथळे दूर करून आणि त्याची तयारी कोठपर्यंत आहे, हे पाहूनच ते मोक्षाचा मार्ग दाखवितात. पंचमहाभूतेही त्यांच्या आधीन असतात. अवतारकार्य संपले की ते आपला 'अवतार' संपवितात. दुसऱ्यांच्या तापानेही त्यांचे हृदय वितळते. ते भावाचे भुकेले असतात व आपल्या भक्तांचे सदैव अंकित असतात. थोडक्यात, श्रीकृष्ण परमात्मा, तो ही म्हणतो, "**संत म्हणजेच माझा आत्मा। संत ही माझी सजीव प्रतिमा। संत-सप्रेमा तोच मीच॥ संतांना जो अनन्यशरण जातो त्याच्या चरणांचे मी वंदन करतो**" –भगवद्गीता. थोडक्यात, इतर सारे देव मायिक, गुरूच एक 'शाश्वत' असतो.

याच कोटीतले सगुणावतार परब्रह्ममूर्ती श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज कसे होते ते आता पाहू.

ते प्रत्यक्ष परमात्मा असल्यामुळे एकनाथी भागवताच्या तिसऱ्या अध्यायात सांगितलेली 'सद्गुरूंची' सर्व लक्षणे श्री संतचूडामणी साईबाबांना तंतोतंत लागू पडत.

ते कधीही अणुमात्र गुरूत्वाचा अहंभाव धरीत नसत. म्हणजेच "मी ईश्वर", "मी गुरू" असे ते कधीच म्हणत नसत. तर "**मैं अल्ला का बंदा हूँ!**" असेच त्यांचे म्हणणे असे. शिष्यांकडून ते कोणतीही सेवा आपणहून घेत नसत. उलट त्यांच्यावरील भक्तिप्रेमाने शिष्यच (म्हणजेच त्यांचे भक्त. बाबांनी शिष्य कधीच केला नाही. होते ते सर्व त्यांचे भक्तच होते.) त्यांच्या सेवेस सदैव तत्पर असत. आपण स्वत: भिक्षा मागून आणत व गोरगरीबांना वाटत. बाबा शिष्यांना भगवद्स्वरूप मानीत आणि त्यांची सेवासुद्धा करीत असत. ते दक्षिणा मागून घेत, पण त्याचा संग्रह त्यांनी कधीच केला नाही. दरदिवशी जमा झालेली दक्षिणा इतरांना स्वत:कडे एक कपर्दिकही न ठेवता वाटून टाकीत. त्यांचा देह मानवाच्या कल्याणाकरिता अवतरला होता, त्यामुळे स्वत:च्या देहाचे चोचले पुरवायचे त्यांना कारणच नव्हते. त्यांना जशी देहाची अहंकृती नव्हती तशीच गृहासक्तीही नव्हती. त्यांच्याठिकाणी विषयांचा भोगही आढळत नसे, तसेच नि:शेष त्यागाचा आग्रहही त्यांनी कधी धरला नाही. त्यांच्याठायी कोणाच्याही प्रेमाची आसक्ती आढळून येत नसे. माया, मोह, अहंकार इत्यादी षड्रिपु त्यांच्या चरणी लीन झाले होते. आपल्या भक्तांवरील प्रेमाखातर त्यांचे संकट स्वत:वर ओढवून घेऊन त्याचे ते निवारण करीत असत. गरीब-श्रीमंत, पापी-पुण्यवान, हिंदू-मुसलमान, त्यांना चाहणारा-न चाहणारा, तसेच ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा भेदभाव त्यांच्याठिकाणी कधीच नव्हता. सद्गुरूंचा अनुग्रह पापी माणसांवरही होतो, म्हणून पापी माणसेही त्यांच्याठिकाणी जाऊन, पूर्णपणे लीन होऊन, पश्चातापाने त्यांना शरण जाऊन अंतर्यामी शुद्ध झाल्याची उदाहरणेही आपल्याला श्री साईसत्चरित्रात पहायला मिळतात. त्यांचे वर्तन अचंबित असे होते. जीवन्मुक्ताचे प्रत्येक लक्षण त्यांना लागू पडत होते. ते सदा स्वानंदात रममाण असत. वरवर पाहणाऱ्याला त्यांची कृती विसंगत वाटे किंवा "**मी लई हुषार, पण रहाणं असं वेड्यावाणी**", "**तो तेल्यावाणी मला लई शिव्या देतो, बरे पहात नाही**", अशी वरवर विसंगत भाषा ते वापरीत. त्यामुळेच अशा या परमात्म्याला ओळखण्यास, त्याचे खरे स्वरूप जाणण्यास बराच काळ जावा लागला. कधी कधी ते अत्यंत उग्रता दाखवीत व अत्यंत कोपायमान होत. त्यांचे एरवी भक्तांवरील प्रेमाने ओथंबलेले भावपूर्ण डोळे जणूकाही अग्नीचे तेज:पुंज गोळेच भासत. त्या वेळेला ते इतके दुर्धर व भयानक दिसत की त्या क्षणी त्यांचा कितीही मोठा भक्त असला तरी जवळ जाण्यास धजत नसे आणि उसना धीर आणून बाबांना शांत करण्याची जबाबदारी कोणातरी भक्ताला घ्यावी लागत असे. ते संपूर्ण अंतर्ज्ञानी होते. ते आत्मबोधाची खाण होते. किंबहुना ते ब्रह्मांडाचे उत्पत्ती-स्थिती-लयकर्ता असल्याने जगात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीचे सूत्रधार तेच होते. त्यांना ज्ञात-अज्ञात असे काहीच नव्हते. त्यांचे बोलणे गूढ व चमत्कारिक असे. परमार्थाविषयीही ते स्पष्टपणाने सहसा कधीच बोलत नसत. त्यामुळे त्यांच्या बाह्यस्थितीची कल्पना येत नसे. त्यांच्याजवळ लोकांना उद्धारण्याचे हजारो मार्ग असत व त्याचे अनुभव लोकांना येत. अनुभवांमुळेच लोकांना त्यांचे देवत्व मान्य होत गेले. परकाया-प्रवेशात त्यांचा हातखंडा होता, म्हणजेच दुसऱ्याच्या देहात संचार करण्याचे सामर्थ्य त्यांना अवगत होते. ते स्वत:कडे कधीच मोठेपणा घेत नसत. उलट "**अल्ला मालिक है, सद्गुरूलाच सर्व करावे लागते, त्याच्यावाचून काही सोय नाही, माझ्या गुरूंनी मला मागेच वर काढून नेले आहे, मला आता ही वतनदारी मिळाली आहे, एक हजार वर्षाकरिता ही वतनदारी मला मिळाली आहे, मी माझ्या भक्तांना सातासमुद्रापलीकडे नेईन** (म्हणजे परमार्थ असा इथे अर्थ लागतो.), तसेच **मी माझ्या भक्तांना सातासमुद्रापलीकडून खेचून आणीन**", असे ते म्हणत. परमार्थाचा आणि पर्यायाने मोक्षाचा मार्ग दाखवणे, हे सद्गुरूंचे काम खरे, पण भौतिक किंवा आध्यात्मिकबाबतीत अभ्यासाने अंतिम शिखर गाठण्याची जबाबदारी ही भक्तावरच असते. असे जरी असले तरी बाबांनी म्हटल्याप्रमाणे "**बरोबर जर वाटाड्या असेल तर त्या मार्गात वाघ रईस जरी आडवे आले तरी तो मार्ग सुखकरच होतो.**" बाबांनी आपल्या भक्तांना परमार्थाचा मार्ग दाखविताना, त्यावरून नेताना वाटाड्याचेच काम केले. खरोखर त्यांची लीला अघटीत होती, कर्म अगाध होते. अशा या नटनाटकी साईमाऊलीचा एकूणएक शब्द व एकूणएक लीला केवळ भक्तांच्या उद्धारासाठीच होत्या व त्यांचे

(पृष्ठ क्र. ६१ वर)

# हजारो साईभक्तांच्या उपस्थितीत श्री रामनवमी उत्सव उत्साहात साजरा!

**सा**लाबादप्रमाणे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या वतीने शिरडी येथे श्री रामनवमी उत्सव बुधवार, दिनांक ३१-३-१९९३ ते शुक्रवार, दिनांक २-४-१९९३ या कालावधीत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. भक्तांची संभाव्य अमाप गर्दी लक्षात घेऊन श्री साईबाबा संस्थानतर्फे भक्तांची दर्शनाची चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती. प्रथमोपचार मदत केंद्राची व्यवस्था उत्सव काळात रात्रंदिवस ठेवण्यात आली होती. संस्थानचा सर्व परिसर, तसेच श्रींचे मुख्य मंदिर (समाधी-मंदिर), तसेच संस्थानच्या सर्व इमारतींवर मुंबई येथील साईभक्तांकडून भगवद्गीतेतील प्रसंग व मंदिर-परिसरात कारंजाजवळ गणेश मूर्ती व गणपती वाहन मूषक यांच्याकडून संगीत वाद्यांत प्रत्यक्ष गणेशाची आरती व आराधनेचा प्रसंग उत्कृष्ट दाखविण्यात आला होता. त्याचप्रमाणे झाडावर व इतर ठिकाणी भव्य विद्युत रोषणाई करण्यात आली होती. द्वारकामाई, तिचे प्रवेशद्वार व नगर-मनमाड रोडवर लाईट डेकोरेशन केले असल्याने रोषणाईने चमकत होते. उन्हापासून भक्तांना त्रास होऊ नये याकरिता सर्व संस्थान परिसरात भव्य मंडप उभारण्यात आले होते.

### प्रथम दिवस

पहाटे ५-०० वाजता समाधी-मंदिर उघडले. ५-१५ वाजता श्रींची काकड आरती सुरू झाली. काकड आरती संपल्यानंतर ५-४५ वाजता वीणा, पोथी, फोटो यांची मिरवणूक निघाली. त्यात मा. वि. श्री. मोतीराम पवार यांनी वीणा, मा. वि. श्री. एस्. एम्. धोर्डे यांनी पोथी व मा. वि. श्री. भीमाशंकर खांबेकर व मा. वि. श्री. बाबूराव नरोडे यांनी श्री साईबाबांचा फोटो हातात घेतला होता.

नेहमीप्रमाणे मिरवणूक समाधी-मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत पोहचली. सकाळी ६-१५ वाजता श्री साईसत्चरित्राचे पारायण व अध्याय-वाचन सुरू झाले. एकूण ४८ भाग्यवान भक्तांची आदल्या दिवशी, म्हणजे दि. ३०-४-९३ रोजी सायंकाळी ८-०० वाजता चिठ्ठ्या टाकून ड्रॉ-पद्धतीने विश्वस्तांच्या हस्ते अ. नं. ६ ते ५३ अध्यायांचे नंबर काढून निवड करण्यात आली. १ ते ५ अध्याय मा. विश्वस्त श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्याकरिता राखीव ठेवण्यात आले होते. पैकी पहिला अध्याय मा. वि. श्री. एस्. एम्. धोर्डे यांनी, दुसरा अध्याय मा. वि. श्री. बाबूराव अ. नरोडे यांनी, तिसरा अध्याय मा. वि. श्री. भीमाशंकर खांबेकर यांनी, चौथा अध्याय मा. वि. श्री. श्रीपतराव जाधव यांनी व पाचवा अध्याय मा. वि. श्री. एस्. आर. शिंदे यांनी असे सुरुवातीचे पाच अध्याय वाचले. नंतर ६ ते ५३ अध्यायांचे निवडलेल्या भक्तांनी वाचन सुरू केले. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान सनई व मंत्रोच्चारात मंगलमय वातावरणात संपन्न झाले. दुपारी १२-३० वाजता माध्यान्ह आरती सुरू झाली व तीर्थ-प्रसाद वाटण्यात आला.

दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत नेहमीप्रमाणे नित्याचे अध्याय-वाचन पुजारी यांच्यामार्फत झाले.

सायंकाळी ४ ते ६ वाजेपर्यंत ह.भ.प. श्री मनुमहाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे सुश्राव्य कीर्तन झाले.

सायंकाळी नेहमीप्रमाणे ६-३० वाजता धुपारती सुरू झाली व धुपारती संपल्यानंतर नियोजित निमंत्रित कलाकार श्रीमती संध्या राव व त्यांचे कलाकार, मुंबई यांचा साईभजनांचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला हजारो साईभक्त उपस्थित होते. सदरचा कार्यक्रम ७-३० ते ९-०० वाजेपर्यंत व नंतर रात्रौ ९-३० ते ११-०० वाजेपर्यंत शांती निवासजवळील स्टेजवर चालू होता.

त्याचवेळी रात्रौ ९-१५ वाजता पालखी मिरवणूक गावातून मंगल वाद्यांच्या गजरात मिरवण्यात आली. त्यावेळी संस्थानच्या मा. अध्यक्षा व मा. विश्वस्त उपस्थित होते. श्रींच्या पादुका व फोटो यांची मिरवणूक निघाली व द्वारकामाई मंदिरात भजन करून पालखी मिरवणूक द्वारकामाईतून, गावातून परत आल्यावर शेजारती होऊन समाधी-मंदिर बंद झाले.

द्वारकामाई मंदिरात श्री साईसत्चरित्राचे अखंड पारायण चालू असल्याने द्वारकामाई मंदिर २४ तास उघडे होते.

(पत्रिकेप्रमाणे दि. ३१-३-९३ चा कार्यक्रम झाला.)

### मुख्य दिवस

नेहमीप्रमाणे सकाळी ५-०० वाजता समाधी-मंदिर उघडले. सकाळी ५-१५ वाजता श्रींची काकड आरती सुरू झाली. मुख्य दिवस व त्या दिवसाचा वार गुरूवार असल्याने पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाकरिता भक्तांची रांग लागली होती. नेहमीच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ५-४० वाजता आरती संपल्यानंतर ५-४५ वाजता श्रींच्या श्री साईसत्चरित्र ग्रंथवाचनाची समाप्ती करून फोटो, पोथी व वीणा यांची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थानमार्गे समाधी-मंदिरात आली. नंतर कावडीने कोपरगांव येथून गोदावरी (गंगेचे) नदीचे पाणी आणणाऱ्या अंदाजे १६०० भक्तांना समाधी-मंदिराच्या शोरूमच्या बाजूच्या दरवाजाने रांगेमध्ये शांतपणे मिरवणुकीने आत सोडण्यात आले.

सकाळी ६-१५ वाजता कावडीच्या पाण्याने बाबांच्या मंगलस्नानास सुरवात झाली. कावडीधारकांनी गंगेच्या पाण्याने श्रींच्या समाधीस मंगलस्नान घातले. कावडी

व साईभक्त यांची जास्त गर्दी असल्याने समाधीच्या पादुकांच्या बाजूने कावडीवाले व समाधीच्या दक्षिण बाजूने उपस्थित साईभक्तांना श्रींच्या मंगलस्नानाचा लाभ करून देण्यात आला. प्रत्येक कावडीधारक मोठ्या व्यक्तीला एक श्रीफळ व लहान मुलाला पेरू असा प्रसाद संस्थानतर्फे देण्यात आला.

सकाळी ११-०० वाजता समाधी-मंदिरासमोर सभामंडपात ह.भ.प. श्री. मनुमहाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे रामजन्मावर सुश्राव्य कीर्तन झाले. त्यावेळी हजारोंच्या संख्येने साईभक्त उपस्थित होते. दुपारी १२-३० वाजता माध्यान्ह आरती सुरू झाली व नंतर तीर्थ-प्रसाद वाटण्यात आला.

नेहमीप्रमाणे ३-०० ते ४-०० वाजेपर्यंत नित्याचे अध्याय-वाचन झाले. ४-०० वाजता निशाणांची मिरवणूक पार पडली. ४-४५ वाजता द्वारकामाईतून श्रींच्या पादुका व सटका यांची रथातून मिरवणूक सनई चौघडा व बँडपथक यांच्या गजरात गावातून निघाली. नंतर वाजतगाजत मिरवणूक गुरुस्थान मंदिरासमोर आली. मुख्य दिवस व त्या दिवशीचा वार गुरुवारचा असल्याने रथ-मिरवणुकीला भक्तांची खूप गर्दी झाली होती. त्यामुळे मिरवणुकीला जास्त वेळ लागला. नंतर गुरुस्थान मंदिराच्या समोर मिरवणूक थांबली. त्यासमोर भारूड कार्यक्रम झाला. भारूड कार्यक्रमामध्ये मा. वि. श्री. नरोडे बाबा, श्री. रघुनाथ सांडभोर, कलाकार, पुणे यांनी भाग घेतला होता. नंतर भारूड कार्यक्रम होऊन रथ-मिरवणूक मंदिरात आली. श्रींचा फोटो समाधीजवळ ठेवल्यानंतर श्रींची धुपारती सुरू झाली.

धुपारती संपल्यानंतर नेहमीप्रमाणे गुरूवारचा दिवस असल्याने नियमित दर गुरूवारी होणाऱ्या पालखी कार्यक्रमासाठी पुन्हा श्रींच्या पादुका समाधीवर दर्शनासाठी ठेवण्यात आल्या. नंतर ९-१५ वाजता पुन्हा श्रींच्या पादुका समाधी-मंदिरातून मिरवणुकीने द्वारकामाई मंदिरात व द्वारकामाई मंदिरातून पालखीमध्ये श्रींच्या पादुका, फोटो व सटका यांची मिरवणूक चावडीमध्ये नेहमीप्रमाणे आली व नंतर परत चावडीमधून पालखी नेहमीप्रमाणे समाधी-मंदिरात परत आली. नंतर श्रींचा फोटो समाधी-चौथऱ्यावर ठेवण्यात आला. मुख्य दिवस असल्याने रात्रौ १२-०० ते दिनांक २-४-९३ रोजी सकाळी ६-०० वाजेपर्यंत कलाकार कार्यक्रम (हजेऱ्या) झाला. मुख्य दिवस असल्याने समाधी-मंदिर रात्रभर भक्तांना दर्शनासाठी उघडे होते.

तसेच, दिनांक १-४-९३ रोजी रात्रौ १०-०० ते १२ वाजेपर्यंत रामकृष्ण केणी दिग्दर्शित ''साईलीला गाऊ चला'' हा कार्यक्रम साजरा झाला. सदर कार्यक्रम हजारो साईभक्तांच्या उपस्थितीत शांततेने पार पडला.

### सांगता दिन

शुक्रवार, दिनांक २-४-९३ रोजी नित्याच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त ह.भ.प. श्री. मनुमहाराज कोकलेगावकर, नांदेड यांचे सकाळी १०-३० ते १२-३० वाजेपर्यंत गोपालकाला कीर्तन झाले. नंतर दही-हंडी कार्यक्रम होऊन माध्यान्ह आरती झाली व तीर्थ-प्रसाद वाटण्यात आला.

रात्रौ ७-३० ते ९-४५ व ११-०० नंतर शांती निवासजवळील स्टेजवर शिरडी गावातील स्थानिक कला संपदा थियेटर्स यांचा ''सूनबाई मागे फिरा'' हा तीन अंकी नाटकाचा प्रयोग साजरा झाला.

रात्रौ १०-०० वाजता शेजारती झाली व मंदिर बंद झाले.

अशाप्रकारे श्री रामनवमी उत्सव १९९३ हा दिनांक ३१-३-९३ ते २-४-९३ अखेर तीन दिवस हजारो साईभक्तांच्या समक्ष उत्साहाने पार पडला, असे शिरडीचे प्रभारी मंदिरप्रमुख शिरडीहून कळवितात.

---

(पृष्ठ क्र. ५९ वरून)

एकही पाऊल व्यर्थ पडत नव्हते. त्यांचे प्रत्येक कृत्य हे व्यावहारिक व पारमार्थिक शिकवणुकीचे असून त्यापासून अज्ञानी भक्तजनांना आपल्या या दुस्तर, कष्टप्रद व चिंतामय संसारात माधुर्य व सुगमता प्राप्त होत असे. साईमहाराजांचे परमभक्त काकासाहेब दीक्षित आपल्या एका लेखात बाबांविषयी म्हणतात.... ''महाराजांचे सार्वभौमत्व एकदा अंगी बाणले म्हणजे भक्तांच्या मनाला एकतऱ्हेचा धीर वाटून, आपले बाबा आपल्याला सांभाळायला सदैव तत्पर आहेत, आपल्याला भिण्याचे कारण नाही, अशी भावना निर्माण होत असे.'' आज बाबांना समाधिस्थ होऊन इतकी वर्षे उलटून गेली तरीही त्यांचे अस्तित्व चराचरात भरून राहिले आहे व त्याचे तीव्र अनुभव आपल्याला येतात आणि आमरणात येत रहातील, यात शंकाच नाही. हेमाडपंत म्हणतात त्याप्रमाणे लौकिक सागर तरून जाताना ज्याप्रमाणे आपण नावाड्यावर विश्वास ठेवतो त्याप्रमाणे 'सद्गुरू'वर ठेवावा. त्यांच्या दर्शनाने विषय-निवृत्ती होते व आनंदलक्षण अशी मोक्षप्राप्ती होते. कारण आपले साईबाबा म्हणजे

**'सगुणातला जो सगुण।**
**निर्गुणातला जो निर्गुण॥**
**गुणवंतातील जो अनुत्तम गुण।**
**असा गुणियांचा गुणिया गुणिराज॥**

संदर्भ : श्री साईसत्‌चरित
श्री साईलीला, वर्ष १७,
अंक १-२-३, 'सद्‌गुरूची लक्षणे',
प्रो. नरके.

श्री रामकृष्णलीलाप्रसंग –
ले. स्वामी सारदा
आत्मप्रभा –
स्वामी सत्यदेवानंद सरस्वती

# मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा ५११ गरजू रूग्णांना लाभ झाला !

श्री साईबाबा संस्थान, शिरडी, लायन्स क्लब, मुंबई, जिल्हा परिषद, अहमदनगर व सिव्हील हॉस्पिटल, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५-२-९३ पासून शिरडी येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिराचा प्रस्ताव लायन्स क्लब, मुंबई यांच्याकडून आल्याबरोबर संस्थानच्या मा. अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक यांनी त्वरित अनुमती दर्शवून तयारी करण्याच्या सूचना दिल्या.

शिबिराच्या व्यवस्थेकामी संस्थानच्या सर्व विभाग प्रमुखांची सभा घेऊन मा. कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. एस्. बुटे यांनी आवश्यक त्या तयारीसाठी सूचना दिल्यावर कामास सुरुवात झाली. मा. विश्वस्त व रूग्णालय समितीचे उपाध्यक्ष श्री. बी. व्ही. खांबेकर यांनी यात जातीने लक्ष घालून शिबिर ज्या इमारतीत घेण्यात येते त्या साईउद्यान इमारतीची ड्रेनेज व्यवस्था, दुरूस्ती याबाबत संबंधितांशी चर्चा करून कामास गती दिली व साईउद्यान इमारतीतील सेपटीक टाक्यांची उंची वाढवून नवीन पाईप लाईन टाकण्यात आली. त्याचप्रमाणे वृद्ध शस्त्रक्रिया झालेले रूग्ण घसरून पडू नयेत म्हणून क्वॉयर मॅटींग घेण्याचे ठरविण्यात आले.

शिबिरात दिनांक ५-२-९३ रोजी १५०० रूग्णांची लायन डॉ. ए. व्ही. शिवलकर, मुंबई यांनी तपासणी केली.

शस्त्रक्रियेचा शुभारंभ श्री साईबाबांच्या प्रतिमा-पूजनाने दिनांक ६-२-९३ रोजी मा. विश्वस्त व रूग्णालय समितीचे उपाध्यक्ष श्री. बी. व्ही. खांबेकर, मा. विश्वस्त सर्वश्री बाबा नरोडे, उत्तमराव शेळके, डॉ. इ. बी. गोंदकर, गो. ब. कोते पाटील, ॲड. एस्. एम्. धोर्डे, के. बी. देवकर, लायन डॉ. ए. व्ही. शिवलकर, मा. कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. एस्. बुटे, मा. प्रशासकीय अधिकारी श्री. जी. एस्. धीवरे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

या शिबिरात खालील नामवंत तज्ञ डॉक्टरांनी ५११ रूग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया केल्या.

(१) डॉ. ए. व्ही. शिवलकर, मुंबई
(२) डॉ. अनिल मनसुखानी, मुंबई
(३) डॉ. के. एल्. राव, मुंबई
(४) डॉ. सौ. के. रॉय चौधरी, मुंबई
(५) डॉ. व्ही. एस्. तळवलकर, मुंबई
(६) डॉ. दीपक सदारंगानी, मुंबई
(७) डॉ. आर. एन्. बिजूर, मुंबई
(८) डॉ. एस्. के. राणे, मुंबई
(९) डॉ. ए. जी. प्रभुदेसाई, मुंबई
(१०) डॉ. आर. जे. अग्रवाल, मुंबई
(११) डॉ. डी. सी. चव्हाण, अहमदनगर
(१२) डॉ. प्रकाश कांकरिया, अहमदनगर
(१३) डॉ. एन्. एफ्. आव्हाड, कोपरगाव

शिबिराच्या प्रारंभ दिनीच दिनांक ६-२-९३ रोजी मा. नामदार श्री. रामरावजी आदिक, अर्थ, नियोजन, पर्यटन, कायदा व विधी मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संस्थानच्या मा. अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक यांच्यासमवेत शिबिरास भेट देऊन व्यवस्थेची पहाणी केली व समाधान व्यक्त केले. तसेच रूग्णांची विचारपूसही केली.

त्याचप्रमाणे मा. नामदार श्रीमती पुष्पाताई हिरे, आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. नामदार श्री. डी. बी. अत्राम, वन-आदिवासी विकास राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी शिबिरास भेट देऊन समाधान व्यक्त केले.

सदर शिबिरात सालाबादप्रमाणे रूग्ण व त्याचा एक नातेवाईक यांची संस्थानतर्फे दोन वेळ मोफत चहा-भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. रूग्णांना खाट, गादी, बेडशीट, चादर अशी निवासाची उत्तम व्यवस्था ठेवण्यात आली होती.

रूग्णांच्या सेवेसाठी लायन डॉ. ए. व्ही. शिवलकर यांच्या नेतृत्वाखाली लायन्स क्लबचे डॉक्टरांचे पथक, मेट्रन श्रीमती भोसले, सिव्हील हॉस्पिटलचे डॉ. चव्हाण, राहाता प्रा. आ. केन्द्राचे डॉ. पी. जी. गुंजाळ, प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या २० ट्रेनी नर्सेस, श्री साईनाथ रूग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. पी. पाटील, उपमुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. एम्. वाय. देशमुख, कॅम्प मेडिकल ऑफिसर डॉ. पी. एस्. देशपांडे, इंटर्न डॉक्टर्स, मेट्रन सौ. कोल्हटकर व स्टाफ, तसेच आय.टी.आय. चे स्वयंसेवक, संस्थानचे निवासस्थान, प्रसादालय, विद्युत-पाणी पुरवठा व बांधकाम विभाग प्रमुख झटत होते.

शिबिर कालावधीत डॉ. बथेरीया, आरोग्य उपसंचालक, नासिक, डॉ. एल्. पी. देगलूरकर, सिव्हील सर्जन, अहमदनगर, डॉ. साठे, सिव्हील सर्जन, नासिक, डॉ. आर. जी. भारती, जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर यांनी भेटी देऊन पहाणी केली व आवश्यक त्या सूचना दिल्या.

शिबिराच्या व्यवस्थेसाठी डॉक्टर्स, परिचारिका, कर्मचारी व स्वयंसेवक मिळून २५० जण सेवाभावनेने कार्यरत होते. स्वयंसेवकांचा कौतुक समारंभ दिनांक १०-२-९३ रोजी संस्थानचे मा. कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. एस्. बुटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. मा. श्री. बी. व्ही. खांबेकर, विश्वस्त व उपाध्यक्ष, रूग्णालय समिती, मा. विश्वस्त सर्वश्री बाबा नरोडे, डॉ. इ. बी. गोंदकर, उत्तमराव

शेळके, के. बी. देवकर, लायन डॉ. ए. व्ही. शिवलकर, प्रशासकीय अधिकारी श्री. जी. एस्. धीवरे यांच्या शुभहस्ते भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

शिबिराचा समारोप समारंभ दिनांक १३-२-९३ रोजी मा. खासदार श्री. शंकररावजी काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. बी. व्ही. खांबेकर, उपाध्यक्ष, रूग्णालय समिती यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्यात शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांचा भेटवस्तू व शाल-श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे मा. खासदार श्री. शंकररावजी काळे यांनी संस्थान करीत असलेल्या कार्याचा गौरव करून अत्याधुनिक इंट्रिक्यूलर लेन्स शस्त्रक्रिया करण्याबद्दल विचार करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात मा. श्री. बी. व्ही. खांबेकर, विश्वस्त व उपाध्यक्ष, रूग्णालय समिती यांनी श्री साईबाबा संस्थान करीत असलेल्या वैद्यकीय सेवेबद्दल सविस्तर माहिती देऊन गोरगरीब रूग्णांनी या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

आभार प्रदर्शन मा. कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. एस्. बुटे यांनी केले. या शिबिरात सहभागी झालेल्या संस्था, त्यांचे पदाधिकारी, स्वयंसेवक यांचे आभार मानून वैद्यकीय सेवेची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल रूग्णांचेही त्यांनी आभार मानले.

सन १९७९ पासून आतापर्यंत श्री साईबाबा संस्थानने घेतलेल्या मोफत शिबिरात ५२४७ गोरगरीब व गरजू रूग्णांवर यशस्वीपणे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

शिबिर यशस्वी होण्यासाठी श्री साईनाथ रूग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. पी. पाटील, कँप मेडिकल ऑफिसर डॉ. पी. एस्. देशपांडे आणि प्रशासकीय अधिकारी श्री. पी. पी. देशपांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या वतीने विविध विकास योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. ह्या योजनांसाठी विशेष स्वरूपाच्या देणग्या स्वीकारण्यात येत आहेत. यासंबंधीची माहिती पुढीलप्रमाणे :

'साईबाबा-भक्त-निवास' या इमारतीचे बांधकाम जोरात चालू असून रु. ५०,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील एका खोलीला देण्यात येईल. रु. २,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील जनरल हॉलला देण्यात येईल. ह्या देणगीदारांना वर्षातून दोनदा आगाऊ एक महिना कळविल्यास तीन दिवस रहाण्यासाठी विनामूल्य जागा देण्यात येईल.

मंदिर-नूतनीकरणासाठी रु. १,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

रूग्णालय-विस्तारीकरणासाठी रु. ५,००,०००/- अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव एका वॉर्डला अगर ऑपरेशन थिएटरला देण्यात येईल. रु. २०,०००/- देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव एका बेडला देण्यात येईल. रु. १०,०००/- अगर त्याहून अधिक देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

## 'श्री साईलीला' सभासदांना निवेदन

'श्री साईलीला'चे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४-बी, खोदादाद सर्कलजवळ, दादर, मुंबई – ४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. मनिऑर्डर, पत्रं मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतच लिहावी. मनिऑर्डरवर 'संदेश के लिए स्थान' आणि 'भेजनेवाले का नाम व पूरा पता' असे जेथे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

मनिऑर्डर किंवा पत्रावर पत्ता लिहिताना वाचता येईल अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

'श्री साईलीला'संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना 'श्री साईलीला'च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या 'श्री साईलीला' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३३.१५ | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | १८.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २४.०० | ११.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | १७.७५ | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २०.७० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २६.५० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ८.२५ | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ११.५० | १०.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ७.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ७.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ७.०० |
| १७. | स्तवनमंजरी | इंग्रजी | २.०० | ७.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.०० | ७.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ७.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०.९५ | ७.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ३.६० | ७.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | १.२५ | ७.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | २.५० | ७.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६.८० | ७.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | १.६० | ७.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ७.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | १.६० | ७.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ७.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | २.३० | ७.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ७.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ७.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४.५० | ७.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ७.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५.२५ | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ९-५० | १०-०० |

# श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिरडी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली काही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखो भाविकांना शिरडीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विद्यमान विश्वस्त मंडळ शिरडीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकविध योजना राबवित आहे.

'साईबाबा-भक्त-निवास' या इमारतीचे बांधकाम हाती घेऊन ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने संस्थानने पहिले पाऊल उचलले आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येतील. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय केली जाईल. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, अशा २ सभागृहांची योजना असून या सोयीमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था येथे होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असेल असे एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत असेल. लवकरच ही इमारत भाविकांना निवासाकरिता उपलब्ध होणार आहे.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन मंदिर-परिसराच्या नूतनीकरणाची योजनाही हाती घेण्यात येत आहे. या नूतनीकरणामुळे श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

विद्यमान विश्वस्त मंडळाने स्वच्छ व मुबलक पाणी, उत्तम वैद्यकीय सेवा, हृदयरोग अतिदक्षता विभाग, सोनोग्राफी, इंग्रजी माध्यमाची शाळा, संस्थानच्या उत्पन्नात वाढ, कामात सूसूत्रीपणा आदी योजनांना दृश्यरूप दिले असून मंदिर-परिसराचा विकास, रुग्णालयाचा विस्तार, 'साईबाबा-भक्त-निवास' आदी योजनाही अल्पावधीतच दृश्यरूप धारण करणार आहेत.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थान वरील नमूद केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल धार्मिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता 'देणगी दिल्याने होणार आहे.

शिरडी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणाला या कार्याकरिता उदारहस्ते मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी
मु. पो.: शिरडी, तालुका: कोपरगांव,
जिल्हा: अहमदनगर.

सूचना: चेक 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावाने पाठवावेत.

---

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी

### विश्वस्त मंडळ

प्रा. डॉ. लेखा पाठक (अध्यक्षा)
श्री. हेमराज शहा
श्री. मनोहर ना. गोगटे
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. शिवराम रा. शिंदे
श्री. राजीव प्र. कुलकर्णी
डॉ. एकनाथ भा. गोंदकर
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. भिमाशंकर व्यं. खांबेकर
श्री. बाबुराव अ. नरोडे (पाटील)
श्री. दादासाहेब श. रोहमारे (पाटील)
श्री. प्रभाकर भि. बोरावके
श्री. उत्तमराव रं. शेळके
श्री. सोपानराव मा. धोर्डे
श्री. कारभारी भि. देवकर
श्री. अनंतकुमार कि. पाटील
श्री. मोतीराम सि. पवार
श्री. प्रशांत व्यं. हिरे
प्रा. नारायण स. फरान्दे (आमदार)
श्री. अण्णासाहेब म्हस्के (आमदार)
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. गोपीनाथ ब. कोते (पाटील)
श्री. श्रीपतराव मा. जाधव
श्री. मोहन मो. जयकर
श्री. विष्णुपद श्री. बुटे
(कार्यकारी अधिकारी)

# सर्व साईभक्तांना आवाहन !

प्रिय साईभक्तांनो !

सप्रेम नमस्कार.

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी अनेकांनी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा.

या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावरही कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे. चेक कृपया 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावावर असावा.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकित,<br>
**– अरूण ताम्हणकर**<br>
कार्यकारी संपादक<br>
**'श्री साईलीला'**

------------------✂------------------ इथे कापा ------------------✂------------------

कार्यकारी संपादक<br>
**'श्री साईलीला',**<br>
८०४-बी, साईनिकेतन,<br>
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),<br>
मुंबई – ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण रु. २५० (एकूण दोनशेपन्नास रुपये मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________________

पत्ता : ______________________________

______________________________

______________________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

गांची आस्थेवाईकपणे चौकशी
ा मंत्री महोदय व त्यांच्या सोबत
य अध्यक्षा व 'श्री साईलीला'च्या
क प्रा. डॉ. लेखा पाठक, माननीय
त डॉ. एकनाथ गोंदकर, माननीय
त श्री. पी. टी. बोरावके, माननीय
त श्री. भीमाशंकर खांबेकर
ोरे), माननीय विश्वस्त श्री. पी. बी.
के दिसत आहेत.



शिबिराचा लाभ घेतलेले रुग्ण.





माननीय अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक यांच्या मार्गदर्शनानुसार मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या आयोजनाची समर्थपणे जबाबदारी सांभाळणारे माननीय विश्वस्त श्री. भीमाशंकर खांबेकर मंत्री महोदयांना माहिती देत असून त्यांच्या सोबत माननीय अध्यक्षा व 'श्री साईलीला'च्या संपादक प्रा. डॉ. लेखा पाठक, माननीय विश्वस्त डॉ. एकनाथ गोंदकर, माननीय विश्वस्त श्री. मोतीराम पवार, 'श्री साईनाथ' रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. पी. पाटील, माननीय विश्वस्त श्री. पी. बी. बोरावके, माननीय विश्वस्त श्री. पी. टी. बोरावके दिसत आहेत.




शिबिराच्या समारोप समारंभप्रसंगी माननीय खासदार श्री. शंकरराव काळे भाषण करीत असून पहिल्या रांगेत डावीकडून माननीय विश्वस्त श्री. एस्. एम्. धोरडे, माननीय विश्वस्त श्री. भीमाशंकर खांबेकर, लायन्स क्लब, मुंबईचे डॉ. शिवलकर, माननीय विश्वस्त श्री. बाबा नरोडे, 'श्री साईनाथ' रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आर. पी. पाटील व दुसऱ्या रांगेत डावीकडून माननीय विश्वस्त श्री. उत्तमराव शेळके, माननीय विश्वस्त श्री. गोपीनाथ कोते पाटील, माननीय विश्वस्त श्री. पी. बी. बोरावके, माननीय कार्यकारी अधिकारी श्री. विष्णूपद बुटे, माननीय विश्वस्त डॉ. एकनाथ गोंदकर, माननीय विश्वस्त श्री. एस्. आर. शिंदे, माननीय विश्वस्त श्री. पी. टी. बोरावके दिसत आहेत.




समारोप समारंभप्रसंगी आभार प्रदर्शन करताना माननीय कार्यकारी अधिकारी श्री. विष्णूपद बुटे आभार प्रदर्शन करीत असून पहिल्या रांगेत डावीकडून माननीय विश्वस्त श्री. एस्. एम्. धोरडे, माननीय खासदार श्री. शंकरराव काळे, माननीय विश्वस्त श्री. भीमाशंकर खांबेकर व दुसऱ्या रांगेत डावीकडून माननीय विश्वस्त श्री. उत्तमराव शेळके, माननीय विश्वस्त श्री. गोपीनाथ कोते पाटील, माननीय विश्वस्त श्री. पी. बी. बोरावके, माननीय विश्वस्त डॉ. एकनाथ गोंदकर दिसत आहेत.